।। चैतन्यचिंतन ।।

(श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे विवरण)

वचनाभ्यास

चिंतन

मनन

विवरण

आचरण

समाधान



डॉ. सुहास पेठे

चैतन्यचिंतन

(श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज
यांच्या काही बोधवचनांचे विवरण)
(विवरणविषयांची भर घातलेली नवी आवृत्ती)

डॉ. सुहास पेठे

एम्. ए., पीएच्. डी. (तत्त्वज्ञान)

* चैतन्यचिंतन

पुस्तकरूपाने प्रकाशित आठवी आवृत्ती : जून २०१५
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com

युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka

अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

कृतज्ञतापूर्वक अर्पण..

'चैतन्यचिंतन' करून
या पुस्तकाच्या
पुढील आवृत्तीचा
सुयोग आणणाऱ्या

सहृदय वाचकांना -

- सुहास पेठे

चिंतनक्रम

* चिंतनाचा वर्धिष्णु आनंद...

* श्री चिंतन...६
* पहिला मार्ग...९
* काळजी ...१२
* संतांचे ग्रंथ कशासाठी...१५
* आपला स्वभाव...१८
* पैसा...२१
* शिकण्याची संधी...२४
* समाधान आणि परिस्थिती...२७
* मौनाचा परिणाम...३१
* आपलं घर...३४
* संधीत रूपांतर...३८
* हिंसा...४१
* खरा स्वार्थ...४४
* वृत्तीत बदल...४८
* घातक समजूत...५१
* भीती...५४
* देहापलीकडे...५७
* अडचणी...६०
* आपला विशालपणा...६३
* शिक्षण...६७
* खरा परमार्थी...७२
* संत आणि आपली इच्छा...७७
* पहिली प्रतिक्रिया...८०
* शहाणा मनुष्य...८४
* भजनाचं रहस्य...८७
* गुरू...९१
* मंदिर...९५
* खरी हानी...९९
* नाम: अर्थ आणि कार्य...१०३

चिंतनाचा वर्धिष्णु आनंद....

श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अमूल्य वचनांचं विवरण करणारं हे पुस्तक प्रसिद्ध झाल्याला सोळा वर्षं झाली. ती सुवचनं कालोचित पद्धतीनं शाश्वत सत्यं मांडणारी असल्यानं त्यापासून होणारा आनंद प्रतिवर्षी वाढतोच आहे.

श्री महाराजांनी म्हटल्याप्रमाणं खरा परमार्थ हा सर्वांनाच गरजेचा असून तो अखेर माणसाची वृत्ती पालटण्यात, अंतरंगात विधायक बदल होण्यात आहे. त्याला नामासारखं सोपं व प्रभावी साधन तर त्यांनी दिलंच आहे, पण इथं संकलित केलेल्या त्यांच्या वचनांच्या चिंतनातून त्यांना अपेक्षित असलेलं हे वृत्त्यंतर घडणं किती महत्त्वाचं आहे, ते कसं घडवावं यावरही प्रकाश पडू शकेल. त्या दृष्टीनं या वचनांचं व विवरणाचं नित्य वाचन व मनन घडल्यास उपयोग होईल, असं नम्रपणे वाटतं. श्रींच्या वचनांच्या विवरणाची तिसरी आवृत्ती प्रसिद्ध करताना त्यात चार नव्या विषयांची भर घालून तिची उपयुक्तता अधिक वाढावी असा नम्र प्रयत्न केलेला होता. त्याच्या यशस्वितेमुळं श्रीकृपेनं आता ही पुढची आवृत्ती प्रसिद्ध होत आहे.

श्रींच्या मूळ बोधवचनांचं जतन व संकलन करून आपणा सर्वांना ती उपलब्ध करून देणारे पूज्य कै. बेलसरेबाबा यांचं ऋण न फिटणारं आहे. या वचनांवरील विवरणाचा काही भाग संक्षिप्त रूपानं १९९४-९५ मध्ये प्रसिद्ध करणाऱ्या दैनिक ऐक्यच्या परिवाराचा तसंच या पुस्तकाच्या मूळ हस्तलिखिताच्या अंतिम टप्प्यात प्रोत्साहन देणारे माझे तत्कालीन वरिष्ठ अधिकारी मित्र श्री. प्र. वि. साधले यांचाही मी आभारी आहे. हे पुस्तक अधिकाधिक वाचकांपर्यंत जावं म्हणून श्रींच्या इच्छेनुसार साहाय्यभूत होणाऱ्या सर्व कुटुंबियांचा मी ऋणी आहे.

संतांचं अस्तित्व त्यांच्या देहांत नसून त्यांच्या वचनांत आहे, असं श्री महाराज म्हणत. त्या दृष्टीनं श्री महाराजांचा सहवास या वचनांच्या चिंतनाच्या रूपानं सर्वांना लाभो व त्याचा दैनंदिन जीवन, वृत्त्यंतर व नाम यांसाठी उपयोग होवो, ही श्रींच्या चरणी प्रार्थना.

संतनगरी, सातारा - सुहास पेठे

१. श्री चिंतन

श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज हे सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातल्या गोंदवले या एका छोट्याशा खेड्यातले थोर सत्पुरुष. अगदी लहान वयात त्यांनी सद्गुरूंच्या शोधासाठी अपार कष्ट घेतले. येहळेगावच्या श्री तुकामाईंनी त्यांना गुरुपदेश दिला आणि भावी कार्याची जाणीव, दिशा नि सामर्थ्य दिलं. श्री महाराजांनी भारतभर खूप वेळा भ्रमण केलं. अगदी राजेरजवाड्यांपासून कफल्लक माणसांपर्यंत सर्व थरांत त्यांचा शिष्यवर्ग पसरला होता. पण स्वतः लोकविलक्षण कोटीतले सत्पुरुष असूनही ते जास्तीत जास्त वावरले ते सामान्य, मध्यमवर्गीय प्रापंचिक माणसांत.

सामान्यांच्या अडीअडचणी, त्यांची कुवत याची त्यांना पुरेपूर कल्पना असे. अशा स्थितीतल्या माणसाला अखंड समाधानरूप भगवंत मिळवणं कसं सोपं होईल, या दृष्टीनं त्यांनी आयुष्यभर तळमळीनं उपदेश केला. ते अत्यंत सदाचरणाचा, निस्पृहतेचा, निरिच्छतेचा मूर्तिमंत आविष्कार होते. त्यांचा परमार्थ मिंधेपणाचा नव्हता तसा प्रपंचही भोंगळपणाचा नव्हता. कुठल्याही कर्तव्यात कसूर केलेली त्यांना आवडत नसे. २२ डिसेंबर १९१३ रोजी वयाच्या ६९ व्या वर्षी त्यांनी सामान्य प्रापंचिकाला पारमार्थिक जगण्याचा एक आदर्श घालून देऊन अत्यंत समाधानात गोंदवल्याला देह ठेवला. या छोट्याशा गावी असलेल्या समाधिमंदिरात त्यांना आवडती नामसाधना, उपासना नि अन्नदान आजही निष्ठेनं सुरू असलेलं दिसतं.

पूज्य के. वि. बेलसरे यांनी लिहिलेलं श्री महाराजांचं विस्तृत चरित्र, श्री महाराजांच्या शिकवणुकीचं सार असलेली प्रवचनं, अभंगगाथा, आठवणी, बोधवचनांची संकलनं अशा स्वरूपाचं साहित्य आज उपलब्ध आहे. ते लौकिकात अस्तंगत झाले तरी त्यांच्या अमूल्य उपदेशाच्या, बोधाच्या

रूपानं ते आजही विद्यमान आहेत. त्यांच्या प्रत्येक प्रसंगातल्या खुबीच्या, धीराच्या, प्रसन्नतेच्या, चपखल व मार्मिक शब्दांचा विचार केला तर त्यांचं हे आईसारखं प्रेमळ नि मार्गदर्शक अस्तित्व आजही अनुभवायला येतं.

नेहमीचं सर्वसामान्य आयुष्य जगणाऱ्या माणसाच्या जीवनात थोड्या अधिक विचार करण्यानं, नामासारख्या सोप्या साधनेनं कसा फरक पडतो ते त्यांच्या उपदेशाकडं पाहिलं की जाणवतं. ते म्हणत,'माझा माणूस आहे त्या पायरीवरून वर चढला पाहिजे असं माझं धोरण असतं.' ते खरंच प्रत्ययाला येऊ शकतं. एका बाजूला श्रींचं म्हणणं अतिशय सोपं, व्यवहार्य, हृदयाला-मनाला चटकन भिडणारं नि बुद्धीलासुद्धा थेट आवाहन करणारं आहे. दुसऱ्या बाजूला ते मानसशास्त्राच्या, वेदान्ताच्या, शिक्षणशास्त्राच्या, तत्त्वज्ञानाच्या अशा अनेक दृष्टींनीही मार्मिक आणि मोलाचं ठरतं.

प्रत्येक गोष्टीत स्वत:चा फायदा पाहाणं नि दुर्दैवानं परमार्थातसुद्धा दुसऱ्याकडून कितीतरी अपेक्षा बाळगणं अशा आजच्या विचित्र काळात एक निस्पृह सत्पुरुष 'तुम्ही भगवंताचं नाम घ्यावं या पलीकडं मला कसलीही अपेक्षा नाही'असं परोपरीनं सांगतो याला केवढं मोल आहे,याची कल्पना करणंसुद्धा कठीण आहे. आज व्यवहारात पाहिलं तर आपल्याला अगदी आपल्या मानलेल्या माणसांकडूनसुद्धा निरपेक्ष प्रेम मिळणं कठीण आहे, हा आपला अनुभव नाही का ? तिथं 'नाम घेणाऱ्याच्या मी मागेपुढे उभा असतो' अशी इतकी प्रेमाची खात्री देणारा सत्पुरुष भेटणं म्हणजे जीवनातलं सर्वांत मोठं भाग्य आहे, असं म्हटलं तर ती अतिशयोक्ती ठरू नये.

ते म्हणत,'माझ्याकडं अनुग्रह घेणाऱ्यातसुद्धा मी रामच पाहिला.' इतकंच काय, ते नेहमी म्हणत की, तुम्ही सगळे मला रामरूप दिसता. व्यवहार्य परमार्थावर त्यांचा कटाक्ष होता. ते म्हणत, 'भगवंताचं प्रेमसुद्धा व्यवहाराला धरून असावं.' त्यांना दुबळेपणा आवडत नसे, प्रपंचातही हेळसांड केलेली खपत नसे. उलट आपल्या माणसानं, पारमार्थिक माणसानं प्रपंच अधिक दक्षतेनं नि व्यवस्थितपणानं करावा यावर त्यांचा कटाक्ष असे.

पण हेही ते त्याचबरोबर सांगत की, भगवंताला विसरण्याइतक्या प्रमाणातही तो गुंग होऊन करू नये. एरवी तसंही करायला हरकत नव्हती. पण ज्या अखंड आनंदाच्या, मुक्ततेच्या नि भगवंताच्या प्राप्तीसाठी आपण जन्माला येतो, त्याकडं प्रपंचात गुंग होऊन गेल्यास लक्ष देता येत नाही, त्याचा विसर पडतो म्हणून ही काळजी घेण्याची जरुरी आहे.

अनेकांची अशी आजही समजूत असते की, परमार्थाचा किंवा भगवंताचा किंवा कुठल्याही साधनेचा विचार म्हणजे प्रपंचाकडं, कर्तव्याकडं दुर्लक्ष ! पण 'खऱ्या परमार्था'ची ओळख करून घेण्यानं व्यवहारात दुर्लक्ष किंवा हानीची गोष्ट सोडाच, पण निर्भेळ आनंदाची भरच त्यात पडल्याची उदाहरणं नि अनुभव खूप सांगता येतील. श्री महाराज म्हणत, 'माझ्या सांगण्याप्रमाणं वागण्यानं आजपर्यंत व्यवहारात आणि प्रपंचात कुणाचं नुकसान झालं आहे, त्यानं येऊन सांगावं !'

साधनेच्या बाबतीतसुद्धा एकदम अचाट परिवर्तन, जागृती वगैरे करण्याच्या बाजूचे ते नव्हते. परमार्थातलं परिवर्तन हे हळूहळू एका दिशेनं आणि निश्चितपणानं घडणं हिताचं आहे असं ते म्हणत. सर्वसाधारण जीवनात आग्रह वा हट्ट नसावा यावर त्यांचा भर असे. सारं चांगल्यात चांगलं करण्याचा प्रयत्न असला तरी अमुकच असावं असा आग्रह नसावा, असं ते सांगताना दिसतात. त्यांनी एकच आग्रह क्षम्य मानला असेल तर तो त्यांनी आयुष्यभर घेतलेल्या नामाचा. वेदोपनिषदांपासून ते श्री ज्ञानेश्वर माउली, नामदेव, तुकोबा, समर्थ आदी साऱ्या संतांनी शिरोधार्य मानलेल्या या अत्यंत निरुपाधिक, सोप्या साधनाचा त्यांनी परोपरीनं हट्ट धरलेला दिसेल.

त्यांच्या अमूल्य बोधवचनांच्या विवरणाच्या साहाय्यानं त्यांनी सुचवलेल्या मार्गाचं आकलन नि चिंतन पुढील प्रकरणांतून करून त्यांचंच अनुसंधान ठेवण्याचा छोटासा प्रयत्न आपण त्यांच्याच कृपेनं करू या.

*

२. पहिला मार्ग

श्री महाराजांची प्रपंचाकडं बघण्याची दृष्टी अभ्यासाची होती. अन्यथा सर्वसाधारणपणे पारमार्थिक माणूस म्हटल्यावर तो प्रपंचाकडं तुच्छतेनं, कमी किमतीची गोष्ट म्हणून पाहातो हे आपल्याला सरावाचं झालेलं असतं. पण त्यांच्या या वेगळ्या दृष्टीमुळं तर ते म्हणत की, माणूस प्रपंचात जसा तयार होईल तसा जंगलात जाऊनसुद्धा होणार नाही.

प्रपंचातल्या नेहमीच्या चिंता, काळज्या, अडीअडचणी, धडपड, पदोपदी येणारे लोभामोहाचे प्रसंग हे सारं पाहिलं की, इतकी शिकण्याची संधी माणसाला अन्यत्र क्वचितच दिसेल. जंगलात एक वेळ इतर भौतिक गैरसोयींना तोंड द्यावं लागेल, त्यांच्यावर मात करावी लागेल, पण अशा चिंता-काळज्यांसारख्या असंख्य प्रसंगांना मात्र क्वचितच तोंड द्यावं लागेल.

समजा एखादा माणूस जंगलात एकटाच बसला आहे तर त्याची निंदानालस्ती करायला तिकडं कुणी फिरकायची शक्यता कमीच. तीच गोष्ट स्तुतीची नि मानाची. त्या निर्जन जागी त्याला आदर द्यायला नि मान द्यायला कुणी पुढं होण्याची शक्यता नाही. दागदागिने, सोनंनाणं, पैसा-अडका, चार तऱ्हेच्या झगमगत्या वस्तू-काही म्हणून तिथं नसल्यानं मोहात तरी पाडायला तिथं फारसं काही नसणार. शिवाय निंदास्तुती, हर्षशोक अशासारख्या प्रसंगांची, अनुभवांची जितकी रेलचेल प्रपंचात आहे तितकी त्या विजनवासात खचितच नाही.

यामुळं अर्थातच हे प्रसंग घडल्यानं आपल्यालाही आपली मानसिक तयारी करण्याची, तिची परीक्षा करण्याची जी संधी प्रपंचात मिळते ती विजनात नाही. पण अशा प्रसंगांची रेलचेल प्रपंचात असते म्हणून केवळ माणूस तयार होईल असंही नाही. नुसते अनुभव पदोपदी येऊन माणूस कसा

तयार होईल ? कारण सामान्य माणसाची सवय ही त्या त्या अनुभवात गुंगून जाण्याची आहे. त्या त्या अनुभवात वाहून जाण्याची आहे. मग अनुभव प्रेमाचा असो अथवा द्वेषाचा किंवा मानाचा असो अथवा स्तुतीचा. या संदर्भात श्री ज्ञानेश्वर माउलींनी फार चांगला दृष्टांत दिला आहे. ते म्हणाले, मातीच्या ढेकळासारखी आपली अवस्था असते. पाण्याचे चार थेंब पडले की विरघळतो आणि जरासं उन्ह लागलं की वाळतो. तसे आपण जरा स्तुती झाली की विरघळतो नि जरा निंदा झाली की रागावून बसतो. त्यामुळं नुसती प्रसंगाची रेलचेल असून भागत नाही.

तसं असतं तर साऱ्यांचं जगणं ही आनंदसाधना झाली असती. पण तसं होताना दिसत नाही कारण हे सारे अनुभव घेत असताना त्यांच्याकडं बघण्याची जी दृष्टी असावी लागते, जी शिकण्याची भूमिका नि नम्रता लागते ती सर्वांकडं असतेच असं नाही. ती असली तर मात्र माणूस प्रत्येक प्रसंगातून जे शिकेल त्यातून तयारच होत जाईल. त्या दृष्टीनं श्री महाराज म्हणत की, प्रपंच शिक्षणाकरता आहे, अभ्यासाकरता आहे. ही संधी सुदैवानं बहुतेक सर्वांकडं आहे, नेहमीच्या जीवनात आहे. मग ते जीवन सुबत्तेचं असो, अभावाचं असो, लहानाचं असो, मोठ्याचं असो.

याही पुढं जाऊन श्री महाराज सुचवीत की, या साऱ्या प्रपंचाची सुरुवात आपल्या घरापासून होते. त्या दृष्टीनं कोणतंही खरं पारमार्थिक काम किंवा पारमार्थिक दृष्टी अंमलात आणायची खरी सुरुवात, अभ्यासाची पहिली पायरी-घरात आहे. हे तिथं सांभाळता आलं तर केवढं तरी काम होईल.

पण आपला व्यवहारातला अनुभव मात्र उलट असतो नाही का ? आपल्या दृष्टीनं अध्यात्माचं, परमार्थाचं काही काम म्हणजे आधी घराबाहेर पडायचं - मग ते भजनपूजन असो, देवदर्शन असो वा इतर काही. समाजकार्य तर सारं घराबाहेरच करायचं असल्यानं हा तसाच बाहेरचा उद्योग होऊन बसतो. त्यामुळं असं अनेकदा आढळतं की, घरातलं दु:ख तसंच असतं नि जगाचं दूर करायला आपण बाहेर पडतो. घरात आपण किती स्वार्थी आहोत

याची कल्पनासुद्धा येत नाही नि जगात मात्र आपण नि:स्वार्थी बनू पाहातो. पण हा एक नवीनच विरोधाभास त्या व्यक्तीत निर्माण होतो आणि खरं परिवर्तन या कारणानं पुन्हा दूर राहातं.

त्याला कारण असं की, आपण बाहेर नि:स्वार्थी, निरपेक्षसुद्धा राहू, वागू. कारण बाहेरचा संबंध पाचदहा मिनिटांचा आहे किंवा पाचदहा तासांचा आहे. पण घरातला संबंध चोवीस तासांचा आहे. म्हणून घरात ते कठीण आहे. पण आपल्याला ते खरंच साधायला हवं असेल तर ते घरातच साधायला हवं. असा घरात नि:स्वार्थी झालेला, निरिच्छ झालेला, क्षमाशील झालेला माणूस खरा तयार होईल हे मात्र खरं !

एक उच्चशिक्षित तरुण श्री महाराजांना भेटला आणि आपल्याला अनुग्रह द्यावा अशी त्यानं श्री महाराजांना विनंती केली. त्यावर श्री महाराज त्याला म्हणाले, 'तुम्ही एवढे शिकलेले आहात तर अनुग्रहाचा अभ्यास करून तो घ्यावा.' त्यावर तो म्हणाला की, ते मला सर्व ठाऊक आहे. त्यावर त्यांनी त्याला विचारलं की, अनुग्रहासाठी घरच्यांची परवानगी-आईवडिलांची परवानगी तुम्ही घेतली आहे का ? त्यावर तशा परवानगीची काही आवश्यकता आपल्याला वाटत नसल्याचं त्यानं सांगितलं. श्री महाराज म्हणाले, प्रथम त्यांची परवानगी घ्या. त्यांची काही सेवा करा मग अनुग्रहासाठी या. जो आईवडिलाचं ऐकत नाही तो माझं काय ऐकणार ? श्री महाराजांना हे सारं अध्यात्म घरी सुरू व्हावं, तिथं ते कसोटीला उतरावं असं वाटे.

या संदर्भात 'साधूची खरी परीक्षा' सांगताना श्री महाराज एकदा म्हणाले, 'ज्याची बायको त्याला साधू म्हणेल तो खरा साधू.' मथितार्थ असा की, हे साधुत्व घरात सांभाळणं कठीण आहे, पण आवश्यकही आहे. त्या अर्थानं श्री महाराज एका बोधवचनात म्हणाले की, परमार्थ साधायचा तर 'घर जिंकणं हा पहिला मार्ग आहे.'

*

३. काळजी

आपण रोज अगदी सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत अनेक गोष्टी करतो. काही गोष्टी नियमानं रोजच करतो. आंघोळ, जेवणखाण, काम, विश्रांती यांसारख्या गोष्टी जवळजवळ नियमितपणानं रोज घडतात. काही काही गोष्टी आपण कधी कधी करतो. एकूण या रोजच्या गोष्टी असोत नाही तर कधी कधी केलेल्या असोत एखादा माणूस एखादेवेळेस कमीजास्त जेवील, विश्रांती कमीजास्त घेईल, कदाचित वेळी यांतल्या साऱ्याच गोष्टी तो करील किंवा त्यांतल्या काही गोष्टी अजिबात करणार नाही, पण एक गोष्ट साधारणपणे रोज तो न चुकता करतो आणि ती म्हणजे 'काळजी' !

प्रत्येक माणसाला रोज उठल्यापासून झोपेपर्यंत ही काळजी मागं लागलेली असते. ती इतकी व्यापक आहे की, आज नळाला पाणी वेळेत नि पुरेसं येईल की नाही इथंपासून मनुष्यजन्माचं सार्थक होईल की नाही इथंपर्यंत - ती कशाचीही असू शकते. काळजीचं साम्राज्य एवढं मोठं आहे की, स्त्रीपुरुष, लहानमोठा, गरीब-श्रीमंत, राजाप्रजा, अडाणीज्ञानी, बेकार-नोकरदार अशा एक ना दोन साऱ्यांवर ही काळजी आपला अंमल गाजवते. काळजी लागणं हे आपल्यालासुद्धा इतकं सवयीचं झालेलं असतं की, 'काळजी ही माणसाला लागणारच' अशी आपली नकळत खात्रीच झालेली असते. इतकंच काय एखाद्याला काळजी दिसली नाही तर ते आपल्याला खटकतं, गैर वाटतं. पण दुसऱ्या बाजूला पाहिलं तर अशी मौज दिसेल की, तीच काळजी कमी व्हावी म्हणूनही आपण धडपडतो !

तसं पाहिलं तर काळजी करण्यात जाणारी माणसाची मानसिक शक्ती ही किती प्रचंड असते ! तिचं मोजमाप करू गेलो तर आपण थक्क होऊ. अनेकदा अनेकांचा तर काळजी करण्याचा स्वभावच बनून जातो.

त्यातही काळजीला विषय लागत नाही. त्यामुळं रस्ता क्रॉस करण्यापासून, गाडी चुकण्यापासून, मुलीच्या लग्नापर्यंत किंवा नातवाच्या करिअरपर्यंत कुठला ना कुठला विषय बारा महिने चोवीस तास पुरतोच. अनेकांना या काळजीमुळं अन्न गोड लागत नाही, झोप लागत नाही, सुखसुद्धा कडू लागतं, अनेकदा गंभीर स्वरूपाचे आजार उद्भवतात, नित्याच्या नोकरीधंद्यातलं कामकाज निर्वेधपणानं करणं मुश्किल होऊन बसतं, इतकंच काय पूजा करणाऱ्याचं पूजेत, साधकाचं साधनेतसुद्धा ही काळजी लक्ष लागू देत नाही.

या काळजीचा विचार प्रापंचिक माणूस जसा करीत असतो तसाच पारमार्थिक माणूस त्याच्या दृष्टीनं करीत असतो. श्री महाराजांनी यात काळजी 'घेणं' आणि 'करणं' असा फरक केला आहे. वेळीच एखाद्या गोष्टीचा योग्य विचार करून आवश्यक कृती करणं म्हणजे 'काळजी घेणं' आहे,जे आवश्यकही आहे.पण काळजी 'करणं' मात्र अकारण आहे, हे दिसून येईल. म्हणून श्री महाराज म्हणत,'काळजी घ्या, काळजी करू नका.'

विद्यार्थ्याचंच पाहा. तो परीक्षेचा पेपर टाकून हॉलमधून बाहेर पडतो. पुढं दोन महिने निकाल लागेपर्यंत काळजी करीत राहातो. या काळजी करण्यानं त्या पेपरात त्यानं लिहिलेली दोन चुकीची उत्तरं बरोबर होतील की दोन मार्क्स वाढतील ? काहीच नाही. अशी काळजी करण्याची गरजही नाही अन् उपयोगही नाही. पण हेच दोन मार्क्स वाढवण्यासाठी पेपरला जाण्यापूर्वी अधिक अभ्यास करून काळजी 'घेण्या'ची मात्र गरज आहे. पेपर लिहून पूर्ण वेळ संपण्याच्या क्षणापर्यंत या प्रयत्नांची आणि काळजी घेण्याची गरज आहे अन् उपयोगही आहे. पण नंतर ती करण्यानं मात्र आपला एकीकडं वेळ वाया जातो, जो दुसऱ्या चांगल्या कामात वापरू शकलो असतो आणि दुसरीकडं मानसिक शक्तीचासुद्धा ऱ्हास होतो. एकूण या काळजी करण्याचा फोलपणा सहज लक्षात येऊ शकेल.

काळजीवर महत्त्वाचा प्रकाश टाकणारं श्री महाराजांचं एक मार्मिक वचन असं आहे की,'काळजी करण्यात काळाचा अपव्यय व भगवंताचा

विसर दोन्ही आहेत.' याची सत्यता आपल्या लक्षात येऊ शकणारी आहे. दुर्दैवानं आपल्याला सवय आहे की, आपण काळजीनं खंगून जाऊ, पण तिच्या मुळाशी जाऊन शोध घेणार नाही की, ती उत्पन्न होतेच कशातून !

वास्तविक काळजी निर्माण होते ती आपल्या सुखाचं, स्वास्थ्याचं, प्रतिष्ठेचं, सोयीचं घडेल की नाही यांतून. म्हणजे तिचं मूळ आपल्याच अहंकारात आणि मीपणातच आहे. स्वार्थापोटी निर्माण होणारी ती एक भीतीच आहे,जिच्यामागं देहबुद्धीचा पगडा आहे. एका परीनं त्यात स्वत:च्याच कर्तेपणावर विश्वास आहे नि दुसऱ्या बाजूला त्याबद्दल शंकाही आहे.

साधनी माणूस म्हणतो सारं काही भगवंतावर, गुरूवर सोपवलेलं आहे आणि दुसरीकडं त्याला सारं ठीक होईल की नाही, याची काळजी वाटते. असं जर झालं तर त्या भगवंतावरचा नि त्याच्या कर्तृत्वावरचा विश्वास खरा कसा म्हणता येईल? काळजी लागली की मग त्या भगवंताचा नि त्याच्या कर्तृत्वशक्तीचा विसर पडतो असंच म्हणावं लागेल. दुसऱ्या बाजूनं अशी काळजी, की जी फोल आहे, त्यात जाणारा काळ हा अत्यंत मोलाच्या काळाचा अपव्ययच म्हणता येईल.

अशी ही आपली दोन्हीकडून नव्हे तर सगळीकडून नुकसान घडवणारी काळजी थांबवावी असं वाटणं स्वाभाविक आहे. ती थांबवण्यासाठीसुद्धा श्री महाराजांचं मूल्यवान वचन उपयुक्त ठरेल. ते म्हणत काळजी घालवण्यासाठी आधी ती लागणं स्वाभाविक आहे ही कल्पना घालवा ! ती न लागतासुद्धा आपलं मन कार्य करू शकतं, कर्तव्य पार पाडू शकतं हे प्रथम मान्य केलं म्हणजे मग काळजी कमी करण्याच्या मार्गावर चालणं सुकर होईल. मग देहबुद्धी पलीकडच्या विचारानं, आपल्या तुटपुंज्या कर्तृत्वाच्या विचारानं आणि निसर्गाच्या, भगवंताच्या अंतिम कर्तृत्वाच्या नि हितबुद्धीच्या विचारानं, ही काळजी नाहीशीही होताना दिसेल !

*

४. संतांचे ग्रंथ कशासाठी ?

माणसांच्या विश्वात शब्दाला फार महत्त्व आहे. बोललेल्या शब्दाला आहे तसंच लिहिलेल्या शब्दालाही आहे. म्हणजेच पुस्तकांना आहे. आज माणसाचा जो जो व्यवहार चालू आहे त्यात या लिहिलेल्या शब्दांचा वापर किती मोठा आहे, हे आपण सहज लक्षात घेऊ शकू. व्यवहार मग तो धंद्यातला असो, नोकरीतला असो, सरकारी असो, खासगी असो, कुठलाही असो त्यात हे लिखित शब्द फार मोठी भूमिका बजावतात असं दिसून येईल. अशा लिखित शब्दांचेच पुढं ग्रंथ, पुस्तकं, पोथ्या बनल्या. त्यांनीही माणसाच्या संस्कृतीत फार मोठं स्थान मिळवलेलं आहे.

ग्रंथांचे पुष्कळ प्रकार आहेत. मनोरंजन करणारे, माहिती देणारे, ज्ञान देणारे, कौशल्य शिकवणारे. तसेच प्रकार ग्रंथकारांचे, तितकेच तो ग्रंथ लिहिण्यामागच्या त्यांच्या त्यांच्या भूमिकेचेसुद्धा आहेत. वाचणाऱ्यांचीही तीच अवस्था आहे. जाता जाता वाचण्यापासून ते वाचल्याशिवाय तरणोपाय नाही, इथंपर्यंत वाचणाऱ्यांच्या भूमिकासुद्धा वेगवेगळ्या प्रकारच्या आहेत.

संतांचे ग्रंथ हा या ग्रंथसंपदेतला एक अमोल ठेवा आहे. या सर्व ग्रंथकर्त्यांची भूमिका पाहिली तर ती लोकांच्या आत्यंतिक कल्याणाच्या तळमळीची दिसते. यांतल्या कुणीच इतर काही गोष्टी उदाहरणार्थ मान-पैसा-लौकिक असल्या गोष्टी मिळवण्यासाठी असे ग्रंथ लिहिले नाहीत. हे तर राहोच, पण त्या ग्रंथांचं कर्तेपणसुद्धा अनेकदा नाकारल्याचं दिसून येईल. 'कृपा केली दाशरथीने । समर्थकृपेची वचने' हे श्री समर्थांचे उद्‌गार, 'ग्रंथ नोहे, हे कृपेचे वैभव तिये' हे श्री माऊलीचं वचन किंवा 'तुका म्हणे बोल, माझा बोलतो विठ्ठल' अशी श्री तुकोबांची ग्वाही - हे सारे हेच दर्शवतात. बोलण्यामागची, सांगण्यामागची भूमिका ही तर लोकांचं कल्याण व्हावं ही

आहे. लिहावा म्हणून त्यांनी कधी ग्रंथ लिहिला नाही. राहवत नाही म्हणून तो लिहिला, कळवळून लिहिला असं दिसून येईल. इतका उत्तम समर्थ नरदेह मिळाला तो नुसता काबाडकष्ट करण्यात, खाण्यापिण्यात, क्षुद्र स्वार्थात, हेव्यादाव्यात माणूस खुशाल घालवतो हे पाहून या सत्पुरुषांच्या हृदयात जी कालवाकालव होते त्यापोटी आलेले ते उद्‌गार असतात. त्यामुळं त्यातून काही लौकिक प्राप्ती किंवा प्राप्तीची अपेक्षा त्यांना असलेली आढळून येत नाही. या बाबतीत इतर ग्रंथांपासून हे ग्रंथ वेगळे असलेले दिसून येतात.

आता वाचकांच्या बाजूनं पाहिलं तर साधारणपणे अशा ग्रंथांकडं आदरानं पाहिलं जातं असं दिसून येतं. अनादरानं पाहण्यापेक्षा किंवा अजिबात न पाहाण्यापेक्षा हे नक्कीच चांगलं असलं तरी ते पुरेसं मात्र ठरत नाही.

साधारणत: संतग्रंथ ही आपल्या दृष्टीनं श्रद्धेची बाब असते. परिणामी आपापल्या कुवतीप्रमाणं त्यांना चांगलं कव्हर, ग्रंथ बांधायला उंची-रेशमी वगैरे कापड, ते ठेवण्यासाठी शक्यतो चांगलं काचेचं कपाट अशी व्यवस्थासुद्धा आवर्जून केली जाते आणि ते चांगलंच आहे. काही जण त्या पलीकडं जाऊन अशा ग्रंथांचं वाचन करतात, काही पुन्हा पुन्हा पारायणं करतात, काही अर्थाचा अभ्यास करतात. या विषयी सांगताना श्री महाराज एके ठिकाणी लिहितात की 'ग्रंथ मुळीच न वाचणाऱ्यांची संख्या सर्वांत जास्त असते, त्या खालोखाल मोठ्या संताचा ग्रंथ म्हणून नुसता वाचणाऱ्यांची संख्या, त्याहीपेक्षा या ग्रंथाचा अर्थ समजून घेणाऱ्यांची संख्या कमी असते तर सर्वांत कमी संख्या ही त्या ग्रंथातलं स्वत:ला काय करायला पाहिजे ते लक्षात घेऊन, तेवढं प्रत्यक्ष करणाऱ्यांची असते.' श्रींच्या या म्हणण्याची सत्यता आपण सहज पडताळून पाहू शकतो.

असे ग्रंथ लिहिण्यामागची भूमिका सांगताना श्री महाराज म्हणत, 'आपल्याजवळ आनंदाची धुगधुगी आहे. आपण उद्याच्या आशेत आहोत. दु:खातली थोडीशी फुक्कर तोच आपला आनंद आहे. खरा आनंद आपल्याला माहीत नाही. तो आहे हे दाखवण्याकरता संतांनी ग्रंथ लिहिले.' अर्थातच

ग्रंथ लिहिण्यामागची संतांचीही तळमळ लोकांनी ते वाचून, अर्थ समजून घेऊन त्यानुसार बदलावं, वागावं आणि त्या अखंड आनंदाचा अनुभव प्रत्यक्ष घ्यावा, ही आहे. हे लक्षात घेतलं तर आपण या ग्रंथाबाबत जी भूमिका घेतो ती पुरेशी व योग्य होते का, हे लक्षात येईल.

याबद्दल सांगताना एका महत्त्वाच्या वचनात श्री महाराज म्हणाले, 'संतांचे ग्रंथ हे आचरण्याकरता आहेत. ते पारायणाकरता नाहीत.' याचा अर्थ पारायणच करू नये असा नाही. तर गर्भितार्थ लक्षणीय आहे. त्या ग्रंथांचं फक्त पारायणच करायचं आहे, अशा समजुतीत राहू नये याकडं श्री महाराज लक्ष वेधीत आहेत.

कारण असं की, एखाद्याला एखादा रोग झाला असेल तर तो माणूस औषधाच्या शोधात असतो. ते कळतं, ते तो खटपटीनं मिळवतो. मग ती औषधाची बाटली घरी कपाटात ठेवून रोजच्या रोज बाहेर काढली, ते घ्यायची पद्धत, त्याचं नाव, अनुपान सारं वाचलं नि परत सुखरूप कपाटात ठेवली तर असं करण्यानं त्याचा रोग दूर व्हायची सुतराम शक्यता नाही. तो बरा व्हायला ते औषध प्रत्यक्ष पोटात जायचीच गरज आहे.

तीच बाब ग्रंथांच्या बाबतीत आहे.आपल्याला जो अशांतीचा, असमाधानाचा, दु:खाचा, अस्वस्थतेचा रोग जडला आहे त्यावरचं प्रभावी औषध, ग्रंथांच्या रूपानं समोर आलं आहे. पण म्हणून रोज केव्हातरी सप्ताहाच्या निमित्तानं ते औषध पाहून कपाटात सुखरूप परत ठेवण्यानं हा आजार कसा बरा व्हावा ? त्यासाठी प्रथम वाचन किंवा श्रवण, पुन्हा पुन्हा वाचन वा पारायण, अर्थ पाहाणं-मनन करणं आणि प्रयोग, प्रत्यक्ष वर्तनबदल म्हणजे बरं होणं असा काहीसा क्रम इथं अभिप्रेत दिसतो. हे घडलं तरच त्या ग्रंथकारांना वाटणाऱ्या वाचकांच्या-श्रोत्यांच्या कल्याणाविषयीच्या तळमळीचंही चीज होईल.

*

५. आपला स्वभाव

वर्षानुवर्षं एकेक गोष्ट करून ती हळूहळू अंगात भिनून जाते. ती वेगळी करतो आहोत ही जाणीवसुद्धा उरत नाही, इतकी ती सहजपणानं घडते. स्वभाव म्हणजे अशी अगदी मुरलेली, सहज वर येणारी गोष्ट. त्यादृष्टीनं विचार केला तर आपला स्वभाव प्रपंचाचा झाला आहे. अर्थात प्रपंच म्हणजे इथं नुसता बायकामुलं असणं नसणं एवढंच अभिप्रेत नाही. तर श्री महाराज म्हणत तसा 'प्रपंच' अभिप्रेत आहे.ते म्हणत'दुसऱ्यापासून सुख मिळवण्याचा प्रयत्न करणारा माणूस प्रपंची होय.' त्याला अनेक माणसं,वस्तू लागतात नि त्या सर्वांपासून आपल्याला सुख, सोय नि फायदा व्हावा लागतो. तशी आपली दृष्टी असते. त्यातही होणारी सुखसोय इंद्रियांना सुख देणारी असावी लागते.हे सारं वृत्तीत भिनणं म्हणजे माणसाचा स्वभाव प्रपंचाचा बनून जाणं.

अशा स्वभावानं जे जे आपण करू ते ते प्रपंचातच मोडेल. अगदी मंदिर जरी बांधलं किंवा पूजा जरी केली तरी ती या पद्धतीनं घडली तर तो प्रपंचच ठरेल.बाह्यत: ती गोष्ट भले आध्यात्मिक म्हणून ओळखली जावो. आपण देवदर्शनाला गेलो तरी तिथंही सुंदर भव्य बांधकाम, संगमरवरी मूर्ती, कोरीव कामं, भव्य दीपमाळा, रेशमी गालिचे अशा अनेक गोष्टींच्या शोधात आपण नकळत असतो. त्यामुळं यापेक्षा अमुक ठिकाणचं मंदिर-मूर्ती किती चांगली आहे, ती अवश्य पहा, असं आपण किती सहजपणानं बोलून जातो. बरं अशी चांगल्यात चांगली मूर्ती पाहाण्यानं आपल्याला भगवंत अधिक आठवला म्हणावं तर तसं नसतं. मग हे आपण आपल्या प्रपंचाच्या स्वभावामुळंच म्हणतो नाही का ? कारण आपल्या डोळ्यांना ते अधिक सुखाचं झालं. म्हणजे त्या पारमार्थिक कामातसुद्धा आपण प्रपंच आणतो.

हीच गोष्ट अन्य किती तरी आध्यात्मिक मानल्या जाणाऱ्या गोष्टींची

असते. मग ते ग्रंथपारायण असो, अभ्यास असो, जपजाप्य असो. त्यातूनही बाह्यांगाला महत्त्व दिलं गेलं तर तो प्रपंचच बनतो. शिवाय त्यातून जर प्रपंचातली एखादी अडचण दूर व्हावी, एखादी सोय व्हावी, एखादी घटना घडावी, नोकरी लागावी, मुलंबाळं व्हावी, आजार बरा व्हावा, मुलीचं लग्न जमावं अशी काही अपेक्षा असली तर ते प्रापंचिकच काम झालं नाही का ? यातली एखादी गोष्ट घडेलही, नाही असं नाही, पण त्यामुळं आपण - देवाचं खूप करतो आहोत, आध्यात्मिक कामात आहोत किंवा पारमार्थिक स्वभावाचे आहोत- अशी समजूत करून घेणं, हे मात्र धाडसाचं ठरेल.

स्वत:चा फायदा पाहाण्याबद्दलच्या प्रापंचिकाच्या स्वभावाबद्दलची विनोबांची एक गोष्ट पाहू. सृष्टीचं ते कौतुक करीत असताना तो गृहस्थ तक्रारीच्या सुरात त्यांना सांगू लागला - सृष्टीतल्या काही काही गोष्टी अगदीच निरुपयोगी आहेत.फळं,मुळं,फुलं वगैरे ठीक आहेत.अगदी गाय-बकरी-बैल अशा प्राण्यांपासूनसुद्धा माणसाला काही ना काही फायदा तरी आहे. पण हे वाघ अन् सिंह यांच्यापासून माणसाला काय फायदा आहे हो ? विनोबा उपरोधानं म्हणाले,जगातल्या सगळ्या गोष्टी केवळ स्वत:च्या फायद्यासाठी नसतात हे त्यांच्यापासून शिकता येतं हाच त्यांच्यापासून फायदा आहे !

या प्रपंचाच्या स्वभावामुळंच माणसाला जास्तीत जास्त असमाधान सोसावं लागतं.कारण एका वचनात श्री महाराजांनी स्पष्ट केल्याप्रमाणं प्रपंच हा पाचांचा म्हणजेच अनेकांचा बनतो. प्रत्येकाला सुखाची अपेक्षा असते. त्यामुळं ते एकाच वेळी सर्वांना कसं मिळणार ? ते सर्वथा अशक्य असतं.

पण परमार्थात दुसऱ्याच्या सुखाकडं नि भगवंताच्या इच्छेकडं बघण्याची दृष्टी असते. त्यामुळं तिथं आनंद नांदतो. खऱ्या परमार्थात आपली अपेक्षा पुरी करण्यापेक्षा दुसऱ्याची अपेक्षा कशी पुरी होईल,हा विचार असतो. त्यामुळं असली अपेक्षाभंगाची सततची अस्वस्थता, स्वत:च्या फायद्याचा विचार करीत राहिल्यामुळं येणारं दु:ख तिथं नसतं. म्हणून श्री महाराज एका मोलाच्या वचनात म्हणतात, परमार्थ हा आपला स्वभाव झाला पाहिजे !

कदाचित विचारानं आपण ते उत्तम देऊळ वगैरे प्रापंचिक कल्पना बाजूला ठेवू शकू आणि देवळात ज्या खऱ्या कामासाठी आपण जायला हवं ते आपण साधू. कुठल्याही देवळात आपल्या मनाची निरिच्छ, शांत अशी अवस्था निर्माण होऊ शकेल. हे तर योग्य झालं. पण श्री महाराजांची अपेक्षा त्या पुढील आहे. देवळात सापडलेला तिथं टिकणारा शांततेचा, परमार्थाचा स्वभाव आपल्या बरोबर देवळाबाहेर यायला हवा. परमार्थ हा दुसऱ्याला आनंद देण्याचा व आपली आनंदी वृत्ती सांभाळण्याचा आहे. तो आपला स्वभाव बनून राहील तर प्रपंचातली तगमग,तळमळ खचितच कमी होईल,वस्तू, माणसं, पैसा सारं कमी पुरेल आणि तरीही आनंद टिकेल.

परमार्थात मी इतरांच्या सुखासाठी आहे, माझ्या सुखासाठी नव्हे ही भावना असल्यानं स्वत:कडं प्रपंचात जे अवाजवी लक्ष असतं ते स्वाभाविकच कमी होतं. आपले आग्रह, अपेक्षा, हट्ट, हवेनकोपणा यामुळं आपल्याला पदोपदी जे दु:ख होत असतं, त्याच्या मुळावरच घाव बसतो. परमार्थाचा स्वभाव बनला तर प्रपंच करतानासुद्धा एकीकडं भगवंताचं अनुसंधान राहील, दुसरीकडं कर्तव्य पार पडतील, सतत दुसऱ्याच्या सुखाचं, सोयीचं आपण काय काय कसं कसं करू शकू याचा विचार राहील.

या दृष्टीनं परमार्थाच्या स्वभावानं प्रपंचाकडं पाहिलं, त्याचं आचरण केलं तर परमार्थ अवघड नाही आणि ज्या आनंदासाठी आपण एवढी धडपड करतो तो निर्भेळ आनंदही अवघड नाही. श्री महाराज म्हणत 'परमार्थ समजून जो त्याचं आचरण करील त्याला तो लवकर साधेल.' म्हणून आपला प्रपंचाचा, इतरांवर अवलंबून राहण्याचा स्वभाव ओळखला आणि त्याच स्वभावानं परमार्थ करू जाण्याचा आपला प्रयत्न ओळखला तर आपल्याला तो का साधत नाही हे कळेल आणि हे सारं समजून, परमार्थ स्वभावात आणून आचरला तर तो सोपाही वाटेल अन् लवकरही साधेल.

*

६. पैसा

आजकालच्या जीवनात ज्याला अगदी श्रेष्ठ मूल्य प्राप्त झालं आहे अशी गोष्ट म्हणजे - 'पैसा' ! तसं अनेक मूल्यांना श्रेष्ठत्व असतं. काही वेळेला काळाप्रमाणं ते बदलतंसुद्धा. त्यातल्या त्यात स्वातंत्र्य, न्याय, व्यवस्था, शांतता अशा अनेक श्रेष्ठ मूल्यांचा आपल्याला परिचय असतो. जे मूल्य एकदा माणूस मानतो त्यासाठी मग इतर साऱ्या गोष्टींचा त्याग करायला तो तयार असतो. असं काहीसं पैशाच्या बाबतीत झाल्याचं आपल्याला आढळेल. त्याला एवढं श्रेष्ठत्व आलेलं दिसेल की, माणूस त्यासाठी वेळी नातंगोतं, मानसन्मान, लौकिक, कर्तव्य सारं काही बाजूला ठेवील, असं आपल्याला पाहायला मिळतं.

दुसऱ्या बाजूला परंपरागत अध्यात्माच्या दृष्टीनं 'पैसा' म्हणजे अगदी नको असलेला, त्याज्य, अनर्थकारी, त्यावाचून अडणार नाही असा - अशा स्वरूपाची भूमिका असते. अगदी पैशाची आसक्ती क्षणभर बाजूला ठेवली तरी सामान्य माणूसही हे ओळखून असतो की पैशाशिवाय आपला प्रपंच - व्यवहार होतच नाही. त्यामुळं त्यागाच्या गोष्टी करण्यात काय अर्थ आहे ?

या साऱ्या पार्श्वभूमीवर श्री महाराजांचे विचार-वचनं मोठी मार्मिक आहेत. ते म्हणत की, 'पैसा साठवणं गैर नाही, त्याचा आधार वाटणं गैर आहे.' श्री महाराजांची भूमिका 'पैसा त्याज्य, नको' अशी या टोकाची नाही अन् 'तो काहीही करून मिळवावा, त्याशिवाय चालणार नाही' अशी त्या टोकाचीही नाही. उलट पैशाचा एकांगी विचार तर त्यांनी टाळला आहेच, पण त्यापेक्षा त्याचा मानसशास्त्रीय नि पारमार्थिक खोल विचार त्यांनी केला आहे असं आढळेल.

साधारणपणे पैसा हातात असला की, चार वस्तू घेणं, एखादी

घटना घडवून आणायला लागणारी सामग्री जुळवणं, अडचणी दूर करणं शक्य होतं, एकूण तो असण्यानं कुठं नडत नाही-असा साधारण अनुभव येतो. पण तो जीवनातल्या आपल्या वेगवेगळ्या क्षेत्रांतली एकेक कामं अशी पार पाडतो की, हळूहळू आपलं जीवन त्याच्यामुळंच चाललं आहे, असा भ्रम तो निर्माण करतो. श्री महाराज लक्ष वेधीत ते त्याच्या या सामर्थ्याकडं ! एकदा का हा भ्रम त्यानं उत्पन्न केला की, मग काहीही झालं तरी तो मिळवलाच पाहिजे, टिकवला पाहिजे अशी तळमळ सुरू होते. कारण आपली त्याच्यावरची भिस्त या भ्रमामुळं वाढलेली असते.

वास्तवात पाहिलं तर पैशाबरोबर आपलं माणसांचं सहकार्य, कुणाची माया,आपुलकी,आशीर्वाद, सदिच्छा, इतर साधनसंपत्ती, निसर्गाची अनुकूलता - अशा अनेक गोष्टींवर चाललेलं असतं. पण त्या एकट्या पैशात हे सामर्थ्य जास्त आहे की, हे सारं त्याच्या एकट्यावरच चाललं आहे असा भ्रम तो निर्माण करतो. तसं असतं तर हरकत नव्हती. पण पैसा खूप असून, औषध मिळत नाही, स्वास्थ्य नाही, प्रेम मिळत नाही, गोष्टी तडीला जात नाहीत, एक ना दोन अनेक घटना आपल्याला अनुभवायला येतात. त्यामुळं हे पैशाचं सामर्थ्य अंतिम नाही, हे खरंच.

दुसराही दोष असा की, त्याला अवाजवी महत्त्व दिलं जाणं म्हणजे दुसऱ्या घटकांना रास्त महत्त्व दिलं न जाणं. मग माणसाला इतरांच्या सदिच्छा, त्यांचं सहकार्य, मोठ्यांचे आशीर्वाद, त्यांच्याविषयी आदर-इतर साऱ्याच गोष्टींचं महत्त्व वाटेनासं होतं. जे अंतिमतः त्याच्याच नुकसानीला कारणीभूत आहे.'पैशा'चे हे सारे दुर्गुण लक्षात घेऊन श्री महाराज त्याला 'पैका' म्हणत. त्याबद्दल ते एकदा म्हणाले, 'ज्या गोष्टीला कमी लेखायचं तिला 'अल्पार्थे कः प्रत्ययः' या न्यायानं 'क' प्रत्यय लावतात असं ऐकतो. म्हणून पैशाची ही कर्तबगारी लक्षात घेऊन मी त्याला पैका म्हणतो. बाकी साऱ्याचा तर तो विसर पाडतोच, पण साक्षात भगवंताचा विसर पाडण्याचं सामर्थ्य त्यात आहे.' या त्याच्या घातक सामर्थ्याला सामान्य माणूस तर

भुलतोच, पण साधूतपस्व्यांनासुद्धा विचलित करायचं सामर्थ्य त्यात आहे.

गंगातीरावरच्या साधूची गोष्ट प्रसिद्ध आहे. त्याच्या दर्शनाला आलेल्या कुणा श्रीमंत यात्रेकरूनं त्याच्यासमोर शंभराची नोट ठेवली. संध्याकाळी ध्यान संपवून डोळे उघडल्यावर त्याच्या ते लक्षात आलं. अंधार पडायला आला. त्या नोटेचं काय करावं, हे त्याच्या लक्षात आलं नाही. म्हणून त्यानं ती उचलून ठेवली. रात्री तो नेहमीप्रमाणं ध्यानाला बसला तर त्याचं ध्यान काही जमेना. सारखा त्या नोटेचा-पैशाचा विचार त्याच्या मनात येई. शेवटी त्यानं उठून ती नोट गंगार्पण केल्यावर त्याचं ध्यान नेहमीसारखं जमलं. तपस्व्याची ही स्थिती होऊ शकते तर सामान्यांना भ्रम झाला तर नवल नाही.श्री महाराजांनी पैशाच्या आणखी एका गुणावर बोट ठेवलं आहे. ते म्हणाले, 'पैशाचं इतर गोष्टींसारखं जणू व्यसनच लागतं.' पण इतर व्यसनांना शारीरिक मर्यादा आहेत. पैशाला त्याही नाहीत. माणसाला त्याचं अजीर्ण होत नाही. त्यामुळं मूलत: अखंड समाधान मिळवायला जन्मलेला माणूस अहित नि तळमळ वाढवणारा पैसाच मिळवीत सुटतो.

श्री महाराज एके ठिकाणी म्हणतात, सत्कर्मातसुद्धा पैसा आला की त्यात बिघाड येतो. ही गोष्ट आपणही अनुभवली असेल. मुळात सत्कर्मं ही पैशावर फारच कमी अवलंबून असतात. पण ती वाढू लागली आणि ती करणाऱ्याचं पैशाविषयीचं हे पथ्य नि भान राहिलं नाही तर स्वाभाविकपणे तो जास्त लागायला लागतो नि मग तो ते सत्कर्मच बिघडवून टाकतो.व्यक्तिगत पातळीवर तर भरपूर पैसा आला म्हणजे भरपूर समाधान मिळेल ही कल्पना फोल ठरल्याचा अनुभव कित्येकांनी घेतला असेल. तो समाधानाऐवजी असमाधान, तळमळ, अशांतीच वाढवतो हेही आपण पाहिलं असेल. श्री महाराज म्हणत, 'पैशानं सुखी झाला असा मनुष्य मी आजवर पाहिला नाही.'

एकूण या 'पैशा'विषयी सावध असावं हे तर नक्कीच खरं !

*

७. शिकण्याची संधी

अनेकांना अनेक क्षेत्रांतला अनुभव असतो. काहींचा अनुभव आपल्या आपल्या क्षेत्रापुरता मर्यादित असतो. सर्वांनाच दुसऱ्याच्या क्षेत्रातले अनुभव घेणं शक्य नसतं. आपल्यासारख्या माणसांना, विशेषत: सर्वच माणसांना कोणत्या एका समान क्षेत्रातला अनुभव आहे म्हणून विचारलं तर सर्वांचं एका क्षेत्रातला अनुभव असल्याचं उत्तर येईल तो म्हणजे प्रपंचाचा. तो करण्याचा अनुभवात फरक असेल. पण हा अनुभव साधारणपणे कुणाला नाही असं नाही. खऱ्या संन्याशांचा सन्मान्य व विरळा अपवाद आपण बाजूला ठेवू. हा प्रपंचाचा सार्वत्रिक पसारा पाहाता,एखाद्याला आपण विचारलं की, त्यातून आपण काय शिकलो, तर मात्र उत्तरं वेगवेगळी येतील !

अनुभव एकच नि सार्वत्रिक असूनही 'त्यात काय शिकायचं असतं' इथंपर्यंत वेगवेगळ्या प्रतिक्रिया ऐकू येतील. याचं कारण असं की, प्रपंच हा आपण सावध असलो नसलो तरी होतो आहे. शिकणं मात्र जर तशी दृष्टी असली, सावधता असली तरच होत असतं.

श्री महाराज प्रपंचाला 'वर्कशॉप' किंवा 'प्रयोगशाळे'ची उपमा देत. ते म्हणत प्रपंच हे 'परमार्थाचं वर्कशॉप' आहे. ते एका बोधवचनात म्हणतात,'प्रपंच अभ्यासाकरिता आहे, शिक्षणाकरिता आहे !' या दृष्टीनं आपल्या रोजच्या प्रपंचाकडं पाहिलं तर मात्र प्रपंचाचं, दैनंदिन धावपळ-उलाढाल-व्याप करण्याचं डायमेन्शन म्हणजे परिमाणच बदलून जातं. तीच ती रोजरोजची म्हणून कधी कधी कंटाळवाणी वाटणारी तर काहींना अतिशय हौसेची वाटणारी गोष्ट एकदम बदलून जाते. अभ्यासामुळं कित्येक शाश्वत सत्यं नि तत्त्वं आपल्यासमोर येऊ शकतात. हे सारं दिसून येताच हेही लक्षात येतं की, अशा अभ्यासदृष्ट्या केलेल्या प्रपंचाचा परमार्थाशी विरोध

तर नाहीच उलट अशा प्रपंचाचं परमार्थाला पूरक नातंच आहे.

परंपरेनं प्रपंचाला तुच्छ लेखलं, कमी लेखलं आहे, त्याच्याकडं पाठ फिरवूनच परमार्थ किंवा अध्यात्म साधता येईल असं जे रूढ मत आहे किंवा आपली पक्की समजूत आहे, तीही चुकीची आहे असं लक्षात येतं. श्री महाराज तर म्हणत, 'प्रपंच सोडणं अशास्त्रीय आहे.' त्यांनी तो करणं हे परमार्थाला उपकारकच मानलं आहे. फक्त त्यांनी ही पुस्ती जोडली की, त्याचा परमार्थासाठी उपयोग करून घ्यावा. त्याचं मूल्य ओळखून तो करावा. याबद्दलची दिशा स्पष्ट करताना ते म्हणाले की, 'प्रपंच जरुरीपुरता करावा.' तो मालकीनं करावा. आपण दास्यत्वानं करतो. तो जसा सोडण्याकरता लावलेला नाही तसा तो भगवंताला विसरून जाण्याइतका करण्याकरताही लावलेला नाही. त्यामुळं परमार्थाचा विचार म्हणजेच प्रपंचाची हेळसांड होणार,त्याकडं दुर्लक्ष होणार, कर्तव्यात कुचराई होणार असे विचार मनात येऊन आपण जे बिचकतो तसं व्हायचं कारण नाही, एवढं स्पष्ट होतं.

श्री महाराज एकदा इंजिनिअरिंग कॉलेजमधल्या एका शिक्षकांना म्हणाले, तुम्हाला विद्यार्थ्यांना वर्कशॉपमध्ये शिक्षण द्यावं लागतं. त्यावर खूप खर्च होतो, खूप वस्तू बनतात, खूप वेळ जातो पण त्या लोहारकामाच्या किंवा सुतारकामाच्या वस्तू पाहिल्या तर मात्र त्यांना बाजारात जवळपास किंमत नसते. असली तर भंगाराच्याच जवळपास. तरीही वर्कशॉपमधलं शिक्षण हे अत्यावश्यकच असतं. कारण त्यातून उपयुक्त वस्तू बनवणं हा उद्देशच नसतो तर ते ते कौशल्य विद्यार्थ्यांना शिकवणं हा असतो. प्रत्यक्ष ती ती वस्तू बनवताना येणाऱ्या अडीअडचणी, बनवण्याची कृती, घ्यायची दक्षता या साऱ्याचा येणारा अनुभव महत्त्वाचा असतो. हे जसं आहे तसं, ते म्हणाले, आमचं प्रपंचाचं आहे.

परमार्थ साधायला मन आवरावं लागतं, आनंद मिळवायला वृत्ती सांभाळावी लागते, मीपणा सोडून सारी कामं करावी लागतात, वेळी मान-अपमान, निंदा-स्तुती सारं कसं शांतपणानं गिळावं लागतं, ही सारी परमार्थाची

तत्त्वं आहेत. त्यांचा नुसता अभ्यास पुरत नाही. जसं विद्यार्थ्याला पुस्तकात, वर्गात सर्व काही शिकवलेलं असतंच, तरीही त्याची प्रत्यक्ष 'वर्कशॉप प्रॅक्टिस' करून घ्यावी लागते, तसं या साऱ्या चांगल्या तत्त्वांचा अभ्यास झाला तरी ही सारी तत्त्वं प्रत्यक्ष जगताना सांभाळायला येण्यासाठी प्रपंचाचं वर्कशॉप चांगलंच उपयोगी आहे. इतकंच नव्हे ते अत्यावश्यकच आहे. पण वर्कशॉपमधून निर्माण झालेल्या वस्तूंना जशी कमी किंमत नि अपूर्णता असते तसंच या प्रपंचाच्या वर्कशॉपमधल्या वस्तूंचं, घटनांचं आहे हे लक्षात ठेवून तो केला तर त्याचा उपयोग आहे.

तसं पाहिलं तर खरोखरच प्रपंचात ही सारी तत्त्वं शिकायची खूपच मोठी संधी आहे. लोभाचा प्रसंग इथंच आहे, मोहाचाही आहे, मायेचा-ममतेचा आहे, स्तुती वाट्याला येते तशी निंदाही वाट्याला येते, मान-अपमान हे तर पदोपदी घडतात - यांतून जर आपली वृत्ती, प्रतिक्रिया सांभाळायच्या किंवा योग्य तशा घडवायचा प्रयत्न एखाद्यानं करायचा ठरवला, तर त्याला यासारखी शिकायची दुसरी संधी नाही. चार गोष्टी मनासारख्या नि सुखाच्या व्हायला लागल्यावर तोच प्रपंच आपल्याला किती गुंग करतो नि हवासा वाटतो ! पण त्याबरोबर आजारपणं, त्रास, मनाविरुद्ध घटना, अपयश असं घडायला लागलं की तोच प्रपंच किती त्रासाचा, उद्वेगाचा नि नकोसा वाटणारा होतो ! हा परमार्थाच्या दृष्टीनं महत्त्वाचा धडा प्रपंचाशिवाय कुठं आत्मसात करता येईल ?

या दृष्टीनं प्रपंचातल्या अगदी आपल्या जागी, घरी, गावी घडणाऱ्या साऱ्या घटनांचं निरीक्षण करीत राहू तर परमार्थाची तत्त्वं शिकण्याची त्यापेक्षा मोठी संधी कुठली ? त्यातूनच समाधानाची विद्या अवगत होईल. म्हणून एका बोधवचनात श्री महाराज म्हणतात, 'माणूस प्रपंचात जसा तयार होईल तसा जंगलात जाऊनही होणार नाही !'

*

८. समाधान आणि परिस्थिती

आपण नेहमी अशी वाक्यं ऐकतो की, माणूस सारं करतो ते पोटासाठी ! कुणी म्हणतं की, आपण सारं करतो ते पैशासाठी ! कुणी प्रसिद्धीसाठी, कुणी प्रतिष्ठेसाठी-अशी अनेक वाक्यं आपल्याला पदोपदी ऐकायला मिळतात. आपण ती हरघडी बोलतो, ऐकतो नि सोडूनही देतो. पण विचार केला तर अशी शंकाही येते की, खरंच माणूस ही सारी धडपड कशासाठी करतो ? की वर उल्लेख केलेल्या गोष्टींसाठीच तो सारं करतो?

क्षणभर पोटभर जेवणाची गोष्ट घ्या. एखादा माणूस त्यासाठी सारं करील. पोट भरल्यावर त्याला आनंदही होईल. पण मग तो ही सारी धडपड पोटभर जेवणासाठी करतो आहे असं म्हणता येईल का ? क्षणभर समजा की, त्याला काही आजार आहे आणि डॉक्टरांनी सांगितलं की, दोन घास कमी जेवा, तर तो दोन घास कमी जेवील. आता तो पोटभर जेवीत नाही, याचं कारण काय असावं ? तर आता आनंद पोटभर जेवण्यात नाही, कारण त्यानं समाधान बिघडेल, आनंद जाईल. तो टिकवण्यासाठी तो आता कमी जेवील.

म्हणजे तो पोटभर जेवावं म्हणून हे सारं करीत नाही, त्यातून मिळणाऱ्या आनंदासाठी तो हे करतो. म्हणजे वर उल्लेखलेला - पैसा, पोट, प्रसिद्धी, प्रतिष्ठा - इतर कशासाठी नसून त्यातून मिळणाऱ्या आनंदासाठी - समाधानासाठी ही सारी धडपड आहे, नाही का ?

असा समाधानाचा पाठलाग सामान्य माणूस आयुष्यभर करतो. निरनिराळ्या वस्तू घेतो, पदार्थ करतो, माणसं जोडतो, घटना पार पाडतो, शिकत राहतो, उद्योगधंदा करतो, संसार करतो - साऱ्या धडपडीत मूळ पाठलाग सुखाचा, समाधानाचा असतो. प्रत्येक ठिकाणी ते त्याला मिळेल

असं वाटतं. ते त्याला थोडंफार लाभतंही. पण पुन्हा निराशेचा अन् दु:खाचा अंधार पसरतो. पुन्हा तो दुसऱ्या गोष्टीच्या मागं धावतो. पुन्हा तो बाहेरच्या जगात, परिस्थितीत घडामोड करून, ती बदलून समाधान मिळवण्याच्या उद्योगाला लागतो.

सारांशानं असं लक्षात येईल की, बाह्य परिस्थिती किंवा आपली परिस्थिती बदलली की, आपल्याला समाधान होईल असं त्याला सारखं वाटत राहातं. म्हणून वेगवेगळ्या साधनांच्या मार्गानं तो ही परिस्थिती बदलण्याचा आयुष्यभर प्रयत्न करीत राहातो. जन्मभर हे जाणता-अजाणता तो करतो आणि एके दिवशी थकून जातो.

श्री महाराज म्हणत की, 'संतांनी या समाधानाचा शोध लावला आहे.' समाधान हा वृत्तीचा गुण आहे. देहाचा नव्हे. मग आपल्याकडं अंत:करणात वृत्ती आहेतच. मग आपल्याला समाधान का मिळत नाही ? त्याचं कारण असं की, या वृत्ती स्थिर नाहीत. त्या परिस्थितीवर अवलंबून आहेत. त्यामुळं होतं असं की, परिस्थिती अशी आहे ती तशी झाली की आपल्याला समाधान मिळेल असं वाटतं. आपल्याला हव्या अशा, अनुकूल परिस्थितीमध्ये आपल्याला वृत्ती समाधान असल्याचा अनुभव देतात. पण परिस्थिती सतत बदलत असते. ती बदलून प्रतिकूल, नकोशी झाली की वृत्ती अस्थिर होतात, असमाधानाची, दु:खाची अनुभूती येते.

श्री महाराज यावर मूलगामी भाष्य करताना एका बोधवचनात म्हणाले, 'समाधान कोणत्याही परिस्थितीत टिकवता येतं आणि कोणत्याही परिस्थितीत राहत नाही !' मथितार्थ असा की, परिस्थितीशी आपण आपलं समाधान जे जोडून ठेवलं आहे तेच चुकीचं आहे. समाधानी असणं ही एक परिस्थितीनिरपेक्ष वृत्ती, परिस्थितीनिरपेक्ष गोष्ट आहे, म्हणून सर्व सत्पुरुषांजवळ ती आहे. सारे खरे सत्पुरुष हे अखंड समाधानात असतात आणि आमच्याकडं मात्र त्याचं सदाचं दुर्भिक्ष आढळतं.

सत्पुरुषाकडं समाधान असतंच, पण ते देण्याची विद्याही असते.

दुर्दैव असं की, आपल्यालासुद्धा खरं पाहाता समाधान हवं असतं. तरीपण आपल्यावर कल्पनांचा, परिस्थिती बदलून समाधान मिळवण्याचा लहानपणापासूनचा एक पगडा असतो. कदाचित तो अनेक जन्मांपासूनचाही असेल. त्यामुळं या खऱ्या समाधानाची कल्पना असूनसुद्धा आपल्याला भ्रम होतो. त्या असूनही केवळ भ्रमापोटी आपण समाधान देऊ शकतील अशा वस्तू, अशा घटना, अशी माणसं सत्पुरुषांकडं मागतो. त्यानं समाधान होईल असं अर्थातच आपल्याला वाटतं.

पण त्यातून पुन्हा असमाधानाची आपणच तरतूद करतो, हे भ्रमामुळं लक्षात येत नाही. कारण हे मागून, समाधान परिस्थितीवर अवलंबून ठेवल्याचं आपण कबूलच करतो. जे कधीच खरं नसतं. श्री महाराज एके ठिकाणी म्हणाले, 'माणूस समाधानाशिवाय इतर सर्व गोष्टी मागतो. पण त्या सर्व गोष्टी समाधानाची बरोबरी नाही करू शकत. मग माणूस समाधान का मागत नाही ?'

वास्तविक समाधान हे आपलं मर्यादित आकलन विशाल करून टिकवण्याचा विषय आहे. ते टिकवायचं ठरवलं तर कुठल्याही परिस्थितीत राहातं. ते व्यवहारात फायदा झाला तरी टिकवता येतं आणि तोटा झाला तरी टिकवता येतं.

व्यवहारात आपण पाहातो ना, जो दुसऱ्यावर अवलंबून असतो त्याला असमाधान असतं. पराधीनपणात असमाधान असतं. मग यातून सामान्य प्रजाजनही सुटत नाही अन् सत्ताधीश राजाही सुटत नाही. बाह्य गोष्टींनी लांबून पाहाणाऱ्याला उगीचच वाटतं की, आपल्याकडं या या गोष्टी नाहीत म्हणून आपण असमाधानी आहोत. मग त्या साऱ्या ज्या दुसऱ्या माणसाकडं आहेत म्हणजे तो समाधानी असला पाहिजे. पण त्याची अवस्था त्याहीपेक्षा बिकट असते. तो त्यापलीकडच्या चिंतेत अन् असमाधानात असतो.

अशाच एका गरीब माणसाला वाटे की, तो शेजारचा माणूस खूप

श्रीमंत आहे, सारी सुबत्ता आहे, तो नक्कीच खूप समाधानात असला पाहिजे. त्याच्या गुरूनं त्याला म्हटलं, तुला पाहायचं आहे का ? आपण श्रीमंताकडं जाऊ ! ते तिथं गेले तर श्रीमंत मनुष्य असमाधानात तळमळत असलेला दिसला. गरीब माणसाला आश्चर्य वाटलं. गुरूनं त्या श्रीमंताला विचारलं, 'तुझी तब्येत उत्तम आहे, मुलंबाळं - परिस्थिती सारं काही उत्तम आहे, मग तू का असमाधानात आहेस ?' तो म्हणाला, 'ते सारं आज आहे खरं,पण ते उद्या टिकेल की नाही, टिकेल की नाही या चिंतेनं मी सतत बेचैन असतो !'

एकूण समाधान परिस्थिती बदलण्यात नसून वृत्ती स्थिर करण्यात नि दृष्टी बदलण्यात आहे, हे ओळखून जो राहील त्याला ते बसल्या जागी मिळेल, हे मात्र खरं !

*

९. मौनाचा परिणाम

आपण 'न बोलणं' म्हणजे सामान्यतः 'मौन' समजतो. त्यातून पुढं 'मौन धरणं' वगैरे व्रत येतं. मग ते मौन काही तासांचं, दिवसांचं, आठवड्यांचं किंवा त्याहीपेक्षा जास्त - अशी व्रतं आणि नेम आढळून येतात. अशा मौनानं अनाठायी बोलण्यात जाणारी शक्ती वाचते हेही थोडंफार खरं आहे. अनेकदा असं अनावश्यक बोलणं बोललं न गेल्यानं, ऐकणाऱ्यांचा त्रास अन् वेळ वाचतो, हेही खरंच आहे. त्यामुळं कसंही पाळलं तरी मौनाचा परिणाम होतो, हे खरंच आहे. पण श्री महाराज म्हणाले, 'मौनाचा परिणाम फार होतो' यामधला अर्थ मात्र अधिक खोल नि व्यापक आहे.

आत्ताच आपण पाहिलं ते वाचेचं मौन माणसाच्या आयुष्यात महत्त्वाचं आहेच. काही माणसांना जास्त बोलण्याची सवय नसते. वाचा ही माणसाची एक मूल्यवान शक्ती आहे. अशी माणसं ही शक्ती जपून वापरतात. तिचा योग्य वेळी आवश्यक तेवढा वापर करून त्या शक्तीचा अपेक्षित परिणामही ही माणसं साधू शकतात.

पण आपण काही वेळा घरात असं पाहिलं असेल की, मुलं एखादी चूक करतात. एखादी वस्तू हरवतात. मोडतोड करतात. अयोग्य वागतात. त्यावेळी त्यांनाही अपेक्षित असतं की, घरी आल्यावर वडील आपल्याला बोलतील, आपली खरडपट्टी काढतील. वडिलांना सारं कळतं. तरीही ते एखादवेळेस मौन धारण करतात. अशा वेळी मुलाला त्याचाच त्रास होतो. त्याला रागाचे चार शब्द ऐकणं परवडतं, पण ते मौन परवडत नाही. त्या 'न बोलण्यानं' तो घाईला येतो, स्वतःची चूक आपण होऊन कबूल करतो, पश्चात्ताप पावतो. प्रत्यक्षात कदाचित खूप बोलूनही त्यानं चूक कबूल केली नसती, पण ते काही न बोलतासुद्धा साधलं जातं. व्हायला हवा तो मूळ

परिणामही साधला जातो. त्यासाठी किती शब्द वापरले जातात ? एकही नाही. या प्रकारच्या मौनाचा परिणाम आणि अनुभव आपल्यालाही असेल.

साधा शब्द न वापरण्याचा एवढा परिणाम घडतो तर ज्यावेळी मौनाला अधिक व्यापक नि खोल अर्थ प्राप्त होईल तेव्हा त्याचा परिणाम किती मोठा नि दूरगामी असेल, याची कल्पना आपण करू शकतो. माणूस ज्या ज्या क्रिया करतो, त्यातली बोलणं ही एक क्रिया आहे. ती क्रिया संयत करण्यानं, थांबवण्यानं तो अनेक परिणाम साधतो. ज्या वाचेच्या क्रियेसंबंधी आपण पाहिलं त्या बाबतीतसुद्धा आपण सुरुवातीला म्हटलं तसं नुसतंच बोलणं बंद करणं म्हणजे मौन होईल का ? न बोलण्यानं होणारे तोटे पाहिले तर मौनाचा एवढाच अर्थ घेणं पुरेसं होणार नाही. मौन म्हणजे जे न बोललं तर चालेल ते न बोलणं. खरं मौन म्हणजे जरूर असेल तेव्हाच बोलणं. म्हणूनच जगाच्या हितार्थ नाईलाजानं आयुष्यभर बोलूनसुद्धा सत्पुरुषांचं मौन कधी भंग पावत नाही. पण आपण सामान्य माणसं मौनाचा शब्दशः अर्थ घेऊन त्यापासून साधणाऱ्या उपयोगापेक्षा उपद्रवच निर्माण करतो.

एक भगिनी दररोज दोन तासांचं मौन पाळीत. त्या दोन तासांत त्या अवाक्षर बोलत नसत. पण एकदा का ते दोन तास संपले की, बोलणं इतकं उफाळून येई की, विचारता सोय नाही. मग त्या दोन तासांचं उट्टं निघे. असल्या मौनाचा कसला परिणाम अन् कुठला शक्तिसंचय ? तसंच एका गृहस्थांचं. ते जेवताना मौन पाळीत, पण प्रत्येक पदार्थ घेण्यासाठी नि तो किती वाढावा हे सांगण्यासाठी शेजारच्या पाण्याच्या तांब्यावर पाणी प्यायचं भांडं आपटून, विशिष्ट वेळा विशिष्ट पद्धतीनं आपटून, सूचना देत. अशा मौनापेक्षा पदार्थ सरळ मागून घेऊन खाल्ला आणि भुकेपेक्षा दोन घास कमी जेवलं तरी प्रकृतीलाही ते अधिक हिताचं होईल, नाही का ?

याच उदाहरणात बारकाईनं पाहिलं तर जेवणाची क्रिया दोन घास आधी थांबवणं म्हणजे मौन होईल. अशा आपल्या विविध क्रिया संयत करणं, आवरणं म्हणजे मौनाचा व्यापक अर्थ होईल, जो आपल्या जीवनाच्या

सर्वांगाला स्पर्श करणारा ठरेल.

माणूस तर अखंडपणे विविध प्रकारच्या क्रिया करतो आहे. अशा वेळी त्या त्या क्रियांमध्ये मौन साधणं हे किती व्यापक अन् परिणामकारक होईल ! वाचेचं आहे तोवर छोटंसंच वाटणारं हे मौन क्रियेचं झालं की किती व्यापक होईल ! आपण व्यवहारात अनेकदा पाहिलं असेल की, घरात मुलं मोठी होतात, कर्ती सवरती होतात, सर्व दृष्टीनं समर्थ होऊन प्रपंचाच्या जबाबदाऱ्या पेलू लागतात. अशा वेळी वय होऊन, क्षमता कमी होऊन आवश्यकता नसतानासुद्धा मागच्या पिढीतली वयोवृद्ध माणसं सारी सूत्रं आपल्या हातात ठेवून कर्तेपणाची लुडबूड चालू ठेवतात आणि त्यामुळंच अप्रियही होतात. या ठिकाणी त्यांच्या कर्तेपणाच्या आजवरच्या क्रियेला आता मौनाची जोड हवी आहे. यावर टिप्पणी करताना श्री महाराज एके ठिकाणी म्हणाले, 'वय झाल्यावर प्रपंचात मुळीच लक्ष घालू नये.'

हा तर निवृत्तीनंतरचा प्रकार ! पण तीच गरज खरं तर उमेदीतल्या वयातही एका वेगळ्या प्रकारे असते. श्री समर्थ कार्यकर्त्या महंताला कार्य करतानासुद्धा नियमितपणे एकांत सेवन म्हणजेच त्या रूपानं अनेक अर्थानं मौनसेवन अपरिहार्य मानतात. श्री महाराज म्हणत, 'सतत काहीतरी करणाऱ्यानं काही काळ काही करू नये.' यानं अलिप्तता साधते, तटस्थ आकलन होतं, पुढच्या अनावश्यक पण सहज घडू शकणाऱ्या क्रिया वेळीच टळतात. असे मौनाचे थांबे न घेता ज्या गाड्या सुसाट पळत सुटतात त्या अखेर कर्मकचाट्यात एक दिवशी राम म्हणतात. उलट अधिक व्यापक अर्थानं कुठलंही कर्तव्यकर्म करून त्यातून कर्तेपणानं, अलिप्ततेनं, निरपेक्षतेनं बाजूला होणं म्हणजे मानसिक मौनच नाही का ?

म्हणून या मौनाचा अभ्यास साध्या प्रापंचिकालाही फायद्याचा आहे. परमार्थदृष्ट्या जागृत प्रापंचिकाला तर आहेच आहे. म्हणूनच तर श्री महाराजांनी मौनाच्या व्यापक परिणामांकडं आपलं लक्ष वेधलं आहे.

*

१०. आपलं घर

आपलं घर हा ज्याच्या त्याच्या जिव्हाळ्याचाच विषय असतो. अगदीच ज्यांना घरी जाणं संकट वाटतं किंवा आपलं घरच नाही किंवा आपलं घर 'आपलं' वाटत नाही अशांचा अपवाद क्षणभर बाजूला ठेवू या. पण बाकी सर्वांनाच आपलं घर हा जिव्हाळ्याचा विषय तर असतो. त्या घरासाठीच त्यांची सारी धडपड सुरू असते. आपल्या घरासाठी माणूस खस्ता काढतो, अपमान गिळतो एक ना दोन, नाना गोष्टी करतो. हा अनुभव आपल्यासारख्या प्रापंचिकांना नक्कीच नवीन नाही.

अर्थात आपलं घर म्हणताना सामान्य माणसालासुद्धा चार भिंतींचं घर अन् त्याचबरोबर त्याच्या घरातली चार माणसं हेही अभिप्रेत असतं. हे दोन्हीही गृहीत धरून तो बोलत असला तरी 'आपल्या घरा'साठी तो जी धडपड करीत असतो, ती कशी करतो, हे पाहाणं मोलाचं ठरेल. आपणसुद्धा आपल्या घरासाठी प्रयत्न करतो त्यावेळी तो जो काही बंगला, फ्लॅट, घर, झोपडी असेल ती अधिकाधिक चांगली, आकर्षक, सोयीची कशी होईल यासाठीच जास्त प्रयत्न करीत असतो.

अशा वेळी दुसरं चांगलं घर पाहून त्यानुसार सोयी, वस्तू आपल्याकडं घेणं, डागडुजी, दुरुस्ती, रंग, गिलावे अशा अनेक प्रकारांनी आपलं घर अधिक चांगलं करण्यासाठी आपण धडपडतो. पण हा जितका जाणीवपूर्वक प्रयत्न आपण करतो, त्याच्या काही प्रमाणात तरी जाणीवपूर्वक प्रयत्न, आपण आतल्या वातावरणासाठी आणि ते निर्माण करणाऱ्या नि घराला घरपण देणाऱ्या माणसांसाठी करतो का, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे !

असं म्हटल्यावर अर्थातच सामान्यपणे अशी प्रतिक्रिया होईल

की,'नाही कसं ?' आम्ही जसं चार भिंतींच्या घरासाठी धडपडतो तसं आतल्या माणसांसाठीसुद्धा खूप कष्ट करतो. घरातली माणसं सुखी व्हावी म्हणून प्रयत्न करतो. पण यातूनच हा प्रश्नही पुढं येतो की, आपण 'सुखी होणं' कशाला समजतो ? त्या सर्वांना किंवा आपल्या सर्वांना खायलाप्यायला भरपूर असणं, कपडेलत्ते असणं, करमणूक-मनोरंजनाची साधनसामग्री असणं, घरातल्या लग्नकार्य, समारंभ यांसारख्या घटना व्यवस्थित पार पडणं, चार पैसे गाठीला शिल्लक असणं - आपली अशा स्वरूपाची, माणसांनी सुखात असण्याची, साधारण कल्पना असते.

पण आपण अशीही खूप घरं पाहिली असतील की, जिथं वरच्या सगळ्या गोष्टी आहेत, पण घरात काळजी, असमाधान, तळमळ आहे. याचाच अर्थ घरात समाधान, आनंद नांदणं हे त्या घराचं खरं घरपण म्हणावं लागेल.

या पार्श्वभूमीवर श्री महाराज म्हणत,'आपलं घर सुगंध्याच्या घरासारखं असावं. सुगंध्याचं घर चार घरं आधीपासूनच कळतं आणि चार घरं ओलांडेपर्यंत लक्षात राहातं. आपल्या घरात नि:स्वार्थी प्रेम, आनंद, समाधान एवढं असावं की, आपल्याकडं येणाऱ्या माणसाला त्याची ओढ वाटावी. सहज येऊन जाणाऱ्याच्यासुद्धा ते लक्षात राहावं.'

असं समाधान घरी पसरायचं म्हणजे ती काही उदबत्तीसारखी गोष्ट नाही की, जी बाजारातून घ्यावी नि घरी आणून लावून मोकळं व्हावं. घरातल्या साऱ्या माणसांना जर समाधान असेल, त्यांच्या दैनंदिन व्यवहारात त्याचं प्रतिबिंब पडत असेल तर ते घरात पसरेल. घरात रोज एकत्र राहणारा माणूस असा आनंदी असणं हे एक परीनं कठीणही आहे. कारण जगामध्ये एक वेळ मनुष्य आनंदी दिसेल, राहील. चारचौघांत मनुष्य आपली चांगली प्रतिमा टिकवण्यासाठी का होईना किंवा बाह्य कायदेकानूंच्या बंधनानं का होईना मन आवरून, नि:स्वार्थीपणानं, प्रेमानं राहील, आनंदानं राहील.

पण घरी ही बंधनं कमी असतात. तिथं त्याचा खरा स्वभाव वर

येईल. तो स्वार्थीपणानं लोभमोहाच्या आहारी जाऊन वागेल. अर्थातच स्वत:ही असमाधानी होईल अन् इतरांनाही करील. म्हणूनच श्री महाराजांचा घरातल्या वागण्यावर, घरात समाधान आणण्यावर भर आहे.

उदाहरणानं पाहायचं तर ऑफिसमधल्या सहकाऱ्यांबद्दल तो त्याचं कर्तव्य करील. त्यांनी त्याच्या अपेक्षा पुऱ्या केल्या तरी ठीक, न केल्या तरी ठीक, पण हीच भूमिका त्याला आपल्या मुलामुलीबद्दल, पतीपत्नीबद्दल वा नातवंडाबद्दल ठेवणं कठीण जाईल. तिथं तो हक्कानं अपेक्षा ठेवील. पुरी न झाली की दु:खी नि असमाधानी होईल. हा अनुभव आपल्यालाही आला असेल. म्हणून घरची आपली स्थिती कशी आहे, कशी असावी यावर श्री महाराजांचा भर आहे. ते म्हणत, 'घरच्या इतके स्वार्थी संबंध बाहेर नाहीत.'

त्यामुळं तिथं साधलं तर ते बाहेरही साधेल नि आपलं घर जसं व्हायला हवं तसं होईल. ते तसं आनंदमय व्हायला श्री महाराजांच्या आणखी काही सुवचनांचीही मदत होते. श्री महाराज म्हणत 'घरात शांतता टिकायला हवी असेल तर ती बिघडायला आपण कारणीभूत होऊ नये.' या वचनातला अभिप्राय खरोखरच मार्मिक आहे.

अनेकदा आनंद बिघडायला माझ्या व्यतिरिक्त सारेच जबाबदार असतात असं वाटतं, घरात शांतता किंवा आनंद टिकवायला इतरांनी काही करण्याची गरज वाटते. अशा वेळी या विचारानं आपलं मन आवरेल, योग्य ती विधायक कृती घडेल. यातून मनाला मुरड घालण्याची, दुसऱ्याला समजून घेण्याची, त्याच्या स्वभावालाही सवलत ठेवायची सवय लागेल. ज्यातून स्वाभाविकच घरातले संघर्ष कमी होतील. आनंद वाढेल.

श्री महाराज तर म्हणत, घरातल्या माणसांवर 'प्रवासातल्या माणसांइतकाच विश्वास ठेवावा !' म्हणजेच हक्क, अपेक्षा यांबाबत प्रवासात भेटणाऱ्या माणसासारखं राहिलं तर त्रास होत नाही. त्यांनी प्रवासातल्या माणसांचं उदाहरण देण्यातला मार्मिकपणा आपण लक्षात घेण्यासारखा आहे. प्रवासाचा अनुभव आपल्याला असतो. पण त्याकडं महाराज पाहतात तसं

आपण पाहिलेलं नसतं. प्रवासात मनुष्य कधी भेटेल, किती काळ बरोबर राहील आणि कधी प्रवास सोडून निघून जाईल, हे सारं अनिश्चित असतं. घरात मात्र या अनेक गोष्टींबद्दलच्या आपल्या कल्पना ठाम असतात. निश्चित अपेक्षा असतात. त्या पुऱ्या झाल्या नाही की, घरात अशांती होते. अशा प्रसंगी आपण प्रवासातल्या माणसांबरोबर कसं वर्तन करतो, हे आठवावं. तिथं सहवास असतो पण अपेक्षा नसतात. बरोबर असलं, ऐकलं, जेवलं खाल्लं, तरी आनंद असतो. मनुष्य आपल्या स्टेशनवर उतरून गेला तरी आपला प्रवास पुन्हा आहे तसा सुरू राहातो. प्रवासात आपण टाकलेला विश्वास आणि बाळगलेल्या अपेक्षा यांचा अंमल जर आपल्याला प्रपंचातल्या माणसांबद्दल करता आला, तर आता शांतता किती टिकेल, याचा आपणच विचार करून पहावा.

ते आणखी एका ठिकाणी म्हणतात, 'मी कुटुंबाच्या म्हणजे इतरांच्या-सोयीसाठी आहे, अशा भावनेनं घरातल्या प्रत्येकानं राहिलं तर घरात समाधान नांदेल.' दुसरा तसा वागेल की नाही कुणास ठाऊक, पण आपण स्वत: या भूमिकेनं राहिलो तरी घरातला बराच त्रास कमी होऊन आनंद वाढेल.

श्री महाराजांच्या या आणि अशा अनेक वचनांतून बोध घेऊन आपण वागू तर आपलं घर खरोखरच आनंदाच्या सुगंधाचं घर होईल, भगवंताला प्रिय होईल, स्वत:लाही समाधानचं होईल नि येणाऱ्यांनाही !

*

११. संधीत रूपांतर

ज्याला अखंड आनंदाच्या विद्येची थोडीफार गोडी लागते तो माणूस अंतरंगात बदल करण्याच्या या अभ्यासाला लागतो. पण त्यानं काही साधन करायचं ठरवलं तरी त्यात काही ना काही प्रापंचिक स्वरूपाच्या अडीअडचणी येतच राहतात. अनेकदा साधक त्यामुळं नाउमेदही होतो. त्यातून त्याला मार्ग गवसत नाही. अडचण तर खरी असते. अशा वेळी श्री महाराजांची काही वचनं अडचणीतून मार्ग काढायला नि त्यांचा परिहार करायला आणि पुन्हा आपलं साधन साधायला खूप उपयोगी पडतात.

'बरे झाले देवा निघाले दिवाळे' असं म्हणून दिवाळंसुद्धा पचवणाऱ्या नि परमार्थ त्यातूनही पुढं नेणाऱ्या श्री तुकोबांची आठवण इथं अपरिहार्यपणे होईल. प्रतिकूल प्रपंचात अखंड अडचणींचं रूपांतर परमार्थाला अनुकूलच करून श्री तुकोबांनी केवढी विद्या समोर ठेवली ! त्याच्या उलट श्री एकनाथांचा प्रपंच. पण सारं व्यवस्थित म्हणून ते परमार्थ विद्येत राहिले. कारण तुमचं उद्दिष्ट काय आहे, यावरही अनुकूल-प्रतिकूल ठरत नाही का ? प्रपंचात कुठलीच अडचण नाही, त्यात कोणतीच प्रतिकूलता नाही हीसुद्धा खऱ्या आनंदाच्या अभ्यासकाला तशी अडचण ठरेल नि तिचा परिहार कसा करावा हा प्रश्न पडेल. पण त्याचं उत्तर नाथांकडून शिकता येईल.

श्री महाराजांनी तर व्यवहारात निर्माण होणाऱ्या अडीअडचणींकडं बघण्याचा मांडलेला आणखी एक दृष्टिकोन पाहू.

एकदा गोंदवल्याला खूप माणसं जमलेली होती. रात्री अनपेक्षितपणे खूप जोराचा पाऊस झाला. सर्वत्र पाणी झालं. लोकांना झोपायला कोरडी जागा राहिली नाही. लोकांना ही मोठीच अडचण वाटली. आता काय होणार, रात्र कशी काढायची अशा नाना शंका सुरू झाल्या. हे पाहून श्री

महाराज म्हणाले, 'ही अडचण नाही. उलट नामस्मरणाला नि भजनाला सुसंधीच आहे. प्रत्येकानं दुसरा निजला की नाही हे पाहिल्याशिवाय झोपू नये. एरवी नाम घ्यायची खूप इच्छा असते. मोकळा वेळ कमी पडतो. आज पुरी रात्र आपल्या हाती आहे. तिचा नामाला नि भजनाला उपयोग करून हरिजागराचा आनंद लुटावा !' असे एक ना दोन अनेक प्रसंग वेगवेगळ्या अडीअडचणींच्या स्वरूपात व्यवहारात सर्वांवर येतच असतात. पण त्याचंच संधीत रूपांतर करता येणं ही एक महत्त्वाची कला आहे. याची मात्र सर्वांना कल्पना असतेच असं नाही.

तसं आपल्या पुढल्या अडचणींकडं बारकाईनं पाहिलं, तर मात्र आपल्याला असं दिसून येतं की, अशा परमार्थाच्या कामालाच जरा जास्त अडचणी दिसतात आणि प्रपंचाची कामं त्यापेक्षा खूप असूनसुद्धा त्यामानानं कमी अडचणी येऊन पार पडत असतात. असं वर वर पाहाता आपल्याला दिसतं. पण बारकाईनं आणि प्रामाणिकपणानं पाहिलं तर मात्र असं लक्षात येईल की, तशा खूपच अडचणी प्रापंचिक कामांतही येतात. पण आपली त्या कामाची तळमळ इतकी जोराची असते की, आपण त्यावर काही ना काही मार्ग काढतो, काढू शकतो. पण या विषयाची मात्र मुळात तळमळच कमी पडल्यानं अडचणी थोड्या असल्या तरी जास्त वाटतात नि सोप्या, नेहमीच्या असल्या तरी अवघड भासतात. अशा अडचणींकडं वर दिलेल्या पद्धतीनं पाहिलं तरी अशा अडचणींची तीव्रता नि प्रमाण कमी होतं.

पण काही काही परिस्थितीत मुळातच त्रुटी असते. पण ही सुसंधीत रूपांतर करायची विद्या शिकलेले लोक, साधक तीच परिस्थिती आपल्याला, आपल्या साधनेला अनुकूल बनवू शकतात. एका गृहस्थांना पूर्वी चांगलं ऐकू येई, तेव्हा ते प्रवचन ऐकणं, भजन ऐकणं अशा स्वरूपाची साधनं करीत असत. पण दुर्दैवानं त्यांना ऐकू येईनासं झालं. दुसरासा असता तर त्यावर तो खंत करीत बसला असता, सर्वांवर चिडचिड करीत राहिला असता, दैवाला दोष देत राहिला असता. त्यांना विचारलं तर ते म्हणाले, तसं

करायचं काही कारणच नाही. इतकी वर्षं खूप ऐकायला मिळालं. आता त्याचं मनन करायचा काळ आला. पूर्वी ऐकू येई, त्यामुळं मनात असो नसो, बाहेरचे विषय, विचार, शब्द, सूर कानांवर पडतच असत. त्यामुळं मनात असूनही एकाग्रता व्हावी तशी होत नसे. आता तर एकाग्रतेचा प्रश्नच नाही. स्वत:शी पूर्ण संवाद, प्रगतीला तर हे फारच बरं वाटतं ! तसं पाहिलं तर ही त्रागा करायची गोष्ट. पण ही रूपांतराची विद्या मोठी गुणकारी आहे !

गजबजाटात, गजबज गोंगाट फार म्हणून, माणूस साधन करत नाही. बंगलेवाला, बंगल्यात फारच निवांतपणा इतका की, त्यामुळं लक्ष लागत नाही - म्हणून साधन करत नाही. उलट गोंगाटात आपल्याला कितपत जमतं हे पाहाण्याची संधी तिथं आहे तर, निवांतपणाचा उपयोग होऊन साधन पुढं जावं म्हणून संधी इथं आहे.

प्रश्न भक्ताच्या किंवा साधकाच्या दृष्टिकोनाचा आहे. प्रख्यात संत नरसी मेहतांची पत्नी वारली. ते म्हणाले,'भलूं थयुं !' होती तरी भक्तीला, साधनेला छान होतं. गेली तरी थोडकी माया आणखीच कमी झाली, म्हणूनही साधनेला छानच झालं !

आपली दृष्टी असेल, खरंच इच्छा, साधन असेल तर साधनेला मार्ग मिळण्यासाठी रस्ता सदैव मोकळा असतो. मात्र अग्नीसारखी तळमळ हवी. कितीही दाट जंगलासारखी परिस्थिती असली तरी अग्नी स्वत:साठी रस्ता तयार करून घेतो. तसं कशीही परिस्थिती आली, अडचण आली तरी साधकाला तिचा उपयोग कसा करून घ्यावा नि पुढं कसं जावं याची तोड सुचेल. एका गृहस्थांना आजारी पडल्यानं सामुदायिक नामाला येता येत नसे. ते म्हणाले, आता उलट मी नाम घ्यायला घरी चोवीस तास मोकळा झालो आहे ! म्हणून श्री महाराजांनी अडचणींचं संधीत रूपांतर करण्याची जी युक्ती सुचवलेली आहे ती लक्षात ठेवली तर खरंच उपयोगी ठरेल !

*

१२. हिंसा

हिंसा म्हणजे आपल्या डोळ्यांसमोर युद्ध, संघर्ष किंवा आजच्या काळात बळावलेला अतिरेकीपणा किंवा त्यामुळं घडणाऱ्या हत्या उभ्या राहतात. या हिंसा आहेत की नाही ही फार विचार करून ठरवण्याची गोष्ट नाही. अत्यंत सामान्य माणसांचा तसा अशा हिंसेशी संपर्क कमीच येतो. पण साऱ्याच परिस्थितींतल्या गरीब-श्रीमंत, उच्च-नीच, प्रपंची-संन्याशी अशा सर्व परिस्थितींतल्या माणसांचा हिंसेच्या एका दुसऱ्या विशाल जगाशी मात्र नकळत खूप संबंध येतो, हे म्हटलं तर आपल्याला आश्चर्य वाटेल.

ही हिंसा मानसिक स्वरूपाची आहे. ती माणसाला कृतीनं, शब्दानं, साध्या कटाक्षानंसुद्धा दुखावून घडते. बाण सुटतो तिथं खूण राहत नाही, पण जिथं लागतो तिथं जखम होते, असं आपण नेहमी ऐकतो आणि ते खरंही आहे. पण परमार्थाच्या दृष्टीनं मात्र जिथून बाण सुटतो तिथंही त्याचा परिणाम होतो आणि साधनेला, परमार्थाच्या वाटचालीला घातकच असतो. म्हणून साधकाला दोन्ही बाबतीत काळजी घ्यावी लागते. आता एखाद्याला प्रत्यक्ष मारलं, लागलं तर ते एक वेळ निसर्गनियमानं थोड्याफार काळात भरून निघेल, नाहीसं होईल. पण एखाद्याच्या अवमानानं किंवा त्याला लागेलसं बोलल्यानं झालेली हिंसा किंवा परिणाम हा एक ना दोन अनेक वर्षंसुद्धा राहील, टिकेल. त्याची तीव्रतासुद्धा काळाप्रमाणं कमी होईल असं नाही, ती एखादेवेळेस वाढेलसुद्धा.

यावर श्री महाराज एका वचनात म्हणतात, 'मारल्याची हिंसा क्षणभर आहे पण दुखावल्याची जाणीव जन्मभर राहते.' इकडं नित्याचा व्यवहार पाहिला तर अनेकांना असं दुसऱ्याला टोचून बोलण्यात, टोमणे देण्यात, अवमान करण्यात, दुसऱ्याची खिल्ली उडवण्यात काही गैर तर भासताना

दिसत नाहीच, उलट त्यांना त्यात आनंदच वाटतो. किंबहुना अशा तऱ्हेनं दुसऱ्यांना त्रास देणं, दिल्यानंतर तो झालेला पाहाणं हे तर अनेकदा अनेकांचं आनंदाचं साधन बनलेलंसुद्धा आपण पाहातो. पण यात दुसऱ्याच्या मनाला अकारण किंवा स्वत:च्या मौजेखातर किती वेदना होत असतात किंवा किती दु:ख होत असतं याची कल्पनाच केलेली बरी.

शारीरिक हिंसेचा परिणाम स्थूल असल्यानं तो लगेच दिसतो. टोचलं, कापलं की जखम झालेली दिसते, रक्त आलेलं दिसतं. पुढं ते उपचारांनी कमी झालेलंही दिसतं. पण या मानसिक हिंसेचा परिणाम मात्र सूक्ष्म असल्यानं अनेकदा तो दिसत नाही. पण सूक्ष्मपणानं तो टिकून असतो. हीच मानसिक हिंसा दुर्बळाची केलेली असली तर, त्याला प्रतिकार शक्य नसल्यानं तो दुखावल्याचं दाखवणार नाही, पण त्याला दु:ख झालेलं आत तसंच असेल.

श्री महाराज म्हणत गीतेमध्ये स्वत:च्या विभूती सांगताना भगवंतांनी 'मन' ही माझी विभूती आहे असं सांगितलं आहे. त्यामुळं मनाला किंवा अंत:करणाला दुखवणं म्हणजे प्रत्यक्ष भगवंताला दुखवणंच. श्री महाराज स्वत:विषयी सांगताना एकदा म्हणाले की, मी एकच व्रत केलं ते हे की, मी कधी कोणाचं अंत:करण दुखावलं नाही. पण अनेकांना यावर शंका येते की, तुम्ही म्हणता ते पटतं. पण असा कुणाला न दुखवता व्यवहार करणं कसं शक्य आहे ? आजच्या काळात तर जो तो काम टाळणार, कर्तव्य चुकवणार, प्रामाणिकपणानं जबाबदारीनं व्यवहार करणार नाही, मग कठोर-कटु बोलल्याशिवाय कसं चालेल ?

हे म्हणणंही रास्त आहे. दुसऱ्याचं अंत:करण न दुखवण्याचं व्रत घेतलेल्या माणसांनाही अडचणी येतात. व्यवसायाचा, व्यवहाराचा, कर्तव्याचा भाग म्हणून कठोर बोलावं लागतं. प्रसंगी दुसऱ्याचं मन त्यानं दुखवणं शक्य असतं. त्यामुळं असं व्रत घेणाऱ्यांना स्वत:ला त्याचा त्रास होतो. पण जरा आत्मपरीक्षण केलं तर कळतं की, आपलं दुसऱ्याला बोलणं हे कर्तव्यापोटी आलं आहे की त्यातून काही आनंद घ्यावा यापोटी ? कर्तव्यापोटी बोलण्याला

इलाज नसतो. त्यानं परमार्थाला बाधा येत नाही. पण त्यातसुद्धा दुसऱ्याच्या अंत:करणाची हानी कमीत कमी कशी होईल, हे आपण पाहू शकतो.

श्री महाराज या संदर्भात सुचवीत की, चुकत असलं नि ते अगदी खरं असलं तरी ते शब्द कठोरच वापरायला लागतात असं नाही. त्यातही व्यवहार पाळला, सौम्य शब्द वापरले तर काही आपण आपलं कर्तव्य चुकतो आहोत असं नाही. एकच वस्तुस्थिती वेगवेगळ्या नि कमीत कमी दुखवेल अशा तऱ्हेनं सांगता येते.

शाळेतल्या जडबुद्धीच्या मुलांना एक शिक्षक 'दगड, धोंडा, नर्मदेतला गोटा' असं मुद्दाम म्हणत. त्यावर श्री महाराज म्हणाले, 'अशा कठोर शब्दांनी मुलांचं नि त्यांच्या आईवडिलांचं मन दुखावतं, तेव्हा कठोर शब्द टाळावे.' त्यावर त्या शिक्षकांनी उसळून म्हटलं, 'वस्तुस्थिती असेल तर ती स्पष्ट शब्दांत सांगावीच लागेल.' त्यावर श्री महाराज म्हणाले, 'तरीसुद्धा थोडा व्यवहार पाळून तीच गोष्ट सौम्यपणानं करणं योग्य होईल. समजा, आपण फिरायला गेला आहात. आपला मुलगा घरी आला आणि आपल्या पत्नीला 'तुझा नवरा कुठं गेला' म्हणाला काय नि 'बाबा कुठं गेले' म्हणाला काय दोन्ही वस्तुस्थितीला धरून असली तरी दुसरं व्यवहाराला धरून, सौम्य नि अहिंसक नाही का ?'

मानसिक हिंसेचा त्याग सुचवण्याचं दुसरं कारण असं की, त्यामध्ये स्वत:च्या अहंकाराला नि अभिमानाला खतपाणी मिळतं. जगाला, इतरांना क्षुद्र, मूर्ख लेखलं जातं, जे कधीच खरंही नसतं नि असणं शक्यही नसतं. दुसऱ्याला मान देण्यात, वेळी त्याची चूक सोडण्यात 'परांतराला धक्का न लावण्यात' आपल्या अवगुणांची रास्त जाणीव आहे, नम्रतेचा अभ्यास आहे, अन् 'जनी जनार्दना'ची जाणीव आहे -जे सारं आपल्या समाधानाला, परमार्थाला गरजेचं आहे.

*

१३. खरा स्वार्थ

आपला सामान्य माणसांचा व्यवहार, प्रपंच, प्रयत्न पाहिले की, महाराज म्हणत, 'आपण आपला खरा स्वार्थ साधीतच नाही !'

आपला नेहमीचा उद्योग, व्यवहार, कामं, व्याप पाहिला तर त्यामागची प्रेरणा मुख्यत: स्वार्थाचीच असते. मला म्हणजे विशेषत: माझ्या देहाला धरून, तो खरा मानून चालणाऱ्या बुद्धीला जे सोयीचं नि अनुकूल वाटत असेल तेच आपल्याला सुखाचं वाटतं. मग अशा सोयीच्या नि सुखाच्या गोष्टी मिळाव्या, घडाव्या म्हणून आपण आयुष्यभर चिकाटीनं अविरत धडपड करतो. तरीही माणसाला अखंड समाधान मिळत नाही. या साऱ्या अनुभवानंतरसुद्धा आपल्याला आपली विचारांची दिशा, प्रयत्नांचा मार्ग, भावनेची बैठक बदलावीशी का वाटत नाही ?

श्री महाराज म्हणत आपण एक वेळ गुरूनं किंवा दुसऱ्या एखाद्या शहाण्या अनुभवी माणसानं सांगितलेलं ऐकत नाही, त्यानुसार आपला मार्ग बदलीत नाही, हे समजू शकतं. शास्त्रांत, ग्रंथांत लिहिलेलं आहे तेही जुनं-पुराणं, कालबाह्य झालं असेल असं मानून ते वाचूनसुद्धा, त्यानुसार आपला मार्ग बदलीत नाही- हेही एक वेळ समजू शकतं ! पण आपण आज आपल्याला जो अनुभव येतो आहे, त्यानुसार समजून घेऊन, शिकून घेऊनही बदलत नाही याला काय करावं ? ते म्हणत, 'माणूस आत्मप्रचीतीनं शहाणा होत नाही याला काय करावं ?' आपल्याला पदोपदी स्वार्थीपणानं वागून, कष्ट करूनसुद्धा समाधान मिळत नाही हे दिसतं, तरी ते आपण पाहात नाही, याला काय करावं !

एका बाईंना दही फार आवडे. त्यांच्या घरातल्यांनाही ते आवडे. त्यामुळं स्वत:साठी म्हणून त्यांनी ते बाजूला काढून ठेवलं की, त्याच्या

वासावर असलेला कुणी तरी ते संपवून टाकी. यांना फार दु:ख होई. स्वार्थापोटी कष्ट करूनसुद्धा ते सुखाचे होत नाहीत, हे ओळखून त्यांनी एकदा ठरवलं की, आता आपणच ते इतरांसाठी ठेवू. कारण नाही तरी ते आपल्याला मिळत नाहीच. इतरांनाही ते कळलं. आता ते इतरांसाठीच असल्यामुळं ते संपेना. आता अपेक्षा नव्हती तरी त्यांना ते मिळे. सारांश, आपण आपल्याकरता राहातो तोपर्यंत दु:ख, अपेक्षा, त्रास आहे. इतरांसाठी राहिलो की समाधान आलं.

स्वत:ला हव्या म्हणून गोष्टी मिळवण्याची आपली जी धडपड आयुष्यभर चालते तिला आपण स्वार्थ म्हणतो. ती एक तर कधी पुरी होतच नाही नि दुसरं म्हणजे ती ज्या ज्या बाबतीत पुरी झालेली दिसते तिथंही समाधान मिळालेलं दिसत नाही. हा आपला अनुभव आहे.

यावरून स्वत:ला खरी हवी असलेली नि आपल्या खरी हिताची असलेली गोष्ट - जी आज आपण स्वार्थात आहे असं म्हणतो - ती ओळखण्यात गफलत होते आहे. खरा स्वार्थ हा स्वत:साठी जे सर्वांत चांगलं आहे ते मिळवण्यात आहे, हे निर्विवाद.

पण मग आपण जे सर्वांत चांगलं समजतो आहोत- उदाहरणार्थ प्रपंचातल्या विविध वस्तू, वेगवेगळी यशं, चांगल्या तऱ्हेच्या घटना या ज्या ज्या वस्तूंना आपण सर्वांत चांगलं समजतो आहोत - ते चुकीचं असलं पाहिजे. वस्तूंचं तर सोडाच, पण प्रपंचात अगदी हवं असलेलं मूल आपल्याला मिळालं तर आता आपला स्वार्थ पुरवला गेल्यानं आपल्याला आनंद व्हावा नि तो टिकावा ! पण ते मूल दुर्दैवानं अपंग किंवा आजारी निपजलं की, स्वार्थाची म्हणून मिळवलेली गोष्ट दु:खाची होऊन बसते! असे एक ना दोन शेकडो अनुभव आपल्याला येत असतात.

यावरून तरी आपला खरा स्वार्थ नक्की काय मिळवण्यात आहे, याचा आपण शोध घ्यावा, विचार करावा असं श्री महाराजांना वाटे. सर्व संतांनी हे निक्षून सांगितलं आहे की, प्रपंच स्वभावत:च अपूर्ण आहे. त्यात

पूर्ण गोष्ट नाही. श्री महाराज म्हणत, 'तो मोडक्या वस्तूंचा कारखाना आहे.' त्यातली कोणतीही गोष्ट आणली तरी ती पूर्ण कशी मिळेल? असं जे महाराजांनी विचारलं, त्याच्यामागचा अभिप्राय आपण समजून घेणं, आपल्याला गरजेचं आणि उपयोगी आहे.

माणसं असोत, घटना असोत, वस्तू असोत, घरंदारं असोत, उद्योगधंदे-कारखाने असोत. यातली प्रत्येक गोष्ट प्रपंचात ज्याच्यात्याच्या प्रपंचाच्या ठेवणीनुसार असेल, काही नसतीलही. त्यामुळं एक प्रकारची उणीव राहणार. त्यातूनही ज्या गोष्टी असतील, त्यांचं निरीक्षण केलं, अनुभव पाहिला, तर त्या प्रत्येक गोष्टीतल्या उणिवा, त्रुटी, अनपेक्षित गोष्टी असणं, तर काही वेळा अपेक्षित गोष्टी नसणं - अशा अनेक मार्गांनी या गोष्टींतली अपूर्णता आपल्याला जाणवेल.

लग्न होत नाही म्हणून उणीव असेल, तर ते लग्न झालं, म्हणून आता पूर्ण झालं म्हणावं, तर तो माणूस मनासारखा वागणार नाही, त्याच्या घरी अनेक अनपेक्षित गोष्टींना आपल्याला सामोरं जावं लागेल. कारखाना उभा करू, पूर्ण करण्याचा प्रयत्न करू पण कधी कामगार कमी पडतील, कधी त्यांना काम कमी पडेल, कधी काम आहे पण वीजपुरवठा नसेल - कुठल्या ना कुठल्या मार्गानं या साऱ्याचं अपूर्णत्व विचार करणाऱ्याच्या लक्षात येईल. या अर्थानं शाश्वत सत्य म्हणून तो मोडक्या वस्तूंचा कारखाना आहे, या महाराजांच्या म्हणण्यामागचा अर्थ आपल्या लक्षात येऊ शकेल. म्हणून या प्रापंचिक गोष्टी कितीही आणल्या तरी त्यामधून शाश्वत टिकणारा आनंद कधी मिळत नाही.

मग माणसाचा खरा स्वार्थ कुठला ? जे खरं, सर्वांत चांगलं, मोलाचं आहे ते स्वत:साठी मिळवणं. यालाच आनंद किंवा समाधान म्हटलं जातं. जगामध्ये प्रत्येक वस्तूची परीक्षा करता करता शेवटी जे राहिलं त्याला भगवंत म्हणतात. तो मिळवायचा म्हणजेच ते पूर्ण समाधान मिळवायचं हा जन्माला आलेल्या प्रत्येक लहानमोठ्या, सामान्य-असामान्य माणसाचा

'खरा स्वार्थ' आहे. श्री महाराज म्हणत, 'खरा स्वार्थ आणि परमार्थ यात भेद नाहीच !'

ते आणखी एका वचनात म्हणतात की, हा खरा स्वार्थ आपण दोन प्रकारांनी साधू शकू. एक तर परोपकारानं आणि दुसरं म्हणजे भगवंताच्या स्मरणानं.

आपण स्वत:साठी जगलो की, स्वार्थ झाला तर दुसऱ्यासाठी जगलो की, त्यात 'खरा स्वार्थ' - म्हणजे आनंद साधला. भगवंताच्या स्मरणानं आपल्या आड येणाऱ्या 'मी' पणाच्या मुळावर घाव बसतो, आपण उरत नाही फक्त भगवंत उरतो, म्हणून आनंद साधतो.

आपण व्यवहारातही पाहू शकतो. आपल्या कुटुंबात जर एखादा माणूस मी इतरांच्या सुखासाठी आहे, असं समजून राबू लागला तर त्याचं इतरांना किती सुख होतं. तो माणूस इतर कुटुंबीय माणसांना हवासा होतो. त्यांचा आवडता होतो. जो इतरांची काळजी घेतो त्याची भगवंत काळजी घेतो. या न्यायानं त्याला चार वस्तू कमी वा जास्त मिळतील, पण आनंद नक्की मिळतो. याउलट आपल्याच कुटुंबातला एखादा माणूस स्वत:च्या सुखाची नि मीपणाला जपण्याची काळजी करू लागला की, तो इतरांना अप्रिय वाटतो, नकोसा होतो. मग त्याच्यापासून ना त्याला सुख ना इतरांना. पण इतरांचा विचार सुचायला, त्यांच्या हिताचा विचार सुचायला स्वत:बद्दलचा विचार कमी व्हायला हवा. तो कमी कसा करता येईल ही मात्र सामान्य माणसापुढची समस्या आहे.

अर्थात भगवंताच्या स्मरणामध्ये, त्याच्यावरच्या निष्ठेमध्ये ही समस्या सोडवण्याचं सामर्थ्य आहे. फक्त त्यासाठी आपला 'खरा स्वार्थ' कोणता आहे नि त्या दिशेनं आपल्या दैनंदिन जीवनाची दिशा कशी बदलावी याचा परिचय आवश्यक आहे.

*

१४. वृत्तीत बदल

परमार्थ आणि पारमार्थिक माणूस किंवा अध्यात्म आणि आध्यात्मिक माणूस यांविषयी अनेक कल्पना रूढ झालेल्या आहेत. परमार्थ म्हणजे एक तर निवृत्तीनंतर, वेळ जात नसला तर, अगदी आपलं कुणीच घरीदारी ऐकत नाहीसं झाल्यावर किंवा प्रपंचातली नेहमीची कामंसुद्धा नीटशी वा यथायोग्य जमत नाहीशी झाल्यावर करायची गोष्ट समजली जाते. यामागं आपल्यावर पूर्वापार झालेले संस्कार आहेत. आपल्याला आलेले अनुभव आहेत. आपली परमार्थाबद्दल बनून गेलेली मतंही आहेत.

त्यामुळंच की काय, समजा ओझी उचलून घामानं थबथबलेला मजूर, सुटाबुटातला ऑफिसला जाणारा एखादा नोकर किंवा साहेब, गाडीनं कारखान्यात जाणारा कारखानदार, कॉलेजमध्ये जाणारा एखादा युवक किंवा युवती, सुटीच्या दिवशी मुलाबाळांसह सिनेमाला निघालेला मध्यमवर्गीय प्रापंचिक माणूस - ही माणसं पारमार्थिक आहेत असं जर आपल्या कानांवर आलं तर आपल्याला साधारणतः काहीतरी चुकल्यासारखं वाटतं किंवा अशातल्या एखाद्यानं अध्यात्माचा, परमार्थाचा अभ्यास सुरू केला आहे असं जर कानावर आलं तर, सहज प्रतिक्रिया अशीच उमटते की कुठून त्यांनी हे खूळ डोक्यात घेतलं असेल अन् आता त्यांची आपापली नेहमीची कामं, अभ्यास, जबाबदाऱ्या ते कशा काय पार पाडू शकणार, अशी आपल्याला चिंता लागते. किंबहुना आता ते सारे आपली कर्तव्यं नक्कीच नीटपणानं करू शकणार नाहीत, असंही वाटतं.

पण खरा परमार्थ म्हणजे नक्की काय आहे, याची साधारणतः कुणी चौकशीही करीत नाही आणि समजावूनही घेत नाही. श्री महाराजांनी खऱ्या परमार्थाची कल्पना अनेक बोधवचनांतून स्पष्ट केली आहे. ते नेहमी सांगत

की, परमार्थ अंतरंगाचा आहे, आतल्या प्रतिक्रिया, आतली मनाची भूमिका बदलण्याचा आहे. आपली नेहमीचीच प्रापंचिक कामं, पण वेगळ्या वृत्तीनं वेगळ्या दृष्टीनं करणं म्हणजे परमार्थ आहे. याविषयी सांगताना एके ठिकाणी श्री महाराज उद्‌गारले, 'परमार्थ करायला लागला की, प्रपंच बुडाला असं वाटतं, ते चुकीचं आहे. कोणतीही गोष्ट भगवंताच्या स्मरणात करणं हा परमार्थ आहे. मग प्रपंचाचं काम असो, पूजा असो, इतर असो. पण साऱ्याचं अवडंबरच माजलं आहे. परमार्थाचं खरं स्वरूपच बदलून गेलं आहे...'

यामुळं एक नक्की लक्षात येतं की, खरा परमार्थ हा बाह्यांगाचा नाही. विशिष्ट कपडे, विशिष्ट पद्धतीनं जगणं याचा नाही. अर्थात अनुकूल कपडे, अनुकूल बाह्य व्यवहार ठेवणं उपयोगी नाही असं नाही, पण ते त्याचं मर्म नाही, साध्यही नाही. आपण पाहतोच की, नाटकात साधूची भूमिका करणारा अक्षरशः दोन मिनिटांत वेषभूषा बदलून येतो. तो अगदी साधू दिसायला लागतो. पण हे उघडच आहे की, वृत्तीनं साधुत्व येणं कुठं नि वेषानं साधुत्व येणं कुठं ! आणि जर ते असं येत असतं तर ते फारच सोपं नि दोन मिनिटांचं काम ठरलं असतं. पण ते तसं नाही. त्यामुळं अशा वेषांतरात परमार्थ नक्कीच नसला पाहिजे. वेष पारमार्थिक वाटणारा असेल किंवा नसेल. याविषयी स्पष्टपणानं नि नेमकेपणानं सांगताना श्री महाराज एका बोधवचनात लिहितात, 'परमार्थ वेषांतरात नसून वृत्त्यंतरात आहे.'

पण आपली अनेकांची कल्पना ही बाह्यांगावर, वेषासारख्या बाह्य गोष्टींवरच घोटाळत असते. त्यामुळंच वर उल्लेखलेली माणसं आपल्याला पारमार्थिक वाटत नाहीत. पण माणूस देवळात जाताना दिसला, एखाद्या संतांचा ग्रंथ वागवताना दिसला, कथाकीर्तन, प्रवचन-पुराण याला जाताना दिसला किंवा तीर्थयात्रा करताना आढळला की, आपल्या दृष्टीनं तो पारमार्थिक वाटतो. पण सगळ्या साधनांचा वृत्तीवर काय परिणाम झाला यात खरा परमार्थ आहे, हे लक्षात घेतलं जात नाही. श्री महाराज सुचवीत की, तीर्थं भगवंताची आठवण देण्याचं काम करतात. ते स्मरण नेहमी राखणं आणि

त्याला अनुकूल अशी आपली वृत्ती आणि पुढं आपला व्यवहार होणं, इथं परमार्थ होतो. नुसतीच तीर्थयात्रा करण्यात तो होत नाही.

आणि तसं पाहिलं तर अशा परमार्थी वृत्तीची गरज स्वत:ला आनंदापोटी आहेच पण अधिक विचार केला तर ती समाजाच्या धारणेला, समाजाच्या स्वास्थ्याला नि प्रगतीलासुद्धा गरजेची आहे, हे जाणवेल. वृत्तीत फरक पडला, स्वार्थापलीकडं काही दिसायला लागलं, स्वत:चं कर्तव्य - मग ते कौटुंबिक असो, समाजासंबंधी असो, देशासंबंधी असो - चोखपणानं पण अलिप्ततेनं करता यायला लागलं, स्वत:च्या हितापेक्षा इतरांच्या हिताचा विचार मनात यायला लागला, इतरांच्या अंत:करणाची जपणूक करून वागता यायला लागलं, सर्वांभूती राहणाऱ्या त्या भगवंताचं स्मरण अधिक राहायला लागलं तर स्वत:ला समाधान लाभेलच, पण आपल्या कुटुंबातल्या, समाजातल्या लोकांनाही ते समाधान देणारं ठरेल, हे वेगळं सांगायला नको. स्वत:बरोबर किंवा स्वत:पेक्षा दुसऱ्यांचा जास्त विचार करण्यात किती सामाजिक प्रश्नांची खरी उत्तरं दडलेली आहेत, हे वेगळं स्पष्ट करण्याची आवश्यकता नाही.

आणि म्हणूनच अशा स्वत:च्या दृष्टीतल्या, वृत्तीतल्या बदलाला श्री महाराज परमार्थ म्हणत त्याला केवढं अपार मोल आहे, हे कळून जातं. या दृष्टीनं पाहिलं तर मग माणूस घाम गाळणारा मजूर असला काय, सुटाबुटातला बॉस असला काय नि कॉलेजमधला युवक असला काय - तो पारमार्थिक असू शकतो नव्हे, त्याचा वेष कसाही असो त्या माणसाच्या चांगल्या वृत्तीवरून तो माणूस आतून पारमार्थिक असावा, असं आपल्याला वाटल्याखेरीज राहणार नाही. याउलट वेषच नुसता पारमार्थिक दिसला नि वृत्ती स्वार्थी, लोभी, मत्सरी असली तरी त्या व्यक्तीला आपण पारमार्थिक समजणार नाही, कारण 'खरा परमार्थ वेषांतरात नसून वृत्त्यंतरात आहे.'

*

१५. घातक समजूत

साधारणपणे असं मानलं जातं की, प्रपंच आणि परमार्थ या दोन वेगवेगळ्या गोष्टी असून त्यांतील एक साधायला गेलं तर दुसरी बाजूला ठेवावी लागते. किंबहुना या दोन परस्परविरोधी गोष्टी आहेत. त्यामुळं प्रापंचिक माणसानं परमार्थाच्या भानगडीत पडू नये नि परमार्थी माणसानं प्रपंचाची उठाठेव करू नये. केलीच तर घोटाळा होईल.

या म्हणण्यात तथ्य नाही असं नाही. पण या दोन्हींमध्ये मानलेली दरी मात्र तितकीशी खरी नाही. प्रपंच म्हणजे तरी काय, सामान्यपणे माणूस जगण्यासाठी चारचौघांसारख्या ज्या ज्या गोष्टी करतो त्या त्या करणं. शिक्षण घेणं, उद्योगधंदा करणं, नोकरी करणं, त्यावर पोट भरणं, लग्नमुलंबाळं होणं, स्वत:वरच्या कौटुंबिक, सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडणं. अखेर या साऱ्या धडपडीपासून एका दिवशी अपेक्षित किंवा अनपेक्षित विश्रांती.

सामान्यपणे माणसांची अशी समजूत असते की, यापेक्षा वेगळं काय करायचं ? फार झालं तर चेंज म्हणून, बदल म्हणून लहानसहान प्रवास, कार्यक्रम, संगीत-नाटक-सिनेमा-सर्कस यांसारख्या करमणुकी, पत्त्याबित्यांसारखे किंवा क्रिकेट, बॅडमिंटन, टेनिससारखे खेळ, थोडंफार सामाजिक कार्य, एवढंच ना ? याच्या पलीकडं माणूस काही करूच शकणार नाही, असं समजलं जातं. आत्ता सांगितलेल्या वर्तुळाच्या परीघापलीकडं काहीच नाही असं प्रापंचिक माणसाला ठामपणानं वाटतं.

आता स्वत:चा विकास करून घेणं, शिक्षण-व्यवसाय, मुलंबाळं, आईवडील, नातेवाईक यांच्याबद्दलची कर्तव्यं पार पाडणं याला कुणी खरा पारमार्थिक माणूस कधी नावं ठेवत नाही. ते करू नये किंवा ही कर्तव्य पार पाडू नये असं म्हणताना खरा पारमार्थिक माणूस कधी दिसणार नाही. उलट

श्री महाराज तर ही सारी कर्तव्यं न चुकता, चोखपणानं पार पाडावी, त्यासाठी पुरेसा, कसून नि योग्य तो प्रयत्न करावा असंच म्हणताना दिसतात. उलट यथायोग्य चातुर्यानं, नेटकेपणानं प्रपंच पार पाडावा असं त्यांनी सांगितलं आहे. मग सामान्य प्रापंचिक, की जो असा, एवढाच प्रपंच करीत आयुष्य घालवतो, त्याच्या आणि खऱ्या पारमार्थिकाच्या किंवा श्री महाराजांच्या भूमिकेत फरक कुठं आहे ? तर श्री महाराजांनी तो फरक स्पष्ट करताना सामान्य माणसाच्या या ठाम समजुतीला आक्षेप घेत म्हटलं आहे की, 'प्रपंच घातक नाही, त्याच्यापलीकडं काही नाही ही समजूत घातक आहे...!'

माणूस एवढंच करू शकेल, एवढंच माणसाला शक्य आहे, या पलीकडं माणूस आयुष्यात काहीच करू शकणार नाही - असं जे अनेकांच्या तोंडून आपण सर्रास ऐकतो त्या भूमिकेला श्री महाराजांनी आक्षेप घेतलेला दिसून येतो. स्वत: जिवंत राहण्यासाठी नि स्वत:च्या सुखासाठी केलेल्या धडपडीपलीकडं एक आयुष्य आहे, जगता येणं शक्य आहे, तेही प्रत्येक माणसाला समजणं, जगणं शक्य आहे, असं ते सुचवीत आहेत. या व्यक्तिगत प्रपंचापलीकडंही एक विश्व आहे, एक प्रवास आहे, एक कर्तव्य आहे.

प्रपंचाला ते कमी लेखत नाहीत. समाजधारणेसाठीसुद्धा तो करणं ही गरज आहे. पण अशा व्यक्तिगत प्रपंचाला सर्वस्व मानण्याला त्यांचा आक्षेप दिसतो. प्रपंच जरूर करावा, पण त्यात ही जाणीवही असू द्यावी की, आपल्याला लाभलेलं आयुष्य, समृद्ध सृष्टी, प्रगत मानवी संस्कृती हे सारं काही केवळ माझा स्वत:पुरता व्यक्तिगत प्रपंच पार पाडण्यासाठी नाही.

खाणं-पिणं,जगणं हीच माणसाच्या आयुष्याची इतिकर्तव्यता नव्हे. यातून तर ढोबळ मानानं फक्त इंद्रियांचं समाधान झालं. जगण्याची सार्थकता त्याच्या पलीकडं विचार करण्यात, त्याच्यापलीकडं जाण्यात आहे. प्रपंच पुरा करण्यासाठी इतका काळ जन्मभर बाहेर हिंडतो आहो, आता थोडा फेरफटका स्वत:त, आत करण्याचीही गरज आहे. जसं जगायला,पाहायला, अनुभवायला एक विशाल जग बाहेर पसरलेलं आहे, तसंच शोधायला,

अनुभवायला, बदलायला एक विलक्षण विश्व अंतर्यामीही पसरलेलं आहे.

दुसऱ्या बाजूला स्वत:ची वाढ, स्वत:च्या अपेक्षा पुऱ्या व्हाव्या म्हणून इतका वेळ आपण सृष्टीकडून, निसर्गाकडून काही घेतो आहोत, समाजाकडून घेतो आहोत, भगवंताकडून घेतो आहोत, मग थोडं आपल्या आपल्या प्रपंचापलीकडं जाऊन त्या सर्वांना काही देणं, हाही आपल्या आयुष्याचा भाग आहे. तीही आपल्या प्रपंचातली महत्त्वाची, गरजेची दृष्टी आहे. ते करतानाही, ज्या निरपेक्ष, तटस्थ दात्यांकडून जसं आपण भरभरून घेतलं, त्याच भूमिकेनं आपण काही देतो आहोत, हेसुद्धा विसरून काही देण्याची गरज आहे. इतक्या दिव्यांच्या प्रकाशात नि इतक्या सूर्यांच्या साक्षीनं आयुष्य चालतो आहोत, स्वत:चा प्रपंच पार पाडतो आहोत, थोडा प्रकाश आपणही देण्याचंसुद्धा आयुष्यात काम आहे. आपल्या आयुष्याचं खरं ध्येय काय, हे शोधण्यासाठीसुद्धा आयुष्य आहे.

आपल्या स्वार्थाची जपणूक तर प्रत्येक जण हरघडी आयुष्यभर करतो आहे, पण तेवढंच आयुष्य समजणाऱ्यांना श्री महाराज सावध करतात, जागं करतात.थोडी परमार्थाची जाणीव व्हावी,सततच्या बाहेरच्या भ्रमंतीबरोबर थोडीफार अंतर्यात्राही घडावी-त्यात स्वत:चं सार्थक आहे नि इतरांचंही आहे. शेकडो माणसांच्या रूपानं नटलेल्या भगवंताचीही जाणीव आहे.

गावच्या क्षितिजापलीकडं तोच जाऊ शकतो ज्याला त्याच्या पलीकडं काही आहे याची जाणीव असते. तसंच आपापल्या मर्यादित बहिर्मुख आयुष्यात असंही क्षितिजापलीकडचं अंतर्जगातलं जगणं शक्य आहे. पण त्यासाठी आधी आपल्या त्या दैनंदिन प्रपंचापलीकडचं काही आहे याची कल्पना हवी, ती नसेल तर तसं विशाल जगणंही शक्य नाही नि अशा संकुचित प्रपंचानं होणारा घात टाळणंही शक्य नाही. म्हणून या मोलाच्या वचनात श्री महाराज म्हणतात की,'प्रपंच घातक नाही, त्यापलीकडं काही नाही ही समजूत घातक आहे.'

*

१६. भीती

भीतीचा अनुभव नाही असा माणूस विरळा. उलट सर्वसामान्य माणसाचा रोजचा दिवस हा कुठल्या ना कुठल्या तरी भीतीचा मुकाबला करण्यात जातो. कुठल्याही वयाच्या, कुठल्याही व्यवसायातल्या माणसाचा भीती पाठलाग करू शकते. ती अशिक्षिताइतकीच सुशिक्षितालाही ग्रासते. गरीबाइतकीच श्रीमंतालाही असते. अशक्ताइतकी सशक्तालाही असते. इतकंच काय आपल्या कोणत्या व्यवहारामागं ती लपलेली असेल ते सांगता येत नाही. पूजेसारखी एखादी सात्त्विक, चांगली वाटणारी क्रियासुद्धा प्रेमापेक्षा-भक्तीपेक्षा भयापोटी चाललेली असू शकते. एखादा माणूस दुसऱ्या माणसाला नमस्कार करताना दिसला, तर स्वाभाविकच त्या नमस्कार करणाऱ्या माणसाला त्या दुसऱ्या माणसाबद्दल नक्की आदर असावा, असं आपण गृहीत धरतो, पण यातले अनेक नमस्कारसुद्धा आदरापेक्षा भीतीपोटी चाललेले दिसतील.

आपल्याला वाघ, सिंह यांसारख्या क्रूर श्वापदांची भीती वाटली तर ते एकवेळ आपण समजू शकू. पण ही भीती वाघ-सिंहांसारख्या श्वापदांबरोबरच चोरदरोडेखोर, अतिरेकी यांसारख्या मानवी प्राण्यांचीही वाटते, इतकंच नाही तर ती रोजच्या संपर्कात येणारे नि परिचयात असलेले आपले वरिष्ठ सहकारी, पती, पत्नी, मालक, नोकर, शेजारीपाजारी अशा कुणाची वाटत असेल, हे सांगता येत नाही ! या भीतीपोटी माणसाची मनःशक्ती नि आयुष्याची केवढी हानी होत असते, याचा अनुभव सर्वांना असतो. अशा या घटकाचा विचार सत्पुरुषांनी केला नसेल तरच नवल !

श्री महाराज म्हणत, 'मनुष्य भित्रा आहे कारण तो अपूर्ण आहे.' अधिक विचार केला तर त्यांच्या म्हणण्यातलं तथ्य आपल्यासमोर येतं. साधी परीक्षेची भीती घ्या. अत्यंत तुटपुंजी नि अपुरी तयारी करून जाणाऱ्या

विद्यार्थ्याला अर्थातच भीती जास्त वाटते, तर पूर्ण तयारीनिशी वावरणाऱ्या विद्यार्थ्याला हीच भीती कमी वाटते. जिथं जिथं आणि ज्या ज्या प्रकारे माणूस अपूर्ण असेल त्या त्या ठिकाणी आणि त्या त्या प्रकारे देहाला भीती ग्रासीत असते. साध्या पातळीवर त्याला देहाच्या संबंधानं भीती असते. त्याला इजा होईल, दुखापत होईल, त्रास होईल यापायी त्याला भीती वाटते. देहासंबंधी अशी बारीकसारीक भीती तर असतेच, पण त्यांतली सर्वांत मोठी भीती तो देहच जाईल, म्हणजे मरण येईल ही होय ! त्यामुळं ती भीती तर त्याचा आयुष्यभर पाठलाग करीत असते. म्हणून श्री महाराज म्हणत, 'भीतीमागं देहाचं प्रेम असतं !' ही झाली स्थूल पातळीवरची देहाच्या प्रेमामुळं वाटणारी भीती.

दुसरी फार मोठ्या प्रमाणावर असलेली भीती सूक्ष्म पातळीवरची, म्हणजे देहबुद्धीची भीती ! ती व्यापक आणि मानसिक असते. सामान्य माणसाचंसुद्धा पाहा - माझा अपमान होईल, मी एकटा पडेन, मला कुणी विचारणार नाही, माझी छी: थू होईल - अशा नाना प्रकारांनी त्या देहबुद्धीपोटी त्याच्या जीवनात भीती वावरत असते. प्रत्यक्ष व्यवहारात पाहिलं तर यांमधल्या कमीच गोष्टी घडतात अन् कमीच घटनांना प्रत्यक्ष तोंड द्यावं लागतं. पण त्या घडतील की काय नि घडल्याच तर कसंकसं होईल या कल्पनेनंच उभी केलेली भीती एवढी असते की, माणसाची किती मानसिक शक्ती ती खाते याला सुमार नाही. श्री महाराज तर म्हणत, 'या भीतीनं संकट फार वाढतं.'

आणि अशी माणसंही आपण पाहिली असतील - कधी घरात कुणाला काही व्हायला लागतं. डॉक्टर, औषध अशी आपली धावपळ सुरू असते. ते पाहून किंवा उगाचच पुढच्या कल्पनांचीच एखाद्याला इतकी भीती वाटायला लागते की, त्याचा परिणाम त्याच्या शरीरावर अन् मनावर होऊन मूळ आजारी माणसापेक्षा या भीतीनं आजारी झालेल्या माणसासाठीच अधिक धावपळ करावी लागते. असल्या काल्पनिक भीतीचा विचार करताना श्री महाराज एके ठिकाणी उद्‌गारले, 'भीती हे दररोजचं मरण आहे, देहाचं

मरण एकदाच आहे !'

या साऱ्या पार्श्वभूमीवर श्री महाराजांनी संतांचे गुण सांगताना म्हटलं आहे की, 'अत्यंत निर्भयता हा संतांचा पहिला गुण आहे !' म्हणजे सामान्य माणसाला ज्या भीतीच्या सावटाखाली उभा जन्म काढावा लागतो आणि ज्या भीतीमुळं संपत्ती, मानमान्यता, आरोग्य, मुलंबाळं सारं काही असूनसुद्धा, सामान्य माणसाची अवस्था, जेवण असून अंगी लागत नाही अशी होते आणि अस्वस्थतेत, असमाधानात त्याला जगावं लागतं, त्याचा लवलेश संतांच्या ठिकाणी असू नये ! यातून खूपच शिकण्यासारखं असलं पाहिजे !

अर्थातच वर सांगितल्याप्रमाणं भीतीचा विचार करता करता नि मूळ शोधता शोधता संतांनी-सत्पुरुषांनी खूप काही सांगितलं आहे. त्यातलं आपल्या दृष्टीनं महत्त्वाचं म्हणजे त्यांनी सुचवल्याप्रमाणं देहाचं प्रेम होता होईतो कमी करणं. जितकं हे प्रेम जास्ती तितका भीतीचा वावर जास्ती. दुसरं अधिक महत्त्वाचं म्हणजे देहबुद्धीचा विचार जितका कमी होईल तितका पाहाणं. मी आणि माझ्या सुखसोयी, माझी कामं, मला पटणाऱ्या गोष्टी अशा अनेकविध अंगांनी त्याला धरून जो जो विचार सहज होत असतो तो कमी करणं. त्याजागी दुसरा-दुसऱ्याची सोय किंवा मानल्यास भगवंत-त्याचा विचार, त्याची सोय हे सारं ठेवणं. एवढ्यातच आपल्या असं लक्षात येईल की, पाऊण भीती हद्दपार झाली आहे.

त्यातही सुरुवातीला म्हटल्याप्रमाणं आपल्या अपूर्णत्वानं येणारी भीती नाहीशी करायला आपल्यातल्या पूर्णत्वाचा शोध घेण्यानं तर भीतीशी उरलासुरला सामना होऊन जातो. हा पूर्णत्वाचा शोध किंवा वर उल्लेखलेला देह नि देहबुद्धीचा विचार या साऱ्याच बाबतीत सत्पुरुषांची वचनं आपल्याला मोलाचं मार्गदर्शन करू शकतात. ते घेऊन भयमुक्त आनंदी जीवन जगणं खचितच शक्य आहे.

*

१७ देहापलीकडे

सर्वसाधारण माणसाचा बराचसा व्यवहार हा देहाला प्रधान धरून चालतो. साधारणपणे आपल्याला दु:ख किंवा असमाधान केव्हा होतं असं विचारलं तर आपल्या असं लक्षात येईल की, आपल्या शरीराला त्रास झाला, कष्ट पडले की दु:ख होतं ! त्यामुळंच आजारपण आलं की त्रास वाटतो, दु:ख होतं. केव्हा एकदा यातून सुटेन असं होतं. मनाला त्रास होतो. काम केल्यावर शरीर थकणं हा निसर्गनियम आहे. पण मनाला त्याचा जो त्रास वाटतो तोसुद्धा शरीरकष्टाला धरून आहे. कारण आपल्या बहुतांशी सुखाच्या किंवा दु:खाच्या कल्पना या देहाला धरूनच होतात.

त्यामुळंच एखाद्या कामात जर खूप शारीरिक कष्ट असतील तर ते आपल्याला नकोसं वाटेल. ते सारे कष्ट स्वत:च्या फायद्यासाठी असतील तर एक वेळ घेतले जातीलही, पण तेच जर सारे दुसऱ्यासाठी असतील तर मात्र नक्कीच ते टाळता कसे येतील याकडं मनाचा कल दिसून येईल. म्हणूनच असं होतं की, टीव्हीपुढं बसून एखादा कार्यक्रम बघू या की जरा मोकळ्या हवेत फिरून येऊ या असं विचारलं तर शक्यतो आपण पहिला पर्याय पसंत करू. कारण शरीराला तोशीस कमी लागेल. मग भले बाहेर फिरून येणं कितीही आरोग्यकारक असो.

याचा आणखीही एक परिणाम होत असताना आपल्याला दिसेल. कुठलंही काम उत्तम दर्जाचं बनवायचं असेल तर त्यासाठी स्वाभाविकच खूप कष्ट घ्यावे लागतात. मग ती परीक्षेतली अव्वल गुणवत्ता असो, दर्जेदार चित्र बनवायचं असो, कारखान्यातला जॉब बिनचूक द्यायचा असो, एखादं गाणं वाद्यवृंदाकडून मूळ बरहुकूम बसवून घ्यायचं असो - सगळीकडं खूपच शारीरिक कष्ट असतात. अर्थात त्याचे परिणामही उत्तम होतात. साधारणपणे

त्यासाठी मात्र कुणाची तयारी नसते. कारणं स्पष्टच आहेत.

इतिहासाची पानं चाळली तर असं आढळेल की, ज्या ज्या म्हणून अलौकिक, उत्तुंग गोष्टी जन्माला येतात त्या शरीराचे असे लाड पुरवून किंवा त्रास टाळून जन्माला येत नाहीत, तर उलट तहानभूक विसरून या देहाकडं लक्ष न पुरवता, त्या त्या ध्येयामागं लागूनच अशा गोष्टी साध्य होतात. मोठमोठे शास्त्रीय शोध असोत, अजरामर कलाकृती असोत की ईश्वरप्राप्ती असो. देशासाठी स्वत:चा देह खुशीनं फासावर लटकू देणारे हुतात्मे, गुरूच्या, परमेश्वराच्या प्राप्तीसाठी वेगवेगळ्या संतसत्पुरुषांनीही देहानं सोसलेले अपरिमित हाल - सारं पाहिलं की, एका गोष्टीचं भान आपल्याला येतं की, या साऱ्यांनी देहाला, त्याच्या उपयुक्ततेला जोखलेलं नाही असं नाही. पण त्याला सामान्य माणूस देतो तसं अवाजवी महत्त्वही दिलेलं नाही. श्री महाराज या बाबतीत म्हणत, देहाला आहे तेवढीच किंमत द्यावी !

खरोखरच एकदा का एखाद्या गोष्टीची किंमत करताना चुकलो तर पुढचा सारा व्यवहारच चुकत जातो. देहाची किंमत ही त्याच्यामुळं साध्य होणाऱ्या अधिक शाश्वत गोष्टींपेक्षा जास्त ठरली की, साहजिकच त्या गोष्टी मिळवण्यापेक्षासुद्धा देहाला त्रास कमी होऊ नये, याकडं दृष्टी लागते. मग आपल्याला देश, कला, तत्त्वं, भगवत्प्राप्ती - अशा आदर्शासाठी कोणताही देहदंड सोसायला तयार असलेली माणसं कुठून मिळायची नि मग माणसाचा विकास, सांस्कृतिक प्रगती कुठली अन् कुठलं काय !

आपला सारा व्यवहार देहाच्या सुखाभोवती घोटाळत ठेवणं ही एक बाजू आणि त्याची किंमत ओळखून देहापलीकडच्या काही अदृश्य जगाची जाणीव ठेवून व्यवहार करणं ही दुसरी बाजू. बरंचसं जग या पहिल्या टोकाशीच घोटाळत आहे. एकांगी वैज्ञानिक प्रगतीनं त्याला देहसुखाची आणखी आणखी साधनं उपलब्ध करून दिली आहेत. पण देहापलीकडं जायचा विचारसुद्धा त्याच्या बरोबरीनं वाढला असता, रुजला असता तर बरं झालं असतं. दोन्ही अंगानं प्रगती झाल्यानं समतोल राहिला असता. पण

दुर्दैवानं तसं झालेलं नाही. त्यामुळं माणूस अधिकाधिक देहवादी नि सुखवादी झाला. अर्थात त्यात नवल नाही.

म्हणून श्री महाराज आपल्याला सावध करून देहाला आहे तेवढी किंमत द्यायला सुचवीत आहेत. देहाला या उच्चतर गोष्टी साध्य करण्याचं साधन म्हणून एक विशिष्ट किंमतही आहे, हे ते सांगतात. देहाची योग्य ती निगा ठेवून, काळजी घेऊन ती किंमत देहाला आपण अवश्य द्यावी. पण त्या 'देहापलीकडे' स्वत:चं, जगाचं एक महत्त्वाचं अस्तित्व, कर्तव्य, प्राप्तव्य आहे, याचीही ते जाणीव देत आहेत.

आपली मात्र ही देहाला धरून विचार करण्याची बुद्धी इतकी बळकट झाली आहे की, पारमार्थिक कामातसुद्धा ती प्रभाव दाखवल्यावाचून राहात नाही. साधी तीर्थयात्रेची गोष्ट घ्या. काही मंडळी बऱ्याच सत्पुरुषांची क्षेत्रं पाहून आली. काही समाधिमंदिरातून राहण्याजेवण्याची सोय चांगली होती तर काही ठिकाणी तेवढी चांगली नव्हती. त्यावरून परतल्यावर सहज चर्चा झाली नि असं मत झालं की, ज्या ठिकाणी सोय उत्तम झाली ते स्थान जागृत व चांगलं आणि जिथं ती झाली नाही तो संत, ते स्थान चांगलं नाही. त्यावर श्री महाराजांनी सुचवलं की,' स्वत:च्या देहाच्या सुखसोयीवरून संतांची परीक्षा करू नये. ज्या ठायी मन चटकन शांत, अंतर्मुख होतं, ती पुण्यभूमी होय.' पण माणसाला स्वत:च्या देहाला धरून विचार करणं किती सहज नि अंगवळणी पडलं आहे, हे यातून लक्षात येतं.

अशा सततच्या देहप्रधान विचारानं स्वत:चं तर नुकसान आहेच, पण समाजाचंही तितकंच आहे. ज्यांनी तो विचार बाजूला ठेवून कार्य केलं ते समाजाला ललामभूत होतात. तर नुसते असे देहापलीकडं जायलासुद्धा तयार नसलेले लोक मात्र भारभूत ठरतात, हे आपण पाहातोच.

याच दृष्टीनं आपली स्थिती पाहून श्री महाराज एके ठिकाणी उद्गारले, 'देहाव्यतिरिक्त मी कोणी आहे, हे भानच नाही !'

*

१८. अडचणी

सामान्य माणसाचं अगदी रोजचं आयुष्य म्हणजे अडथळे नि अडचणींची स्पर्धाच असते. प्रत्येक गोष्ट साध्य करायची मिळवायची, म्हणजे त्याला अनेक अडचणींना तोंड द्यावं लागतं. या अडचणी अनेक प्रकारच्या असतात. त्या कधी पैशाच्या असतात, वस्तूंच्या दुर्भिक्षाच्या असतात, मनुष्यबळाच्या असतात, मनुष्यस्वभावाच्या असतात. मात्र इतक्या अडचणी असूनसुद्धा माणूस अगदी नाउमेद झाला, त्यानं काही करायचं सोडलं असं मात्र फारसं घडत नाही. त्या साऱ्या अडचणींशी झगडत झगडत त्याला ज्या गोष्टी मिळवायच्या, साध्य करायच्या, त्या त्या तो मिळवीतच असतो असं दिसून येईल. पैसा नसेल तर तो उधारउसनवार करील, माणसं कमी पडतील तर तो परगावच्या नातेवाईकांना, मित्रमंडळींना बोलवील, अगदीच अंगमेहनतीचं, कष्टाचं काम असेल तर वेळी दीडपट-दुप्पट मजुरी देऊन, माणसं गोळा करून त्या अडचणींवर मात करील, स्वत:च्या आवडीनिवडीची स्वभावाची अडचण होत असेल तर तो कष्टानं त्याला मुरड घालील, दुसऱ्या एखाद्याच्या स्वभावाची अडचण असेल तर वेळी त्याला ती मुरड घालायला लावील. नसेल तर त्या दुसऱ्यालाच त्या मूळ व्यवहारातून बाजूला ठेवील - एक ना दोन. जितक्या जितक्या अडचणी येतील तितके तितके मार्ग तो काढीत राहील नि त्यावर जास्तीत जास्त मात करील, हे मात्र खरं !

फक्त चांगली कामं किंवा परमार्थाचं काम समोर आलं की मात्र बहुतेक वेळा अडचणींवर काहीही करून मात करण्याचा एवढा मोठा अनुभव असलेला हाच माणूस म्हणतो की, सध्या फार अडचणी आहेत हो, जरा त्या कमी झाल्या म्हणजे ते काम करू !

साधी पूजा घ्या किंवा नाम घ्या. तो म्हणतो घरात स्वास्थ्य नाही,

प्रपंचाची किंवा नोकरीधंद्याची फार धांदलीची कामं आहेत, सीझन आहेत, पैपाहुणे आहेत, सणवार आहेत. त्यामुळं पूजेला बघा अजिबात वेळच मिळत नाही. थोडं नामस्मरण करावंसं वाटतं खरं, पण घरात शांतता नाही, बाहेर रस्ता जवळ, त्यामुळं रहदारीचा त्रास होतो, जपाला बसायला वेगळी जागा नाही, मुलाबाळांचा दंगा असतो - जरा शांतता मिळाली म्हणजे करणार आहे ! आता मोठी जागा घेतो आहे, शांत परिसरात राहायला जातो आहे, तिथं एक वेगळीच खोली मी यासाठी ठेवणार आहे मग मात्र पाहाच तुम्ही ! एक वेळ जागा बदलली जाते, पण अडचण नाहीशी होत नाही, तीही फक्त बदलली जाते !

काहींचे संकल्प हे उत्तमोत्तम ग्रंथ - ज्ञानेश्वरी, दासबोध, गाथा वाचण्याचे असतात. संकल्प तसे प्रामाणिकच असतात. पण एक ना दोन दहादहा, वीसवीस वर्षं ते पुरे होताना दिसत नाहीत, इतक्या अडचणी असतात. वेळच मिळत नाही, मनाला स्वास्थ्य नाही-एक ना दोन ! या अडचणी आपण समजू शकू, पण एक गृहस्थ तर असे भेटले की त्यांनी असे दहापाच तरी ग्रंथ गोळा करून ठेवले होते. वाचले नव्हतेच. कारण विचारता ते म्हणाले,'मला तसा आजही वेळ आहे, पण मी अजून वयस्कर झालो नाही. पुढं उतारवयात निवृत्तीनंतर पाहू. म्हणून वाचन होईना !' म्हणजे त्यांचं तरुण वय हीसुद्धा अडचणच झाली !

यावर सांगताना श्री महाराज एका बोधवचनात म्हणतात,'अडचण नाहीशी झाली की मग भगवंताची उपासना करीन असं जो म्हणेल त्याला कायमचंच थांबावं लागेल...' हे घडताना आपण पाहात नाही का ? खरोखर तसं पाहिलं तर या भक्तीला, उपासनेला, नामाला कुठलीच अडचण अडवीत नाही. आपल्याला आतून करावंसं वाटत नसलं किंवा तेवढी तळमळ नसली की, साऱ्या अडचणीच अडचणी ! तसं सारांशानं नि सूक्ष्मपणानं पाहिलं तर अडचण खरी आपली स्वत:चीच ! ती जर गेली, तर मग परिस्थिती तुम्हाला नाही अडवीत ! एक वेळ अमुक एका पद्धतीनं उपासना करता येणार नाही.

पण प्रपंचाचं, व्यवहाराचं, व्यवसायाचं, नोकरीचं, स्वयंपाकपाण्याचं आपलं रोजचं काम करताना तरी निदान भगवंताचं स्मरण ठेवायला कुणाची आडकाठी असत नाही, कुठली अडचण असत नाही. तेवढी तळमळ आपल्याला नसते हे म्हणावं, पण अडचणींवर घालण्यात अर्थ नाही.

विनोबा म्हणत, भक्ताला भक्ती करायला परिस्थिती कधीच प्रतिकूल किंवा अडचणीची नसते, फक्त भक्ती करण्याची तळमळ मात्र हवी. अग्नीसाठी जसं जंगल तोडून रस्ता करून द्यायला लागत नाही, तोच आपला रस्ता करून घेतो तशी भक्ताची तळमळ आपला मार्ग काढते.

श्री महाराजांनी तर यावर मार्मिक सांगितलं आहे. ते म्हणाले, काशीला जाऊ म्हणत जन्म जातो. दरवेळी ही ना ती अडचण उभी राहून जायचं होत नाही. पण तीच स्वत:ची मुलगी काशीला द्या. मग काशीला जायला अडचण उरत नाही. माणूस एकदाच काय, वारंवारसुद्धा जाऊन येईल. मग इतकी वर्षं आलेल्या त्या अडचणी कुठं गेल्या ? तर त्या तशा नसतात. पण आपल्यालाच निकड नसल्यानं त्या भासतात आणि ते भासणं आपल्याला सोयीचं असल्यानं आपण ते भासू देतो, असंही दिसून येईल !

तेव्हा या पार्श्वभूमीवर जर आपण आपापल्या परिस्थितीचं निरीक्षण करू तर कितीतरी अडचणींचा परिहार झाल्याचं दिसेल. हेही लक्षात येईल की, यांतल्या खऱ्याच अडचणीच्या गोष्टी किती नि केवळ सबबीच्या गोष्टी किती, हे आपलं आपणच चांगलं सांगू शकू. त्या जर सबबीच असतील तर फेकून देणंही आपल्याच हातात आहे. त्यातही पुन्हा असं आहे की, एकवेळ अवडंबराच्या गोष्टी करायला अडचणी असतील, मोठी पूजा मांडणं कदाचित आपल्याला अनेक दृष्टीनं अडचणीचं असेल, पण त्यातलं जे खरं मर्म आहे ते अगदी तुळशीपत्र, नाहीपेक्षा फक्त भक्तिभावाचा नमस्कार, त्याला तर अडचण दिसणारच नाही. या साऱ्या दृष्टीनं आपला आपण विचार करू तर त्या अडचणी उरण्यापेक्षा न उरण्याची शक्यताच जास्त !

*

१९. आपला विशालपणा

श्री महाराज म्हणत 'आपल्या विशालपणाची आपल्याला कल्पनाच नाही.'

प्रपंचातल्या साध्या साध्या घटनांनी आपलं चित्त सतत खालीवर होत असतं. कित्येक गोष्टी करायची स्वप्न उराशी बाळगून उमेदीनं तरुणपणी कामाला लागणारा माणूस अनेकदा शरीरानं थकून एखाददुसरं काम, तेसुद्धा कसंबसं जमून त्यावरच समाधान मानतो, निसर्गाविरुद्ध लढून त्यावर विजय संपादन करण्याच्या घोषणा करणारा अन् त्याला काबूत आणण्याच्या वल्गना करणारा माणूस अखेर एक दिवस मुकाट्यानं निसर्गाच्या स्वाधीन होतो - या आणि अशा कित्येक घटना अनुभवीत असणाऱ्या माणसाला पाहूनसुद्धा श्री महाराज त्याला विशालपणाची जाणीव देऊ इच्छितात, हे काय असावं ?

असं होतं की, एखादा गल्लीतला खेळाडू असतो तो अमक्यातमक्यांचा बाळ म्हणून ओळखला जातो. पुढं तो शेजारच्या गल्लीवाल्याबरोबर मॅच खेळायला जातो. तिथं तो अमक्या गल्लीचा खेळाडू म्हणून ओळखला जातो. पुढं तो दुसऱ्या गावच्या खेळाडूंबरोबर खेळायला जातो, तिथं तो त्या गावचा खेळाडू म्हणून ओळखला जातो. असं करीत करीत हळूहळू त्या त्या तालुक्याचा, जिल्ह्याचा, राज्याचा बनतो. बाळ तोच असतो. पण अखेर तो त्या देशाचा बाळ म्हणून ओळखला जातो. यात भौगोलिकदृष्ट्या तो जेवढ्या गोष्टींशी जोडला जाईल, तितकी त्याची विशालता वाढत जाते.

आणखीही एक प्रकारचा अनुभव आपल्याला येतो. आपण एखाद्या घरात राहतो, त्यावेळी आपल्याला त्या घराचं छप्पर खूपच उंच वाटतं !

घराबाहेर आपण पडलो तर आपल्याला आणखीही खूप उंचच उंच घरंही दिसतात. मग आपलं घर त्यामानानं लहान वाटतं. पण गाव केवढं प्रचंड आहे असं वाटतं ! कधी गावाशेजारच्या एखाद्या टेकडीवर, डोंगरावर आपण जातो. वर गेल्यावर तर सारी उंचच उंच वाटणारी घरं, काड्यापेट्यांसारखी किंवा पत्त्यातल्या बंगल्यांसारखी वाटायला लागतात. इतकंच काय क्षितिजापर्यंत जर आपली नजर पोचली तर, मग सबंध गावसुद्धा छोटंसंच वाटतं !

यात हे सारं दृश्य, इमारती, रस्ते, गाव लांबीरुंदीनं थोडंच बदलतं ? बदलतो ते आपणच. भौतिक, भौगोलिकदृष्ट्यासुद्धा माणसाला विशालपणाची शक्यता नेहमीच असते. शरीराच्या विकासानं माणूस अत्यंत लहान अवस्थेपासून मोठ्या परिपक्व अवस्थेपर्यंत जाण्याची निसर्गाची एक व्यवस्था आहे, हे आपण सर्वजण पाहातोच. तशीच आणखी एका दृष्टीनं पूर्ण नि परिपक्व होण्याची निसर्गाची एक व्यवस्था आहे. ती मनाच्या पातळीवर, अंतरात आहे. बाहेरून शरीरानं विशाल होण्याला, पूर्ण होण्याला एकवेळ काही मर्यादा असेल. पण या आंतरिक विशालपणाला, विस्तारत जाण्याला नि पूर्ण होण्याला मात्र खरोखरच, चांगल्या अर्थानं मर्यादा नाही. मनानं किती मोठं व्हायचं, किती विशाल व्हायचं ठरवलं आहे तेवढं मोठं, तेवढं विशाल होता येतं. 'तुका आकाशाएवढा' हेही शक्य आहे.

आपण पाहातोच की, एखाद्या घरामध्ये एखादा माणूस मनानं संकुचित असला, स्वत:पुरतं पाहाणारा असला की, तो दुसऱ्याचा विचार करू शकत नाही. घरात चार माणसं एकत्र असणार म्हटल्यावर दुसऱ्याचा विचार केल्याशिवाय चालणं शक्यही नसतं. मग अशा माणसाचा इतरांना त्रास सुरू होतो. त्याची स्वत:चीसुद्धा धुसफूस सुरू होते. अशा त्रासाच्या अवस्थेत आपण वर्षानुवर्षं काढतो वर म्हणतो, 'घर म्हटल्यावर असं होणारच.' हे म्हणून आपण मोकळे होतो. पण मूळ बिघाड कुठे आहे त्याची ना चौकशी करीत, ना उपाययोजना करीत. त्या विशाल होऊ शकणाऱ्या पण न झालेल्या

मनात बिघाड असतो. तेच मन की, जे स्वत:पलीकडं स्वत:च्या कुटुंबातल्या माणसांचासुद्धा विचार करू शकत नाही, ते दुसऱ्याचा किंवा तिसऱ्याचाच काय, साऱ्या जगाचा विचार करू शकतं नि त्याद्दष्टीनं प्रत्यक्ष जगू शकतं !

कुणाशी विसंवाद किंवा कुणाचा राग यायचं कारण आपण पाहिलं तर या संकुचित मनातच आहे. ते विशाल झालं तर मग विरोध नि विसंवाद असला तरी आपलं मन विशाल करून तो संपवता येतो. त्रासाचा प्रश्न राहात नाही. विख्यात फ्रेंच तत्त्वज्ञ डेकार्टचे किती निंदक होते. पण त्याचा मात्र कुणाशी विसंवाद नसे. तो कधी निंदकाचं पारिपत्य करायला जात नसे. लोकांना आश्चर्य वाटे की, हे याला कसं साधतं. त्यावर तो म्हणे की, मी अशा निंदकाला पाहिलं किंवा त्यांची निंदा ऐकली की, स्वत:ला एवढ्या विशाल पातळीवर नेतो की, तिथं हा माणूस, त्याचा विरोध, त्यानं केलेली निंदा काहीच असत नाही, पोचत नाही.

विशाल होऊ शकणं ही तर मनाची मोठी ताकत. साऱ्या विश्वाच्या पार्श्वभूमीवर कस्पटाएवढंसुद्धा अस्तित्व न जाणवणारा आपल्यासारखा सामान्य माणूस मनाच्या विशालतेनं आकाशाएवढा होऊ शकतो. नियतीचा, निसर्गाचा किंवा प्रारब्धाचा केवढाही घाव तो लीलया पेलू शकतो. त्याला लहानाशी लहान अन् थोराशी थोर होता येतं.

पूर्वी म्हटल्याप्रमाणं ज्याच्याशी जोडला जाईल तेवढा माणूस विशाल होतो. मनही ज्याच्याशी जोडलं जाईल तेवढं विशाल ते बनू शकतं. असं सर्वांत विशाल अन् व्यापक काय आहे ? तर परमार्थद्दष्ट्या भगवंत ! त्याच्याशी जर मन जोडलं जाईल तर ते तेवढं विशाल बनू शकेल !

म्हणून श्री महाराज म्हणत आपल्या विशालपणाची, आपण किती विशाल बनू शकतो याची कल्पना आपल्याला नाही ! ती कल्पना येण्यासाठी या साऱ्या पारमार्थिक उद्‌बोधनाचा प्रपंच आहे. ती कल्पना आली तर माणूस त्या दिशेनं विचार करू शकेल, प्रयत्न करू शकेल नि त्याला ते साध्यही होऊ शकेल.

कारण 'देहोऽहम्' हा जसा अनुभव आहे तसाच 'शिवोऽहम्' हाही अनुभवच आहे. म्हणजे असं की, देहोऽहम् म्हणजे मी देह आहे. याचाच अर्थ मी, माझा देह, माझ्या देहाची सुखदुःखं, माझी मतं, आग्रह, माझे बेत, मतलब, स्वार्थी विचार - अशा सगळ्या गोष्टीच प्रधान आहेत. त्याच्यापुढं इतरांचा विचार करायलासुद्धा मनुष्य तयार होत नाही. त्याची स्वतःची कल्पना असते की, या सगळ्या 'माझ्या' गोष्टी सांभाळल्या गेल्या म्हणजे मी अत्यंत सुखी होईन. पण ही कल्पना किती संकुचित आहे, याचा अनुभव आज हजारो वर्षं लाखो माणसं घेत आहेत. त्यांनीही या सगळ्या स्वतःच्या स्वार्थाच्या कल्पना पुऱ्या करण्याचा वेगवेगळ्या पातळीवर प्रयत्न करूनसुद्धा त्यांची सुखी होण्याची कल्पना फोल ठरलेली आहे. त्याअर्थानं अशा संकुचित कल्पना नेहमीच फोल ठरतात. याकडं महाराजांनी लक्ष वेधलं आहे.

त्याचा अर्थ असाही आहे की, आपण असाच जर संकुचितपणाऐवजी विशालतेचा आणि स्वार्थाऐवजी निःस्वार्थाचा विचार करायचा ठरवला, तर येणारा अनुभव अर्थातच निराशाजनक न येता आनंददायी येईल, येतो. जी अशी माणसं मन विशाल करून जगतात ती अर्थातच कितीतरी सुखी असल्याचं आपल्याला आढळून येईल !

फक्त गरज आहे ती श्री महाराजांच्या या सुवचनाच्या चिंतनाच्या रूपानं विशालतेची ओळख करून घेण्याची नि त्याकडं वळण्याची !

*

२०. शिक्षण

आजच्या शिक्षणाचा मुख्य भर हा विविध बाह्य विषयांचं ज्ञान किंवा माहिती देण्यावर आहे. एखाद्या विषयातलं कौशल्य किंवा प्रावीण्य मिळालं आणि त्याचा उपयोग पैसा मिळवण्यासाठी व्हायला लागला की, आपण ते शिक्षण चांगलं समजतो किंवा शिक्षणसुद्धा असं एखादं कौशल्य विद्यार्थ्याच्या अंगी निर्माण करण्यातच अलीकडं इतिकर्तव्यता मानू लागल्याचं दिसतं. विद्यार्थ्याला उपजीविकेचं साधन उपलब्ध करून देण्यानं शिक्षणाचं कार्य संपेल का ? विद्यार्थ्याला एक चांगला माणूस म्हणून, समाजाचा एक जबाबदार घटक म्हणून किंवा मानवी जीवनाचं सार्थक घडवू शकणारा मनुष्य म्हणून घडवणं हे शिक्षणाचं कार्य नको का असायला ? एखाद्या बाह्य विषयाचं ज्ञान कितीही उत्तम आलं तरी त्यामुळं किंवा तेवढ्यानं माणूस हा 'माणूस' म्हणून परिपूर्ण होईल का ? कोणताही सामान्य माणूससुद्धा याचं उत्तर देऊ शकेल.

अशा या शिक्षणासारख्या मूलभूत, दूरगामी परिणाम असलेल्या विषयावरसुद्धा श्री महाराजांच्या अनेक वचनांतून महत्त्वाचा प्रकाश पडतो. ते म्हणत 'असल्या बाह्य जगाच्या ज्ञानानं माणसाचं अंतरंग सुधारणार नाही.'

आणि खरं पाहाता अंतरंग सुधारणं हे तर ध्येय असायला हवं. अंतरंग सुधारलं तर माणूस हा माणूस म्हणून घडेल, आदर्श होईल. नाहीतर एखादा माणूस हा एखाद्या विषयाच्या सखोल ज्ञानानं विषयतज्ज्ञ होईल, शास्त्रज्ञ होईल, निपुण होईल पण अंतरंग न सुधारल्यानं तो स्वार्थीच राहील, लोभी राहील, कोपिष्ट राहील.

बाह्य प्रपंच व्यवहारासाठी आवश्यक ती विद्या त्याला मिळवावीच लागेल. पण याही पलीकडं आणि याहीशिवाय आणखी काही अंतरंग

सुधारणारी विद्या त्याला मिळवावी लागेल. जिला आपण परमार्थविद्या म्हणूया.

आता साधारण मनुष्य 'परमार्थविद्या' म्हटलं की बिचकेल. तो म्हणेल माझ्या मुलाला उत्तम शिकवून-वकील, डॉक्टर, इंजिनिअर किंवा आणखी कुणी करीन - त्यासाठी मी पाहिजे तेवढे कष्ट घ्यायला तयार आहे. पण त्यानं अंतरंग सुधारण्याची विद्या मिळवायचं कारण काय ?

असं म्हणताना आपण दोन धोके वा त्रुटी पत्करीत आहोत, हे तो विसरतो आहे. एकतर हा मुलगा उच्चशिक्षित होऊन, खूप पैसा, मान मिळवूनही याच गृहस्थाशी कृतघ्न झाला, वडील म्हणून त्यांच्याशी साधा चांगला वागला नाही तर, मात्र मागाहून खूप दुःख होईल. अशा तऱ्हेची दुःखं होण्याची उदाहरणं आपल्याला नवीन नाहीत.

मुलांची कुवत आहे, त्यांच्या ठिकाणी बुद्धिमत्ता आहे, आपल्याला त्यांना पैशाचं किंवा इतर पाठबळ देणं शक्य आहे म्हणून आपण त्या साऱ्या गोष्टी देत जातो, हे तसं पाहिलं तर स्वाभाविक आहे. पण त्यापासून जे पदरात पडतं, त्याच्याकडं लक्ष असलेले पालक किंवा लोक कमी असतात. आपण हे लक्षात घ्यावं की, आपण आपल्याला या साऱ्या अनुकूलता असल्यामुळं जे पाठबळ देत गेलो, त्याचा लौकिक परिणाम म्हणून तो मुलगा किंवा आता युवक म्हणू, तो जो विषय शिकतो आहे, त्यात तज्ज्ञ झाला, त्यानं त्यात नाव कमावलं.

आता स्वाभाविकपणे त्याच्यासमोर देशात मिळणाऱ्या संधीसुद्धा कमी दर्जाच्या वाटतील अशा मोठमोठ्या मानाच्या, मिळकतीच्या संधी, पदं ओघानं त्याच्याकडं येतात. हे आपल्याला स्वाभाविक वाटतं उलट अनेकांना त्याचं मोठं कौतुकही असतं. त्या साऱ्या संधींच्या साहाय्यानं त्याला मिळणाऱ्या आणि खूप पैसा, सुखसोयी देऊ शकणाऱ्या त्या पदासाठी त्याचं विमान परदेशी उड्डाण करतं. एकदा तिथं जाऊन तिथला झगमगाट, स्वच्छता, आपल्यापेक्षा कितीतरी पट असलेली समृद्धी, शिस्त, सुखसाधनं-

अशा असंख्य गोष्टी त्याला एकदम मिळतात. परिणाम म्हणून हे सगळं स्वाभाविकच आहे.

त्याचा परिणाम म्हणून त्याला अर्थातच आपला देश काय, आपलं कुटुंब काय किंवा ज्यांनी हे सगळं मिळण्याचा पाया घालून दिला-ते आपले आईवडील किंवा भावंडं काय, सारंच आता मागासलेलं वाटू लागतं. त्याच्या प्रतिष्ठेच्या जीवनमानाला हे सारं जुळत नाही, त्यामुळं स्वाभाविकपणे त्यांचं काही ऋण आपण लागतो, हे तर असे अनेकजण विसरून जातातच पण त्याहीपुढं जाऊन त्यांनी आपल्यासाठी काही विशेष केलं आहे, याची जाणीवही त्याला उरत नाही. उलट त्यांचा संपर्क, इथलं राहणीमान या सगळ्यांपासून आपण जेवढं दूर राहाता येईल, तेवढं राहू. आपलं उच्चभ्रू व्यक्तित्व, वातावरण टिकवून धरावं, असं अशा लोकांना वाटू लागतं.

आता आपल्याला थोडं मागं जाऊन विचार करावा लागेल की, एखाद्या विषयाचं शिक्षण आणि इतर सबंध जीवन आणि त्याचं शिक्षण याचा विचार या शिक्षणपद्धतीत कुठंतरी सुटला आहे. लौकिक शिक्षणानं, पदवीनं, प्रतिष्ठेनं, संधीनं कशानंही मनुष्य कितीही मोठा झाला, तरी त्याला आपल्याला जन्म देणाऱ्यांपासून इथपर्यंत आणण्यापर्यंत सर्वांचं स्मरण ठेवण्याचं, त्यांचे उपकृत राहण्याचं, कृतज्ञतेनं पुढं आयुष्यभर त्यांच्या उपकारांची जाणीवपूर्वक परतफेड करण्याचं शिक्षण-या साऱ्या शिक्षणात दुर्लक्षित झालं आहे, इतकंच नव्हे तर हरवून गेलेलं आहे. त्याचा परिणाम म्हणून एका बाजूला अशी माणसं दुरावण्याचा दुष्परिणाम झाला, तर दुसऱ्या बाजूला इथल्या माणसांना उपेक्षितपणाची, एकाकीपणाची खंत निर्माण झाली. म्हणून खरं शिक्षण कोणतं आणि ते व्यापक का असावं लागतं, याकडं श्रीमहाराज लक्ष वेधीत आहेत. अर्थातच बाह्य शिक्षणाबरोबर, त्याला त्याचं अंतरंग विशाल करण्याची विद्या दिली नाही, हे आहे.

दुसरी त्रुटी अशी की, माणूस म्हणून त्या मुलाला स्वत:चा अंतिम विकास अखंड आनंद-समाधान वा मोक्ष साधायची संधी उपलब्ध झालेली

आहे, याची त्याच्या ठिकाणी जाणीव न फुलवण्यानं नि त्या संबंधी काही वातावरण, विद्या वा अभ्यास त्याला करायची संधी न दिल्यानं त्या मुलाच्या मोठ्या व्यक्तिगत हानीलाही आपण हातभार लावला, किमान त्यासंबंधी आपलं कर्तव्य पाळण्यात आपल्याकडून कुचराई झाली, हाही आपलाच दोष आहे.

म्हणून बाह्य ज्ञान, कौशल्य जरूर मिळवावं, पण अंतरंग बदलू शकणारी काही विद्या, काही शिक्षण देण्याकडं किंवा घेण्याकडं प्रयत्न झाले तरच काही स्वास्थ्याची आपण अपेक्षा करू शकू.

उपनिषदांच्या काळातील मैत्रेयीची गोष्टही यावर प्रकाश टाकते. ब्रह्मज्ञानी याज्ञवल्क्यांकडं संपन्नता होती. कात्यायनी आणि मैत्रेयी या त्यांच्या दोन पत्नी. संन्यासाश्रम स्वीकारायचा ठरल्यावर त्यांनी दोघींनाही बोलावून आपली ब्रह्मविद्येची आणि लौकिकातील संपत्तीची वाटणी करून घ्यायला सांगितलं. कात्यायनीनं सारी भौतिक संपत्ती उचलली. पण मैत्रेयीनं विचारलं की, ही संपत्ती घेऊन मी पूर्ण आनंदी किंवा मुक्त होईन का ? याज्ञवल्क्यांनी अर्थातच नकार दिला. त्यावर ती म्हणाली, 'मग मला ही संपत्ती नको. तुम्ही ज्या विद्येनं मुक्त झाला ती विद्याच मला द्या.'

विद्येनं किंवा शिक्षणानं माणूस मुक्त झाला पाहिजे. आपलं पूर्वापार बोधवाक्य हे 'सा विद्या या विमुक्तये' 'मुक्त करते ती विद्या' असंच आहे. श्री महाराज आणखी एका वचनात म्हणतात, 'खऱ्या उत्तम शिक्षणाचं पर्यवसान अभिमान नाहीसा होण्यात आहे !'

अशा तऱ्हेनं मुक्त होण्याचा प्रयत्न करताना माणसाला बंधनं आड येतात. ती खूपच प्रकारची आहेत. पण सर्वांत सूक्ष्म अन् नाहीसं करायला अवघड बंधन कुठलं असेल तर ते 'अभिमान वा अहंकाराचं' ! अभिमान कशाचा असेल हे खरोखर सांगता येत नाही. तो कुणाला असेल हेही सांगता येत नाही. श्रीमंताला तो आहे नि गरीबाला नाही असं नाही. तो पैशाचाच असतो असं नाही. आपल्या गरीबीचा असू शकतो. भिकारीसुद्धा सहज

म्हणून जातो की, 'त्यांनी एकदा नाही म्हटलं तेव्हापासून त्या घराची पायरी चढलो नाही.'

अभिमान कर्तबगारीचा असतो, शिक्षणाचा, विद्येचा असतो, सत्तेचा वा पैशाचा असतो याचं नवल नाही, पण तो सत्कृत्यांचा असतो, साधनेचासुद्धा असू शकतो हे लक्षात येतं, तेव्हा आश्चर्य वाटतं ! जिथं अभिमान आहे, मीपणा आहे, तिथं अखंड समाधान कुठलं असायला ! म्हणून तो कसा कळेल, कसा दूर करता येईल याचं शिक्षण, याचा विचार खऱ्या शिक्षणात अंतर्भूत असायला हवा. म्हणून श्री महाराज म्हणत तसं 'अभिमान नाहीसा करणारं शिक्षण हे उत्तम शिक्षण' म्हणावं लागेल.

ब्रह्मानंद हे श्री महाराजांचे प्रख्यात शिष्य अतिशय विद्वान होते. पण विद्येबरोबर येणारा हा अभिमान आपल्या मुक्ततेच्या आड येणार हे ओळखून ते श्री महाराजांना प्रार्थना करून म्हणाले, 'माझी विद्या आपण घ्या !'

त्यामुळं अभिमानाच्या उपद्रवाची कल्पना देऊन तो नाहीसा करायला शिकवणारं, त्या अर्थानं माणसाची भगवंताशी गाठ घालून देणारं आणि त्याला खरं समाधान देऊ शकणारं शिक्षण ते खरं शिक्षण म्हणावं लागेल. या संदर्भात एकदा श्री महाराज एका वचनात म्हणाले, 'समाधान देईल, भगवंत जोडेल ती खरी विद्या !'

म्हणून सामान्य प्रापंचिक माणसं या नात्यानं आपण पोटापाण्याची लौकिक विद्या जरूरच घेऊ, पण तिची मर्यादा ओळखून अशी खरी विद्या, उत्तम शिक्षणही घेऊ, जे आपल्या मनुष्यजन्माचं सार्थक करील.

*

२१. खरा परमार्थी

साधारणपणे परमार्थाला लागलेला माणूस म्हणजे आपली प्रापंचिक कामं, जबाबदाऱ्या नीट पार पाडू न शकणारा, विरक्त, कुणाशी न मिसळता राहणारा अशासारख्या काही रूढ कल्पना आपल्या डोळ्यांसमोर उभ्या राहतात. त्यातही त्याचा जगाशी, इतरांशी सबंध आला की, तो इतरांना उपदेश करीत सुटणारा असतो अशीही एक कल्पना पुढं येते. साहजिकच, असा पारमार्थिक माणूस काय काय करीत असेल, असं विचारलं तर आपण सहजपणानं सांगू की, तो देवळात नियमितपणानं जात असेल, उपासतापास करीत असेल, पोथ्यापुराणं वाचीत असेल इत्यादी इत्यादी.

पण श्री महाराज 'खरा' परमार्थी माणूस नेहमी काय करीत असतो हे सांगताना म्हणतात की, 'खरा परमार्थी माणूस सतत आत्मपरीक्षा करीत असतो !' कारण ते न करील तर त्याचा खरा परमार्थ घडणार नाही. कारण खरा परमार्थ हा वृत्ती बदलण्यात आहे, अनासक्तपणे प्रपंचाचं, कर्तव्याचं काम करण्यात आहे. ते तसं होतं आहे की नाही हे कळायला आपल्याला आपली आजची स्थिती कशी आहे नि या साऱ्या परमार्थाच्या समजल्या जाणाऱ्या कृती केल्यानंतर तीच स्थिती कशी आहे किंवा प्रपंचातली आपली कर्तव्य पार पाडताना आपली आतली स्थिती कशी आहे, त्यात काही फरक पडतो आहे का - हे पाहाणं त्याच्या पारमार्थिक वाटचालीला अतिशय गरजेचं आहे. हे आत्मपरीक्षेनंच साधतं, नाही का ?

अगदी पारमार्थिक समजल्या जाणाऱ्या पूजाजपउपवासादी कर्मांतही त्याची दृष्टी हीच राहते. उदाहरणच पाहायचं झालं तर त्यानं उपास केला तर तो खराच उपवास करील. जो काही बदल त्यानं आचरणात त्या दिवशी केला असेल - मर्यादेनं खाल्लं असेल, मर्यादेनं पाहिलं असेल - त्या आचरणानं

भगवंताच्या जवळ राहायला, 'उप'वासात असायला किंवा भगवंताच्या नामस्मरणात राहायला किती मदत झाली हे तो पाहील. नसेल तर ती कशी होईल हे पाहाण्यासाठी तो आवश्यक तसा बाह्य आचार बदलील. या पदार्थाच्याऐवजी तो पदार्थ खाईल, पण मूळ आत्मपरीक्षणानं चित्त भगवंतापाशी कसं, किती राहातं ते पाहील.

त्यानं तीर्थयात्रा केलीच तर त्या यात्रेनं किंवा एखाद्या पवित्र ठिकाणी जाण्यानं स्वत:चा एखादा अवगुण कमी झाला का किंवा स्वत:त विधायक बदल घडवायला त्या यात्रेचा काही उपयोग झाला का ते पाहील. मग त्यासाठी त्याला यात्राच करावी लागेल असं नाही. तो त्याचं दैनंदिन काम करतानासुद्धा ते या वृत्तीनं करून स्वत:चं परीक्षण सुरू ठेवील.

आपण अधिक पाहिलं तर असं आढळून येईल की, सत्पुरुषांचं स्वत:चंही हे आत्मपरीक्षण सतत चालू असतं. श्री तुकोबांची गोष्ट आहे - त्यांची परिस्थिती यथातथाच होती, पण त्यांच्या सासऱ्यांनी त्यांना एक दुभती म्हैस दिली होती. त्यांच्या स्वभावानुसार ते आधी तिच्या वासराला दूध पाजीत आणि उरलेलं दूध घरात वापरीत.

एकदा नेहमीप्रमाणं देवळात त्यांचं कीर्तन सुरू होतं. नेहमीप्रमाणं कीर्तन रंगात आलेलं असताना इकडं तुकोबांच्या घरात चोर आला. त्यानं त्यांची दारची म्हैसच पळवली. पण दूर गेल्यावर त्याला काय वाटलं कुणास ठाऊक. त्याचं मन त्याला खायला लागलं. तुकोबांची म्हैस आपण चोरली.

तो इतका त्रस्त झाला की, उलट्या पावली म्हैस आणून परत दाव्याला लावली. पण तरी त्याचं चित्त त्याला गप्प बसू देईना. देवळात जाऊन तुकोबांची त्यानं माफी मागितली. आता सामान्य प्रापंचिक किंवा साधा पारमार्थिक असता तर त्यानं माफी केली असती, नपेक्षा कोतवालाकडं त्याला दिला असता. विषय मात्र तिथंच संपला असता. पण तुकोबांनी त्याला माफ तर केलंच पण वर म्हणाले, 'तुम्हाला अगदीच गरज असेल तर तुम्ही ती म्हैस अजूनही घेऊन जा.' चोर काही तयार झाला नाही.

तो निघून गेल्यावर या 'खऱ्या पारमार्थिका'चा विचार सुरू झाला की, 'चोराला माझ्याकडं यावंसं का वाटावं ? माझ्याकडं चोराला चोरी करावीशी वाटली, याचाच अर्थ माझ्यातही अशीच काही चोरीची वृत्ती असली पाहिजे. स्वत:च्यासारख्या स्वभावआवडीच्या माणसाकडंच माणूस ओढ घेतो. तसं यात काहीतरी घडलेलं असणारच. याचा अर्थ माझ्याकडूनही कुठं तरी अशी चोरी होत असली पाहिजे. इत्यादी इत्यादी.' त्यांच्या अखेर लक्षात आलं की, मुळात म्हैस आपली नव्हे. शिवाय तिला तिचं वासरू आहे. म्हशीकडच्या दुधाची सोय खरं सांगायचं तर देवानं तिच्या वासरासाठी केली आहे. म्हैस आपली नसल्यामुळं जर समजा वासराला पुरूनही दूध उरत असेल, तर आज जे आपण स्वत:च्या मुलांसाठी दूध वापरतो, ते आधी इतर गरजू मुलांना देणं आवश्यक आहे. हे लक्षात आल्यापासून, त्या म्हशीचं राहिलेलं दूध आधी गावातल्या गरीब मुलांना द्यायला त्यांनी सुरुवात केली.

कुठलीही घटना घडल्यावर सामान्य माणसाच्या होणाऱ्या प्रतिक्रिया आणि खऱ्या पारमार्थिक माणसाच्या होणाऱ्या प्रतिक्रिया किंवा खऱ्या पारमार्थिक माणसाकडून अपेक्षित असलेल्या प्रतिक्रिया यांतला फरक या घटनेतून लक्षात येतो. तशा तऱ्हेच्या असंख्य घटना संतचरित्रांतून तर आढळतातच पण आपल्यासारख्यांच्या आयुष्यात जर आपण सावध असू, तर अशा स्वरूपाच्या घटनाही अनेक वेळा घडत असतात.

यात प्रतिक्रियांत फरक कुठं पडतो ? तर सामान्य माणूस अशा काही घटना झाल्या की, स्वाभाविकपणे आपण बरोबर आहोत, अशा समजुतीत असतो. अर्थातच त्या घटनांत दुसऱ्याचं काहीतरी चुकलं आहे, अशी त्याची भावना असते. त्यामुळं एका बाजूनं तो स्वत:चं समर्थन करतो, तर दुसऱ्या बाजूनं इतरांचे दोष हुडकतो. त्यामुळं सामान्य माणूस 'सामान्य'च राहातो.

यात जाता जाता हे लक्षात घेणं आवश्यक आहे की, असल्या

घटनांमध्ये, त्या दुसऱ्यांशी संबंधित असल्यामुळं त्यांच्याबद्दलचे विचार, त्यांचे दोष, त्यांच्या चुका - अशा गोष्टी पहिल्यांदा मनात येतात. परमार्थाची खरी ओळख नसल्यामुळं पुढं चिंतन होतं तेही इतरांच्या चुका, त्रुटी, दोष - यांबद्दल. समर्थनाच्या नकळत प्रवृत्तीमुळं आपण करीत चाललेला विचार बरोबर आहे, अशीही मनाची समजूत होते. अर्थात या साऱ्याचा शेवट आपल्यातल्या त्रुटी, दोष, उणीवा - यांचं खापर दुसऱ्यांच्या डोक्यावर फोडण्यात होतो. यानं त्यांचं किती नुकसान होतं, हा प्रश्न वेगळाच आहे. पण स्वतःचं नुकसान होतं, हे मात्र पारमार्थिकदृष्ट्या नक्कीच सत्य आहे. ज्याला खरा परमार्थ करायचा आहे, त्याला याचं महत्त्व किती आहे, हे लक्षात येऊ शकेल.

या बाबतीत निंबाळ पंथातले थोर सत्पुरुष म्हणत की, पोथी सांगायची झाली, तरी ती आपल्यावर घ्यावी. वास्तविक, परंपरागत पद्धत अशी आहे की, श्रोते जणु काही अडाणी आहेत आणि पोथी सांगणाऱ्याचं काम त्यांना ज्ञान देणं हे आहे. अर्थातच ते देताना त्यांचे, इतरांचे, जगाचे असे जे दोष या पोथीच्या निमित्तानं समोर ठेवायचे असतात - ते ठेवीत पोथी सांगणं. पण या थोर सत्पुरुषांचं म्हणणं असं की, पोथीतून इतरांना काय मिळालं, त्यांची प्रगती किती झाली, हा खरा पारमार्थिक पोथी सांगणाऱ्याचा विषय नाही. त्यानं पोथी सांगताना त्यानिमित्तानं स्वतःतले कुठले दोष स्वतःला जाणवले, ते जाणून योग्य तो बदल करून आपली पारमार्थिक प्रगती किती झाली, ते बघावं, हा खरा पोथी सांगण्याचा फायदा आहे. यातूनही खऱ्या पारमार्थिकाची, साधकाची, त्याच्या वाटचालीची ओळख आपल्याला होऊ शकेल.

कुठल्याही घटनेकडून आत्मपरीक्षणाकडं येण्याची वृत्ती खऱ्या पारमार्थिकात असेल तर त्याचं आकलनही वाढतं, प्रगतीही होते. एका माणसाला तो उदार वृत्तीचा असूनही एखादा तब्येतीनं ठणठणीत भिकारी भिक्षा मागताना पाहिला म्हणजे मात्र राग येई नि तो अनावर होई. त्यावर काय करावं असं त्यानं एकदा श्री महाराजांना विचारलं.

तेव्हा श्री महाराज म्हणाले की, धट्टाकट्टा माणूस भीक मागतो हे आपल्याला राग येण्याचं खरं कारण नाही. आत्मपरीक्षणानं खरं कारण शोधावं. खरं कारण असं दिसतं की, त्याला एवढी चांगली तब्येत दिलेली असताना कष्ट करायचं नि कमवायचं सोडून तो भीक मागतो, याचाच अर्थ तो आपल्या कर्तव्यात चुकतो, म्हणून आपल्याला राग येतो. त्याला तुम्ही काही द्या वा शक्य नसलं न द्या. पण रागावण्याचा अधिकार आपल्याला आहे का, याचा मनाशीच विचार करा. भगवंताच्या कृपेनं आपल्याला उत्तम मनुष्यदेह मिळाला आहे. त्यानं अखंड समाधान, भगवंत प्राप्त करून घेणं हे आपलंही कर्तव्य आहे. ते आपण तरी प्रामाणिकपणानं करतो का, याचा विचार करावा ! याबद्दल मग आपल्याला भगवंतानं किती रागवावं ? पण तो तसा राग न धरता तुमच्यावर कृपा करायला सदैव तयार असतो ! हे लक्षात घेण्यासारखं आहे.

अशा आत्मपरीक्षणाच्या वृत्तीनं खरा परमार्थी होण्यात ना वय आड येतं, ना व्यवसाय ! शिवाय आत्मपरीक्षण करीत गेल्यानं सतत एरवी जगाचे दोष काढण्यात जो वेळ जातो तो वाचतो, त्यानं स्वत:लाही समाधानाचा नि आनंदाचा मार्ग गवसतो, वेळेचाही रास्त विनियोग होतो. शिवाय आपला नेहमीचा प्रपंचव्यवहार करतानाही जमण्यासारखं हे आत्मपरीक्षेचं उपयुक्त साधन करता येतं. नेहमीची व्यवहारकर्तव्यं न चुकता करण्यावरही श्री महाराजांचा कटाक्ष असे. त्याला अनुकूल असंच भगवंत जोडणारं हे साधन आपण अवश्य विचारात घ्यायला हवं !

*

२२. संत आणि आपली इच्छा

सामान्य माणूस संतांकडं जातो तो अनेक अपेक्षा घेऊन जातो. प्रापंचिक अडचणी माणसाला नेहमीच असतात. त्या त्या वेळी त्याला जे जे व्हावंसं वाटतं, जे जे हवंसं वाटतं, ते ते तो संतांकडं मागतो. ते त्याला मिळालं तर त्याला वाटतं हा खरंच सत्पुरुष आहे, सामर्थ्यवान आहे, नाहीतर त्याला वाटतं हा सत्पुरुष खरा नाही. मनासारखं न झालं तर आपण अनेक संतांची, सत्पुरुषांची निंदा करायला किंवा त्यांना नावं ठेवायला कमी करीत नाही. हे वरवर पाहाता बरोबर वाटलं, तरी ते खरंच तसं आहे का, याचा विचार करण्याची गरज आहे.

याबाबतीत श्री महाराजांनी सांगितलेला विचार मनन करण्यासारखा आहे. श्री महाराज सूत्ररूपानं म्हणाले,'मागावं ते देईल तो संत नव्हे.' वास्तविक आपल्याकडं येणाऱ्या माणसानं जे जे मागितलं ते ते देऊन त्याला संतुष्ट करणं हे संतांचं काम नव्हे का ? असं आपल्याला वाटत असताना श्री महाराजांचं वचन ऐकलं की, जरा वेगळंच मत ऐकल्यासारखं वाटतं हे खरं. पण जरा अधिक खोलात गेलो नि सर्व बाजूंनी विचार केला तर त्यांच्या म्हणण्याचं महत्त्व नि सत्यत्व स्पष्ट होतं.

मागितलेलं मिळण्यात आपण इथं असं गृहीत धरलेलं दिसतं की, काय मागावं, किती मागावं, केव्हा मागावं हे सारं आपल्याला कळतं आहे. याचाच अर्थ असा की, आपल्याला जी जी इच्छा होते ती पूर्ण होणं यात आपलं कल्याण आहे. पण आपला आजवरचा अनुभव काय सांगतो ? आपल्या पूर्वीच्या आयुष्याकडं नजर टाकली तर असं अनेकदा आपलं आपल्यालाच आढळून येईल की, ज्या गोष्टी घडाव्या म्हणून आपण धडपडलो त्यांतल्या अनेक गोष्टी झाल्या नाहीत. यात विशेष नाही, पण त्या झाल्या

नाहीत तेच बरं झालं आणि आपल्या इच्छेप्रमाणं होण्यानंच जास्त नुकसान किंवा जास्त त्रास झाला असता हे आपल्या लक्षात आता येतं ! काही वेळा असंही झालेलं असेल की, आपण एखादी विशिष्ट गोष्ट मिळावी किंवा व्हावी म्हणून इच्छा धरून कष्ट केले, ती गोष्ट मिळाली पण तिचा अनुभव पाहाता ती आपल्या इच्छेप्रमाणं घडली नसती, मिळाली नसती तरच बरं झालं असतं, असंही वाटतं.एका गृहस्थाचं उदाहरण साधंसं पण पाहाण्यासारखं आहे. ते गावी जाण्यासाठी घरातून बाहेर पडले. वेळेत जावं, गाडी चुकू नये म्हणून रिक्षा केली. ती बंद पडली म्हणून दुसरी केली. ती ट्रॅफिक जॅममध्ये अडकली म्हणून पुन्हा थांबावं लागलं. एकूण इतकं करूनही त्यांना स्टॅण्डवर पोचायला उशीर झाला. तोवर गाडी चुकली. ते फार वैतागले. रिक्षावाले, ट्रॅफिक सगळ्यांना दोष दिला, अखेर गुरूंना दोष दिला. तुमचं स्मरण करून, गाडी मिळावी अशी प्रार्थना करून निघालो, तरीही गाडी चुकली, माझं नुकसान झालं असं सगळं म्हणाले. उलट्या पावली घरी आले. संध्याकाळच्या बातम्यात त्याच गाडीला भीषण अपघात झाल्याचं कळलं. मग मात्र त्यांची प्रतिक्रिया उलट झाली. गुरूंना मनोमन धन्यवाद द्यायला सुरुवात केली. तुम्ही वाचवलं, माझी गाडी मिळण्याची इच्छा पुरी केली नाही तेच बरं झालं असं म्हणू लागले.

प्रसंग साधासाच असला तरी त्यातून माणसाच्या 'इच्छे'वर प्रकाश पडतो. तसं पाहिलं तर पहिल्यांदा त्यांनी गुरूंना नावं ठेवली. ते चुकीचं नि निरर्थक ठरलंच पण तीच अवस्था खरं पाहाता दुसऱ्यांदा त्यांनी गुरूंना नावाजलं त्यावेळीही आहे. कारण दोन्ही वेळा त्यांना स्वत:चीच काळजी आहे. पहिल्यांदा स्वत:च्या कामाची आणि नंतर स्वत:च्या जिवाची. त्यांना गैरसोयीचं झालं की, नावं ठेवली नि सोय झाली की, पाया पडू लागले. 'इच्छे'च्या तऱ्हा, मर्यादा, पद्धती, त्रुटी नि 'मानवी आकलना'ची स्थिती हे अजूनही आपल्या लक्षात आलेलंच नाही !

व्यावहारिक यशापयशापेक्षा, बरोबर-चूक, सोयी-गैरसोयी यांपेक्षा

आपलं हित कशात आहे ते महत्त्वाचं आहे, नाही का ? आणि ते कळण्याची क्षमता सुदैवानं म्हणा, दुर्दैवानं म्हणा आपल्यात नाही. त्यामुळंच कोणती इच्छा बरोबर हे कधी कळेल का ? उद्याचं कळत नाही, आजचंही पुरेसं नि बरोबर कळत नाही. त्यामुळं घडावं वाटणारं घडणं चुकीचं ठरतं. त्यातही पुन्हा आपण एखाद्या रागासारख्या विकाराच्या अंमलाखाली असलो आणि त्यात एखादी इच्छा झाली आणि तसं घडलं तर त्यातलं नुकसान हे तर अनेकदा गंभीर अन् न भरून येणारं असू शकतं. हे आपण अनुभवलं असेल म्हणून एका बोधवचनात श्री महाराज म्हणाले, 'आपल्या इच्छेनुसार गोष्टी घडत नाहीत ही भगवंताची कृपाच आहे !'

जगात जो तो आपल्या इच्छेनुसार घडावं म्हणून धडपडत असताना हे वचन एक वेगळं पण शाश्वत सत्य सांगत आहे. कारण 'इच्छा करणारा मी' स्वार्थी, विकारवश, कोत्या वृत्तीचा, अपूर्ण आकलनाचा असला तर त्याची इच्छा पूर्ण होण्यात अनेकदा अहितच होतं. स्वत:चं नि इतरांचंही !

याबद्दल एका योग्याची गोष्ट प्रसिद्ध आहे. फार जोराचा वारा सुटला. त्याचा त्याला त्रास व्हायला लागला. म्हणून स्वत:च्या इच्छेनं योगाच्या सामर्थ्यावर तो वारा त्यानं रोखून धरला. परिणाम असा झाला की, दूर समुद्रावरून त्या वाऱ्याच्या जोरावर येणाऱ्या जहाजाला प्रचंड धक्का मिळाला. ते उलटलं नि शेकडो लोकांना प्राणाला मुकावं लागलं. म्हणून स्वत:च्या इच्छेप्रमाणं गोष्टी घडत नाहीत तेही बरंच.

संत काळावर सत्ता राखतात. आपलं दूरगामी, अंतिम हित कशात आहे हे ओळखून ते गोष्टी घडवतात. आपण काहीही मागितलं तरी योग्य ते देणं यातच त्यांचं संतपण आहे. त्यातही त्यांची खरी खुबी ही की, आपली मागण्याची इच्छाच नाहीशी करणं. ती त्यांनी वापरली तर एखादी गोष्ट घडेल वा न घडेल, पण समाधान अभंग टिकेल. या साऱ्या संदर्भात श्री महाराज म्हणत, 'मागावं ते देईल तो संत नव्हे.'

*

२३. पहिली प्रतिक्रिया

महाभारतातली घटोत्कचाची गोष्ट प्रसिद्ध आहे. तो भीमाचा हिडिंबेपासून झालेला पराक्रमी मुलगा. पांडवांना प्रिय असणं स्वाभाविक होतं. कौरवांचा तर तो कर्दनकाळ ठरला. त्यानं कौरवांचा एवढा संहार केला की, शेवटी दुर्योधनानं कर्णाला निर्वाणीची विनंती केली की, तुझ्याकडची अर्जुनासाठी ठेवलेली अमोघ शक्ती वापरून याला ठार कर, नाहीतर अर्जुनाबरोबर लढायलासुद्धा आपण उरणार नाही. अखेर कर्णानं तिचा वापर केला नि घटोत्कच गेला. हे कळताच कौरवात आनंद तर पांडवात शोककळा पसरली.

हे वृत्त ऐकताच अर्जुनासह सर्व पांडव दुःखात बुडून गेले. पण शांत होते ते श्रीकृष्ण. उलट ते आनंद व्यक्त करीत होते. याचं साहजिकच आश्चर्य वाटून अर्जुनानं अखेर श्रीकृष्णाला विचारलं की, 'घटोत्कचाच्या वधानं आपलं केवढं नुकसान झालं याची तुला कल्पना नाही का ? मग तुला लगेच दुःख कसं झालं नाही ?'

त्यावर श्रीकृष्ण म्हणाले, 'काहीही घडलं तरी एकदम दुःखी किंवा सुखी होऊ नये. त्याच्या मृत्यूनं तुम्ही लगेच दुःखी झाला नि शोक करीत बसला. तसं दुःख तर मलाही कळतं आहे. पण कर्णाकडं तुझ्यासाठी ठेवलेली प्राणघातक शक्ती नष्ट झाली ती घटोत्कचाच्या मृत्यूमुळं ! त्यामुळं या कौरवांचा अंतिम नाश ज्याच्याकरवी व्हायचा आहे तो अर्जुन वाचला आहे. म्हणून मी दुःखात नाही तर आनंदात आहे !'

व्यवहारात तर असं अनेकदा घडतं. कोणतीही घटना घडली की, त्यापासून होणाऱ्या सुखाची किंवा दुःखाची प्रतिक्रिया लगेच देऊन आपण मोकळे होतो. इतकंच काय लगेच त्यावरची प्रतिक्रियात्मक कृती-बरी, वाईट

काहीही असेल तीसुद्धा करून मोकळे होतो. पण काही काळ गेला म्हणजे ती कृती नि प्रतिक्रिया चुकीची ठरते. त्या त्या वेळी वाटलेलं सुखदुःखसुद्धा चुकीचं ठरतं.

साध्या साध्या प्रसंगांतूनसुद्धा हे आपल्याला दिसून येईल. एखाद्या माणसाला विशिष्ट वेळी काही कामासाठी आपण बोलावतो. प्रत्यक्षात तो दिलेल्या वेळी येत नाही. वाट पाहायला लागल्यानं स्वाभाविकच आपण चिडतो. थोड्या वेळानं तो येऊन पोचतो. त्याला पाहिल्यापाहिल्या आपली पहिली प्रतिक्रिया रागाची असते आणि हे 'पहिल्या प्रतिक्रिये'चं तत्त्व ठाऊक नसेल तर, आपण त्याच्यावर राग काढून मोकळे होतो. यावर तोही नाराज होऊन किंवा रागावून निघून जातो. त्या मूळ कामाचं नुकसान होतंच आणि आपण रागावल्यामुळं आपलं संतुलन बिघडून, आपली मानसिक ताकत खर्ची पडून तेही नुकसानच होतं. याऐवजी आपली पहिली सुखाची किंवा दुःखाची प्रतिक्रिया जाऊ देऊन, बाजूला ठेवून विचार केला तर?

श्री महाराज म्हणत, कोणतीही गोष्ट घडली तर लगेच तिचं दुःख किंवा सुख वाटू देऊ नये. थोडक्यात तिच्या परिणामाकडं लक्ष द्यावं. खरं सुखदुःख हे घटनेच्या परिणामामुळं ठरतं. लगेच होणारी प्रतिक्रिया थांबवली तर परिणामाचा विचार करून त्या घटनेबद्दलचं रास्त मत आपण ठरवू शकतो. त्याचबरोबर ती प्रतिक्रियाच बाजूला झाली तर वस्तुस्थितीचे इतर घटकही आपल्याला दिसू लागतात.

वरच्याच उदाहरणात पहिली प्रतिक्रिया जाऊ दिली तर आपल्याला हे कळू शकतं की, त्याला यायला उशीर का झाला ? अनेकदा तर असंही कळतं की, तुम्ही दिलेली वेळ पाळण्यासाठी तो माणूस धडपडून आलेला असतो. लवकर उठून वेळेत घरून निघालेला असतो, पण कुठं अपघातानं किंवा आकस्मिक अडचणीमुळं त्याचं येणं लांबतं. इतकंच काय काही वेळा येणं पूर्णपणे अशक्य दिसत असतानासुद्धा केवळ तुमचं काम व्हावं म्हणून, इतर नुकसान सोसून, तडजोडी करून उशीरा का होईना पोचावं म्हणून तो

आलेला असतो. पण तुमची ही तणतण पाहिल्यावर त्यालाही वाटतं आपण हे कष्ट उगाचच घेतले ! म्हणून तो आल्या पावली निघून जातो. दोघांनाही आपापल्या परीनं खूप कष्ट पडून, दोघांचाही वेळ जाऊनसुद्धा वर सांगितलेल्या एका चुकीमुळं काम तसंच राहतं.

हे असं एकदाच कधी घडतं असं नाही. ऑफिस, व्यवसाय, घर कुठंही काही ना काही घडतच असतं आणि आपण त्याचं लगेच सुख, दुःख, राग, हर्ष, निराशा, चीड सारं काही मानीत असतो. त्यानुसार आपल्या पहिल्या प्रतिक्रियाही देत असतो. पण त्यामुळं आधी असल्या घटनांनी निर्माण झालेल्या गोंधळात आणखीनच भर घालीत असतो, याची कल्पना आपल्याला अनेकदा येत नाही.

त्यात पुन्हा मग या प्रतिक्रियांनंतर आपण इतरांना दूषण देतो किंवा पश्चात्ताप करीत बसतो. म्हणून सामान्य माणसानं विचारपूर्वक ही प्रतिक्रिया बदलावी तर भक्तानं 'ही भगवंताची किंवा गुरूची इच्छा आहे' अशी पहिली प्रतिक्रिया द्यावी. त्यानं आपल्या दैनंदिन जीवनातले खूप ताणतणाव कमी होतील, संघर्ष नि कटुता टळेल, स्वाभाविकच आनंद वाढेल.

या संदर्भात श्री महाराजांनी एका व्यापाऱ्याची हकीकत सांगितली आहे. व्यापारात खोट आल्यानं आपल्या सावकारमामाकडून त्यानं कर्ज घेतलं. पण त्यानंतर पुन्हा मोठं नुकसान होऊन दिवाळं निघालं.त्यानंतर तो व्यापारी व त्याची पत्नी उभयता घर सोडून अनोळखी ठिकाणी एका मंदिरात भिक्षा मागून राहू लागले. त्या ठिकाणी अत्यंत कमी गरजांत, कमी पैशात समाधानात चाललं होतं. पण याचा सुगावा लागल्यावर मामानं निरोप पाठवून त्यांना बोलावलं आणि त्याला कुणी वारस नसल्यानं आपली सारी संपत्ती देऊ केली. दोघांची पहिली प्रतिक्रिया हर्षवायूचीच होती.

पण बिनकष्टाच्या त्या अमाप संपत्तीनं या व्यापाऱ्याला भुलवलं. नाना व्यसनं, आजार यांनी तो जर्जर झाला. त्याची पत्नी अश्रू ढाळीत बसे. असा पैसा मिळतो आहे म्हटल्यावर आनंदाची, सुखाची त्या वेळची आपली

प्रतिक्रिया आठवून तिला दु:ख होई. म्हणून घटनेचे परिणाम पाहिल्याशिवाय प्रतिक्रिया देऊ नये, ती निरर्थक ठरते.

श्री विनोबा म्हणत, बाह्य घटनेचा-मान, अपमान इ.चा पहिला आघात जाऊ द्यावा. पहिल्या क्षणी हसू नका नि रडूही नका. पहिल्या क्षणी तो भगवंताचा स्पर्श वाटू दे. दुसऱ्या क्षणी मग वाटलं तर हसा किंवा रडा. याला तात्त्विक पार्श्वभूमीही आहे. पहिली प्रतिक्रिया देण्यानं आपला मी नि मन बलवान होतं. पण तेच मन, ती प्रतिक्रिया गिळण्यानं मोडून निघतं.

त्याचबरोबर पहिली प्रतिक्रिया ही बहुधा देहबुद्धीची व भावनिक असते. ती टाळण्यानं चुकीच्या प्रतिक्रियात्मक कृतीही टळतात. मग विचारानं क्रिया घडून ती योग्य ठरते. म्हणून आपल्या जीवनातला आनंद वाढायचा असेल तर या 'पहिल्या प्रतिक्रिये'वर विचार करण्याची गरज व उपयोग आहे !

*

२४. शहाणा मनुष्य

शहाणा मनुष्य म्हटलं की, आपल्या डोळ्यांसमोर काही ठरावीक कल्पना उभ्या राहतात. त्यांतल्या त्यात एखाद्याला 'शहाणा' मनुष्य म्हटलं की, तो माणूस विद्वान, विचारी, वेळी दुसऱ्याला शहाणं करणारा, थोडा पोक्त असा असेल, असं वाटतं. तो साधारणत: व्यवहार करताना फसत नाही, फायद्यात राहातो. त्याच्याजवळ खूप कला, खूप विद्या असतात, त्यांचा तो व्यवहारात यशस्वीपणानं उपयोगही करतो. सारांशानं ज्ञान आणि त्याची व्यवहाराशी सांगड पडलेली दिसली की, त्याला 'शहाणा मनुष्य' म्हणून आपण मोकळे होतो.

इंग्रजीतसुद्धा ज्ञानी आणि शहाणा असा फरक केलेला आहे. टेनिसननं एके ठिकाणी 'एक वेळ ज्ञान येतं, पण शहाणपण यायला वेळ लागतो' असं सांगून त्यांतला भेद दाखवून दिला आहे. हे सारं ठीकच आहे. पण श्री महाराजांनी एके ठिकाणी 'शहाण्या माणसा'बद्दल सांगताना एका बोधवचनात लिहिलं की,'मला स्वत:ला सुधारलं पाहिजे असं ज्याला वाटतं तो खरा शहाणा मनुष्य !' ही व्याख्या तशी सकृतदर्शनी थोडी वेगळी वाटली तरी ती विचार करण्याजोगी आहे हे मात्र खचितच !

थोडी वेगळी अशासाठी वाटते की, इथं नुसतं ज्ञान होण्याचा किंवा कळण्याचा प्रश्न नाही. कळलेली गोष्ट अंमलात आणण्याचा आहे. त्यातही श्री महाराजांना अभिप्रेत अंमलात आणणं पुन्हा आणखी थोडं वेगळं आहे. उदाहरणार्थ, एखादा स्वभावदोष घ्या- समजा रागाचं, क्रोधाचं ज्ञान झालं. तो दोष आहे हे कळलं, त्यानं होणारं नुकसान कळलं, तो कसा येतो, का येतो, कधी जाईल, कसा जाईल सारी क्रोधाची यंत्रणा कळली. यावरून तो मनुष्य त्याबद्दल 'ज्ञानी' झाला. पण 'शहाणपणा'त मात्र क्रोधाचा दोष

कळल्यावर त्या माणसानं तो दोष दूर करायला जाणं अभिप्रेत आहे. पण यात सर्व रागावणाऱ्या माणसांना हे सारं पटवून देणं नि त्यांचा क्रोध कमी करणं म्हणजेसुद्धा हे ज्ञान अंमलात आणणं ठरेल. पण श्री महाराजांना अभिप्रेत असलेल्या 'शहाण्या माणसानं' स्वत:चा क्रोध आवरणं, तो कसा नाहीसा होईल यासाठी प्रयत्न करणं - हे खरं अंमलात आणणं आहे. त्यामुळं ते आपल्याला प्रथमदर्शनी वेगळं वाटलं, तर नवल नाही.

आपण साधारणपणे जी शहाणी म्हणून प्रसिद्ध असलेली माणसं पाहातो, ती जास्त करून जग सुधारायला निघालेलीच असतात. अर्थात ज्यांनी स्वत:ला पूर्णपणे सुधारलेलं आहे त्यांचा अपवाद क्षणभर बाजूला ठेवू. पण स्वत:ला सुधारण्या आधी जगाला सुधारण्याची गडबड असलेले लोक कमी नाहीत. श्री महाराजांच्या दृष्टीनं या मंडळींना खालचं स्थान आहे. एकदा तर ते म्हणाले, 'जगाला सुधारायला जाणारा हलक्या दर्जाचा समजावा.' अर्थात हलक्या दर्जाचा अशा अर्थानं की,स्वत:ला सुधारायला निघालेला माणूस ते अधिक श्रेष्ठ मानीत. त्याला कारणंही बरीच आहेत. एक तर स्वत:चे दोष दूर करण्याआधी जगाचे दूर करायला जाणं म्हणजे जे आपल्याकडं नाही ते दुसऱ्याला देऊ जाणं, ते कसं देता येईल हा पहिला प्रश्न. दुसरं असं की, स्वत:कडं आधीच दोष असताना या जग सुधारण्याच्या कार्यापायी आणखी एक 'इतरांना सुधारल्याचा', 'मार्गदर्शन केल्याचा' नवा अभिमान आपण आपल्यामागं लावून घेऊ, नाही का ?

श्री महाराजांच्या वचनात आणखीही खुबीची गोष्ट आहे. आपण जग सुधारायला जाऊ तर उघडच आहे की, आपल्याला जग बिघडलेलं दिसतं आहे, त्यात आपल्याला दोष दिसताहेत, त्रुटी-उणीवा दिसताहेत. श्री कृष्णमूर्ती म्हणत त्याप्रमाणं त्याची मुळं खरं तर आपल्या स्वत:तच आहेत. श्री महाराज एके ठिकाणी म्हणाले, 'जगात दोष दिसतात, इतरांच्यात दोष दिसतात कारण ते आपल्यात आहेत.'

याचाच अर्थ खोल पाहिलं तर असा झाला की, आपल्याला जगाला,

इतरांना सुधारावंसं वाटतं याचा अर्थ आपल्यात अजून सुधारणेची गरज आहे. फक्त कदाचित असं असेल की, दुसऱ्याचा असल्यानं तो दोष दिसत असेल अन् सुधारावासा वाटत असेल आणि स्वत:चा असल्यानं दिसत नसेल, दोषच वाटत नसेल अन् साहजिकच तो सुधारायचा प्रश्न उरत नसेल. यातलं तथ्य जाणून घ्यायची गरज आहे.

श्री महाराजांकडं एकदा एक वृद्ध पेन्शनर गृहस्थ आले आणि आपला कर्ता मुलगा आपलं काही ऐकत नसल्याची तक्रार करू लागले. त्यावर श्री महाराज त्यांना म्हणाले की, 'त्याला एकदा मला भेटायला सांगा.' त्यावर ते गृहस्थ म्हणाले, 'छे हो, तो फार तापट नि नास्तिक आहे. तो कुठला कुणाचं ऐकतो आहे, तो आपल्याला भेटणार नाही.' तरीही श्री महाराज त्यांना म्हणाले की, 'माझा निरोप म्हणून त्याला मला भेटायला सांगा.' तरीही त्या गृहस्थांनी मघाचाच शेरा मारला. असं दोनतीनदा झाल्यावर श्री महाराज हसले. मोठ्या खुबीनं त्यांना म्हणाले, 'आता त्यानं माझा निरोप ऐकायचं राहू द्या, तुम्ही तरी माझं ऐका आणि त्याला तेवढं सांगा !'

आता यात दुसऱ्याचं न ऐकण्याचा, तापटपणाचा, नास्तिकतेचा दोष त्या मुलाचा की त्याच्या ठिकाणी हे सारे दोष पाहाणाऱ्या या गृहस्थांचा, हे सहज स्पष्ट आहे. जी गोष्ट त्यांना स्वत:लाच जमत नव्हती, येत नव्हती तो दोष तर त्यांनी जाणून घेतला नाहीच, उलट ते मुलातला तो दोष दूर करायला निघाले. तो सुधारायला जरी ते गेले असतील तरी त्यांना त्यात यश येणार नाही, हे उघडच आहे. पुढं असं झालं की, त्यांनी श्री महाराजांचं ऐकलं. त्या मुलाला निरोप सांगितला अन् विशेष म्हणजे तो त्यांना भेटायला आला. इतकंच नाही तर त्यांच्या म्हणण्याप्रमाणं वागायचंसुद्धा त्यानं कबूल केलं !

म्हणून 'खऱ्या शहाणपणा'त श्री महाराजांनी जगाला सुधारण्याआधी स्वत:ला सुधारणाऱ्याचा समावेश का केला, ते विचार करण्यासारखं आहे.

*

२५. भजनाचं रहस्य

भजन हा शब्द फार पूर्वीपासून प्रचलित आहे. त्यामुळं त्यात काही सांगण्यासारखं आहे असं कुणाला वाटणार नाही. त्या अर्थानं भजन म्हणजे काय, हे शिकण्यासारखं आहे असंही कुणाला वाटणार नाही. भजन म्हणजे काय ते आपल्याला माहीत आहे, अशीच बऱ्याच जणांची समजूत असल्याचंही आपल्याला आढळून येतं. गावोगावी भजनीमंडळं असतात, अनेक लोक भजन शिकवतात, अनेक लोक ते शिकतात, म्हणतात, असंख्य लोक ते ऐकतात. हे आपण पदोपदी पाहात असल्यामुळं तसा 'भजन' शब्द विचार करण्यासारखा आहे असं कुणी प्रथमदर्शनी मान्य करणार नाही. खरं भजन आणि खऱ्या भजनापासून मिळणारा लाभ दुर्मीळ झाला आहे तो यामुळंच. अर्थात 'भजनाचं रहस्य' जाणून घेण्याची गरजही यामुळंच निर्माण झाली आहे.

आपली भजनाची आत्ताची कल्पना ढोबळ मानानं एखादा अभंग, पद, त्याची चाल, गाणं जाणणारा गोड गळ्याचा गायक, पेटीतबला साथ - अशी आहे. एवढ्या गोष्टी जमल्या की, भजन होऊ शकतं. अनेक ठिकाणी तर तो एक व्यावसायिक प्रकार आहे, भजन शिकायचीसुद्धा फी आहे, तर काही ठिकाणी रिकामा वेळ कसा घालवावा यावरचं ते उत्तर बनलं आहे. अनेक ठिकाणी अनेक धार्मिक कार्यक्रमातला भजन हा एक कार्यक्रम आहे. अनेक उत्साही लोकांचा तो मोठा विरंगुळा आहे, वेळी अभिमानाचा विषय आहे.

आपण भजनाविषयी जेव्हा चर्चा ऐकली असेल किंवा ते करणाऱ्यांतली चर्चा ऐकली असेल तेव्हा असे उद्‌गार आपण अनेकदा ऐकले असतील, 'आपण अमक्याचं भजन ठेवू या, आज भजनाला आवाज

छान लागला होता, आज भजनाला तबला एकदम रंगला होता, अमक्यांनी भजनात किती तानबाजी केली, आज नवीनच भजन ऐकलं, यांच्यापेक्षा त्या अमक्यांचं भजन चांगलं आहे !

काहीवेळा तर आपण याच भजनाच्या बाबतीत अशाही चर्चा ऐकल्या असतील की, 'मी आता भजनाचा क्लास लावला आहे, आमचे या महिन्यात लागोपाठ दहा तरी भजनाचे प्रोग्रॅम आहेत, या अभंगाचा राग कुठला, त्या बाई अगदी मूळ अभंगासारखा डिट्टो अभंग म्हणतात, आम्ही भजनाला डिशशिवाय काहीच ठेवीत नाही, त्यांचं भजन-आमचं भजन, भजनांच्या स्पर्धा - त्यात आपापली मंडळं उतरवणं, त्यांचे नंबर येणं - न येणं' - अशी असंख्य वाक्यं आपण ऐकली असतील. ही वाक्यं वापरणारे वस्तुस्थितीच सांगतात किंवा भजनाबद्दलची अनेकांची कल्पना तीच असते. म्हणूनच भजनाचं रहस्य थोडं समजून घेणं उपयोगी ठरेल.

या भजनाचं मूळ अभंगात आहे. तो लिहिणारे महापुरुष हे कुणीतरी जगद्गुरु तुकोबांसारखे आत्मानुभवी महापुरुष असतात. भगवंताच्या भेटीच्या जिज्ञासेपासून, तळमळ, जनस्वभाव, जनरीत, साधनेतलं यशापयश, करुणा, आर्तता, निर्धार, प्रत्यक्ष भगवंताचा अनुभव, दर्शन, प्राप्तीचा काही उपाय - असे आत्मानुभवाच्या बैठकीवरचे ते काही उत्कट उद्गार असतात. त्यांची खोली, व्यापकता, भाव, त्यामागचा अनुभव एवढा जिवंत असतो की, तोच अभंगांना शब्दरूप करतो. स्वत:च्या सर्वस्वाचा विसर त्यांच्या त्या अभंगात आणि ते म्हणण्यात असतो.

म्हणूनच त्या अभंगाचा अर्थ जाणून घेणं, त्या मागचा भाव जाणणं, अनुभवण्याचा यत्न म्हणून जीव ओतून भगवंतासाठी ते म्हणणं - म्हणजे ते परमार्थाचं साधन असलेलं भजन होतं. ते लिहिणाऱ्यानंही एखादी कविता किंवा गाणं लिहावं तसं लिहिलेलं नसतं आणि म्हणतानाही ते गाणं म्हणून म्हटलेलं नसतं.

असं सगळं जाणून भजन करायचं ठरवलं तर अर्थातच ते

म्हणणाऱ्याला स्वत:चा विसर पाडू शकतं. त्याचं नेहमीचं विषयी, क्षुद्र, आसक्त, स्वार्थी मन नाहीसं करणारं ठरतं आणि त्यामुळं त्याच्या मनाला खरी 'विश्रांती' होते. म्हणून श्री महाराज म्हणत की,'मनाला विश्रांती मिळणं हे भजनाचं रहस्य आहे. आपण ते इतक्या प्रेमानं करावं की, भगवंत डोलला पाहिजे. कळवळून भजन केलं पाहिजे. श्रद्धेनं भजन करणं हे फार महत्त्वाचं आहे.'

श्री महाराजांनी स्वत:, असं स्वत:चा विसर घडवणारं भजन प्रत्यक्ष केलेलं आहे, ऐकणाऱ्यांचं देहभान - मन नाहीसं करणारं भजन केलेलं आहे आणि त्यांच्या भजनानं प्रत्यक्ष राम डोलला आहे, श्री मारुतिरायांनी मृदंग वाजवला आहे, हे आपण जाणतोच. त्यामुळं हे जे खरं भजन अपेक्षित आहे ते भगवंतासाठी आहे, ते स्वत:लाही मुक्त करणारं आहे आणि कुणी ऐकणारा श्रोता असलाच तर त्यालाही भगवंताच्या प्रेमाचा साक्षात अनुभव आणून देणारं भजन आहे.

तो कुठला 'कार्यक्रम' नाही. त्यामुळंच त्या अर्थानं त्याला गोड गळ्याची, रागदारीच्या ज्ञानाची, त्या अर्थानं क्लासची, बिदागीची, स्पर्धेची - अशा अलीकडं सहजपणे जोडल्या जाणाऱ्या कुठल्याच गोष्टीची गरज नाही, हे स्पष्ट होईल. श्री महाराज म्हणतात,'प्रत्यक्ष परमात्मा समोर आहे आणि आपलं म्हणणं ऐकतो आहे, अशा खऱ्या भावनेनं भजन म्हणावं. अशा भजनानं उपासनेला जोर चढतो. खऱ्या भजनाला तालसूर लागत नाहीत, त्याला प्रेमळपणा लागतो, तसं नसतं तर तुकारामबुवा आधी गाणं शिकले असते.'

श्री महाराजांनी स्पष्ट केलेलं खऱ्या भजनाचं रहस्य लक्षात घेतलं तर मग आत्ताच्या प्रचलित भजनापासून ते बरंच वेगळं आहे, हे लक्षात येईल. म्हणूनच अर्थात ते भजन आपल्या भगवंताकडच्या वाटचालीतलं एक महत्त्वाचं साधन, एक मोठी मदत ठरतं. एरवी ते भक्तिसंगीत होईल, भजनाचा कार्यक्रम होईल. संगीताचा एक प्रकार म्हणून म्हटल्या जाणाऱ्या

भजनापेक्षा हे 'भक्तीचं साधन असलेलं भजन' वेगळं आहे, हे लक्षात घेण्यासारखं आहे. त्या गाण्यातल्या भजनासाठी इतर गोष्टी आवश्यक असतील, योग्यही असतील. पण त्या भजनाचं उद्दिष्ट वेगळं आहे, प्राप्तीही वेगळी आहे. त्याबद्दल आपल्याला आदरही आहे.

भक्तीचं साधन असलेल्या खऱ्या भजनानं भगवंताकडच्या वाटचालीतलं एक पाऊल पुढे पडेल. कुठल्याही लौकिक गोष्टीची, श्रोते असण्याची किंवा त्यांची दाद मिळण्याची, स्पर्धेतल्या वरच्या नंबरची, प्रतिष्ठेची, पैशाची - कशाचीच, कुठलीच अपेक्षा त्यात असणार नाही. पण हे भजन माणसाच्या अंतरंगाचा विधायक पालट घडवून आणील, जो नित्य भजनानं दृढमूल होईल - हे रहस्य समजून केलेलं 'खरं भजन' भक्तीचं साधन होईल.

*

२६. गुरू

माणूस प्रापंचिक असो किंवा परमार्थी, त्याचं कुणाकडून तरी काही शिकल्याशिवाय चालत नाही. कितीही अश्रद्ध, स्वाभिमानी, दुराभिमानी, विज्ञानवादी - कसाही झाला तरी माणसाला जितका आईशिवाय पर्याय नाही तितकाच गुरूशिवाय पर्याय नाही, हे सहज कळण्यासारखं असतं. काही लोक ते सहज, प्रामाणिकपणे मान्य करतात, कुणी करीत नाहीत किंवा सोयीस्करपणे दुर्लक्ष करतात. साधं जगण्यासाठी काय खावं, कसं खावं, काय खाऊ नये - इतक्या साध्या गोष्टींतसुद्धा जिथं मुलाला आई हा गुरू लागतो, तिथं पुढच्या आयुष्यातल्या असंख्य गोष्टींचं काय सांगावं ! प्रत्येक बाबतीत, निदान लौकिक गोष्टींत तरी, माणूस त्या त्या विषयांचं ज्ञान देणाऱ्या जाणकार माणसांवर अवलंबून असतो आणि त्यात काही चूकही नाही. अगदी 'गुरू' हा शब्द मनुष्य वापरीत नसला तरी, त्या स्वरूपाचं काम होण्याची मात्र त्याला आयुष्यभर गरज लागते.

हे सारं विद्या, नोकरीच्या किंवा व्यवहारातल्या कामांबद्दल, कौशल्यांबद्दल असतं तिथपर्यंत एकमत असायला काहीच हरकत नाही. तसं न झालं तर सर्वांकडून विद्या घेऊनही हे मान्य न करणं हा अकृतज्ञपणाच म्हणावा लागेल. पुढं खरा प्रश्न येतो तो परमार्थाच्या, देवप्राप्तीच्या, आनंदप्राप्तीच्या क्षेत्रातल्या 'गुरूं'चा. प्रपंचात साधी सायकल चालवायला शिकतानासुद्धा गुरू लागणारा माणूस मात्र परमार्थात गुरूची गरज नाही, मी तो स्वत:च्या बळावर मिळवीन म्हणतो. उलट गुरू मानणाऱ्यांना, गुरुआज्ञापालन करणाऱ्यांना नावं ठेवतो, हे थोडं विचार करण्यासारखं आहे.

आत्ताच्याच उदाहरणानं थोडं पुढं पाहिलं तर आपण अनेकांना सायकल चालवताना पहातो. ती वस्तू आपण हाताळू शकतो, घेऊ शकतो,

चालवतानाच्या क्रिया इतक्या वेळा पहातो, पण जमिनीचा पाय सुटल्यावर तोल सांभाळताना एक क्षण का होईना आधाराची गरज लागते. युक्तीचे दोन शब्द कानांवर पडण्याची गरज लागते. ही साधंसं कौशल्य शिकतानाची स्थिती आहे तर परमार्थ तर मुळात मनाचा आहे, अंतरंगाचा आहे, सूक्ष्माचा आहे, तिथं मला सारं एकदम स्पष्ट होईल, कळेल, दिसू लागेल आणि विशेषत: कुणाच्याही आधाराशिवाय जमू शकेल, असं म्हणणं किती धारिष्ट्याचं आहे याची कल्पनाच केलेली बरी ! आपल्याला एखाद्या विषयाची काहीच कल्पना नसली म्हणजे त्यात काहीच अवघड नाही असं वाटतं, त्यातलाच हा प्रकार आहे.

काही वेळा आपण व्हायोलिनसारखं एखादं अगदी सुटसुटीत वाद्य लीलया वाजवणारे लोक पाहिले की, ऐकणाऱ्यालासुद्धा सहज वाटतं की काय चार तारा, एक बो, तारांवर बो घासला आणि बोटं दाबली की सहज गाणं बाहेर पडतं, किती सहज शक्य आहे हे ! पण ज्यावेळी प्रत्यक्ष त्या दोन गोष्टी हातात पडतात आणि बोटं ठेवायची वेळ येते तेव्हा गाणंबिणं राहूद्याच, पण एका वेळी बो आडवा आणि बोटं तारेवर उभी पडणं एवढंसुद्धा किती अवघड असतं याची कल्पना येते, तसं खरं या अंतरंगविद्येचं आहे. सूक्ष्माशी संबंध येऊन जेव्हा हे काय आहे ते कळतं तेव्हा थोडी कल्पना येते की, या विद्येची व्याप्ती केवढी, अखंड आनंदाचा लाभ केवढा, त्यासाठी मार्गदर्शनाची गरज किती आहे, त्यात गुरूंचं कार्य केवढं थोर आहे. म्हणून श्री महाराज ही गुरूंची गरज समजावताना म्हणत,'आपल्याला तिसऱ्या वस्तूची गरज आहे.'

म्हणजे असं की, माणसाच्या ठिकाणी मुळातच अपूर्णता आणि अज्ञान आहे. हे थोडंफार ज्ञान होत जातं ते या अज्ञानाच्या भूमिकेवरून होतं. ते लौकिकगोष्टींच्या ज्ञानाला पुरतं. पण 'स्वत: आपण' हाच ज्या ज्ञानाचा विषय असतो त्याला हे अज्ञान आणि असलं त्याच भूमिकेवरून मिळालेलं ज्ञान उपयोगी पडत नाही. तीच गोष्ट भगवंताच्या ज्ञानाची आहे. आरशाच्या काचेच्या तुकड्यात जसं पूर्ण वस्तूचं प्रतिबिंब पकडणं शक्य होत नाही,

तसंच काहीसं हे आहे. म्हणून असल्या अपूर्ण अज्ञान-ज्ञानयुक्त अंतरंगाच्या, मनाच्या पलीकडची तिसरी वस्तू ते ज्ञान करून घ्यायला लागते. ती म्हणजे गुरू होय.

भगवान रामकृष्ण म्हणत, बुद्धिबळाचा खेळ चालू असतो. दोघेही त्यात पूर्ण बुडालेले असतात. अशा वेळी त्या प्रत्यक्ष खेळणाऱ्यांपेक्षा तटस्थपणे तो खेळ पाहणारा अधिक चांगल्या चाली सुचवू शकतो. तसं या गुरूंचं आणि संतांच्या गरजेचं आहे. ते स्वत: हा प्रपंचाचा खेळ उत्तम जाणतात, त्यात स्वत: ते कुठंही अडकलेले नसतात, आसक्त नसतात म्हणून ते तो उत्तम कसा करावा आणि त्यात न अडकता ज्ञान-अज्ञानापलीकडं ते जे भगवंताचं, निरुपाधिक आनंदाचं स्वरूप आहे ते कसं मिळवावं किंवा विशेषत: स्वत:च्याच अंतर्यामी ते कसं सापडेल - हे असे आत्मानुभवी गुरू उत्तम तऱ्हेनं सांगू शकतात.

यासाठी सर्व प्रपंचाचा उत्तम अभ्यास करून स्वत:च्या अनुभवाचा त्याच्याशी मेळ घालून, काही वेळा इतरांनी या बाबतीत सांगितलेल्या अनुभवसिद्ध मार्गाचा प्रत्यक्ष प्रयोग करून, वैराग्यानं ही वाट चालणारेही असू शकतात. फक्त त्यांच्यात त्यांच्याच मनाच्या, संस्कारांच्या, अहंकाराच्या, अडथळ्याच्या पलीकडं जाण्याची विलक्षण क्षमता लागते. त्यांना अशा देहधारी गुरूची कदाचित गरज नसतेही. असे लोक दुर्लभच म्हणायचे.

पण त्यांचाही विचार करताना श्री महाराज म्हणतात, 'तेसुद्धा स्वत:च स्वत:चे गुरू होतात.' कारण स्वत:ला कळलेलं ते आचरतात, जे इतर सर्वसामान्य माणसांना या असंख्य अडथळ्यांमुळं जमत नाही. म्हणून सामान्य माणसाकडं ही स्वत:च स्वत:चे गुरू होण्याची दुष्कर क्षमता नसेल तर त्यांनी आत्मज्ञानी गुरूकडं जावं. आत्मज्ञानी गुरू ओळखण्यात लौकिकदृष्ट्या फसगत होऊ नये यासाठी निदान अशा गुरूंच्या ग्रंथांचं गुरुत्व पत्करावं आणि आपली आत्मोद्धाराची वाटचाल सुरू करावी. हे त्यांच्या हिताचं होईल, हे काही वेगळं स्पष्ट करायला नको.

त्यातही पुन्हा या साऱ्याच बाबतीत बुद्धीची, मनाची तयारी होत नसली तर निदान अशा महान आत्मज्ञानी स्वानंदनिवासी सद्‌गुरुंनी उपदेशिलेलं एखादं नाम घेऊन, त्यावर विश्वास ठेवून 'नाम' हाच गुरू मानून चाललं तरी चालेल.

असं करण्यात लौकिक किंवा देहधारी गुरू पत्करण्यात आपली होऊ शकणारी फसवणूक टळते. त्याचबरोबर नामाचं स्वतःचं सामर्थ्य एवढं आहे की, ते आपल्याला थेट भगवंताशी जोडू शकतं. दुसऱ्या बाजूला ते आपल्या अंतरंगात तळाशी जाऊन आपल्यातले स्वभावदोष दूर करण्याचं जे गुरूचं कार्य तेही कार्य नाम करतं. त्या अर्थानं मनापासून आणि निष्ठेनं घेतलेलं नाम हाच आपला गुरू ठरू शकतं.

यातला गुरूचा कुठलाही मार्ग आपण स्वीकारला, तरी आपले स्वभाव, अहंकार या आपल्या मूळ अडचणी दूर होऊन आनंदाचा मार्ग मोकळा होईल. फक्त त्यासाठी श्री महाराज म्हणतात तशी तिसऱ्या वस्तूची - गुरूची - नेमकी, खरी गरज तरी आपण जाणली पाहिजे, हे खरं !

*

२७. मंदिर

आज 'मंदिर' हा शब्द जरी उच्चारला तरी डोळ्यांसमोर विविध प्रकारची-बांधणीची देवळं, शिखरं, सभामंडप, आतली प्रकाशव्यवस्था, प्रदक्षिणामार्ग, बाहेरची उद्यानं, उत्तमोत्तम नक्षीकामं, आकर्षक टाईल्स, शोभिवंत गाभारे, देवांची सिंहासनं, संगमरवरी मूर्ती - अशा अनेक गोष्टी अगदी नकळत उभ्या राहतील. ते स्वाभाविक आहे. वेगवेगळ्या मंदिरांची आपण केलेली तुलना, कुठलं कुठल्यापेक्षा 'भारी' आहे वगैरे तेही सर्व आठवेल. काहींना 'मंदिर' म्हटल्यावर तिथली प्रसादव्यवस्था, काही ठिकाणच्या निवासाच्या उत्तम सोयीसुद्धा आठवतील. हे ठीकच आहे. कारण आज मंदिरं पाहून आल्यावर बहुतांश ठिकाणी हाच ठसा घेऊन माणूस परत येतो.

त्यातही एक भर आहे ती मंदिरांच्या जीर्णोद्धाराची. त्यात थोडी काळाची गरज असतेही. कारण शेवटी जुन्या वाड्याची जी अवस्था शेपाऊणशे वर्षांनी होते, ती मंदिराच्या वास्तूची होणंही स्वाभाविकच आहे. म्हणून जीर्णोद्धार, पत्रकं, देणग्या, बांधकामं, गिलावे, पूर्ण नूतनीकरण, मूळ मंदिर आठवणंही अवघड जाईल एवढी आधुनिक, पूर्णतया नवीन रचना-बांधणी, सुखसोयी - अशाही अनेक गोष्टी 'मंदिर' म्हटलं की आठवतील.

हे सारं म्हणजे तर मंदिर आहेच. कारण या साऱ्या गोष्टींशिवाय त्याला आकार कसा येईल ? पण श्री महाराजांना अपेक्षित 'मंदिर' हेच किंवा एवढंच आहे का, असा विचार केला तर श्रींची वचनं मात्र त्यावर वेगळा, विधायक, प्रसंगी थोडा धक्कादायक प्रकाश टाकतील. श्री महाराजांनी मंदिरांचा खूप विचार केला आहे, अनेक ठिकाणी त्यांनी स्वतः मंदिरांची स्थापना केली आहे, हेही सर्वांना विदित आहेच. त्यामुळं तो त्यांच्या

जिव्हाळ्याचा विषय असणार, हे उघड आहे. त्यामुळं यावरची श्रींची उद्‌बोधक वचनं खऱ्या मंदिराच्या कल्पनेवर वेगवेगळ्या बाजूंनी प्रकाश कसा टाकतात ते पाहाणं उपयुक्त ठरेल.

वर ज्या साऱ्या मंदिरसुधारणा, आजकालच्या मंदिरांचं बाह्यांग, त्यासंबंधीच्या कल्पना, प्रयत्न हे सांगितलं त्या संदर्भात श्री महाराज म्हणतात,'सोन्याची मंदिरंसुद्धा बांधता येतील, पण उपासनेचं मंदिर बांधणारे थोडेच असतात. भगवंताचं प्रेम वाढवणं हेच मंदिराचं ध्येय आहे.'

श्रींच्या या म्हणण्याच्या पार्श्वभूमीवर आपल्या मंदिराबद्दलच्या, तिथल्या रंगरंगोट्या, रोषणाई, आधुनिकीकरणाबद्दलच्या कल्पनांना जरा धक्का बसेल. पण श्रींच्या म्हणण्यामागची मूळ मंदिराच्या उद्दिष्टाची कल्पना, ही आपल्या उद्धाराचं एक साधन म्हणून मंदिराचं स्थान स्पष्ट करणं, ही आहे. हे लक्षात घेणं आपल्याच हिताचं आहे.

श्री महाराजांच्या दृष्टीनं मंदिर हे मुळात उपासनेचं केंद्र आहे. लोक नुसतं मंदिर पाहून जायला-यायला लागले की, मूळ उद्दिष्टात कमतरता आली. मंदिरात जाऊन आल्यावर माणसात उपासना झाल्याचा फरक न पडता, त्याच्या लक्षात देवापेक्षा मंदिरच राहायला लागलं की काही तरी चुकल्याचं वाटावं. मंदिर साधं असेल तर देव लक्षात राहतो. मंदिर भव्यदिव्य असेल तर मंदिर लक्षात राहातं. लोक मंदिरात उपासनेला यायच्याऐवजी मंदिर पाहायला यायला लागले की, प्रथम जिज्ञासा म्हणून ते ठीक असलं तरी आता मंदिर 'प्रेक्षणीय स्थळ' झालं हे ओळखायला हरकत नाही.

तीच गोष्ट प्रेमाची आहे. मंदिर हे भगवंताचं प्रेम लागावं, वाढावं यांसाठी आहे. तिथं येणाऱ्या व्यक्तीला भगवंताचं महत्त्व वाटून, अनुसंधान वाढवावं अशी प्रेरणा मिळावी यात त्याचं मर्म आहे. हे सारं तिथल्या माणसांच्या प्रेममयतेवर अवलंबून आहे. मंदिरातली माणसंच जर एकमेकांशी प्रेमानं वागू शकत नसतील तर ती भगवंताचं प्रेम इतरांना काय लावू शकतील? म्हणून मंदिर जपताना, वाढवताना भगवंताचं, एकमेकांचं, आल्यागेल्याचं

प्रेम लागणं, वाढणं हे किती महत्त्वाचं आहे, हे काय सांगावं ? श्री महाराज म्हणतात, 'मंदिरात आपण प्रेम सांभाळावं, आपण हवेसे वाटतो तोपर्यंत संस्थेत राहावं. नकोसे वाटायला लागल्यावर राहण्यात अर्थ नाही.' याचा अर्थ मंदिर हे प्रेममयतेच्या बाबतीतसुद्धा सर्वांनाच आत्मपरीक्षणाचं केंद्रस्थानच आहे.

मंदिर चालवण्यात कालमानानुसार पैशाची गरज, वावर असतो. पण पैशाचा विनाशकारी गुण ओळखून श्री महाराजांनी, मंदिर भिक्षेवर चालावं, त्यात लोक कमी आले, त्यांनी पैसा कमी ठेवला तर त्याचा कधीच विचार करू नये, असं सुचवलं आहे, हे लक्षात घेण्यासारखं आहे.

श्री म्हणतात, 'पैशाचं नुकसान हे मंदिराचं नुकसान नाही. प्रेमाचं नुकसान हे मंदिराचं नुकसान आहे.' आता अर्थातच मंदिरात प्रेमाचं नुकसान होऊ नये, म्हणजे काय याच्यावर विचार करावा लागेल. मंदिर असणं किंवा ते चालणं हे सारं तिथं असलेल्या माणसांच्यावर अवलंबून असतं. ती माणसं एकमेकांशी किती आत्मीयतेनं, आदरानं वागतात, ते मंदिर चालवताना येणाऱ्या व्यावहारिक, तशाच एकमेकांच्या स्वभावांच्या अडचणी किती मोठ्या मनानं समजून घेतात आणि त्यातही हे सर्व करीत असताना ते मंदिर ज्या देवाचं आहे, त्याचं स्मरण आणि भान कसं टिकवून धरतात, यावर हे मंदिरातलं प्रेम अवलंबून आहे. अशा तऱ्हेनं मंदिरातलं प्रेम टिकणं, वाढणं हा मंदिर असण्याचा खरा लाभ आहे.

पण अनेकांचं या अर्थानं प्रेम वाढणं, कमी होणं या गोष्टींकडं अक्षरशः लक्ष नसतं. अनेकांना तर या प्रेमापेक्षासुद्धा मंदिराचं उत्पन्न कसं टिकेल याची मोठी काळजी वाटते, त्यासाठी ते अनेक योजनासुद्धा आखतात. पण असं करणं नुसतंच चुकीचं नसून ते मंदिर ज्याचं आहे त्याच्यावर, त्याच्या कर्तृत्वावर आपलीच निष्ठा नाही, हे व्यक्त करतं. हे अनेकांच्या लक्षातही येत नाही.

तीच गोष्ट मंदिराच्या उद्दिष्टांची आहे. ही उद्दिष्टं सांगताना श्रींनी

म्हटलं आहे की, आचारधर्माचं रक्षण करणं, परंपरेचं रक्षण करणं आणि मंदिर अध्यात्मविद्येचं केंद्र बनणं हे आवश्यक आहे. साधकाला साधन करायला मंदिर हे स्थान योग्य असलं पाहिजे. त्यात राहणारे लोक या कामांना लायक असले पाहिजेत. याविषयी लिहिताना मंदिरात सेवेकऱ्यांनासुद्धा साधारणत: रोज दहा ते पंधरा हजार जप सांगितला आहे. एवढी उपासना करून जर आपापसांत, आल्यागेल्यांत नि:स्वार्थ प्रेम सांभाळून सेवेकरी राहतील तर ते मंदिर श्रींना आवडेलच.

मंदिराच्या व्यवहारांबद्दल तर श्रींचं वचन लक्षणीय आहे. मंदिर सांभाळणारे झाले तरीसुद्धा ते अनेकदा मूलत: प्रापंचिकच असतात. त्यांना प्रपंचाच्या स्वार्थाच्या, आसक्तीच्या, मानलौकिकाच्या अपेक्षांच्या, उद्याची काळजी करण्याच्या, संचयाच्या, आपला-परका करण्याच्या, उपक्रमशीलतेच्या - अशा अनेक सवयी लागलेल्या असतात. प्रपंचाची ठेवण, मर्यादा, उद्देश, मार्ग वेगळे आणि मंदिराचे वेगळे, हे त्यांनी लक्षात घेण्यासारखं आहे. तो प्रपंचाचा स्वभाव मंदिराचं व्यवस्थापन करताना आणू नये, हे स्पष्ट करताना श्री महाराज म्हणतात, 'मंदिर प्रपंच म्हणून करता कामा नये.'

श्रींची ही मंदिरकल्पना थोडी धक्का देणारी, सावध करणारी असली तरी ती सर्वांच्या पारमार्थिक प्रगतीसाठी व मंदिराच्या खऱ्या उपयुक्ततेसाठी मोलाची आहे, यात शंका नाही !

*

२८. खरी हानी

प्रापंचिक माणसांना हानी नवीन नाही. त्याला काही ना काही कारणानं हानीला सतत सामोरं जावं लागत असतं. कितीही कर्तबगार, यशस्वी माणूस असला तरी कधी ना कधी एखादं नुकसान, एखादी हानी त्याला पत्करावी लागते. कधी ती पैशाची असते, माणसांच्या संबंधांची असते, घरादाराची असते. कुठलीही हानी न होता काही माणसं आयुष्यात फक्त फायदेच मिळवीत चालल्याचंही काही वेळा दिसतं. काही माणसं तसं मोठ्या अभिमानानं सांगतही असतात. त्यांतला एखादा अपवाद सोडला तर अशा तथाकथित माणसांची झालेली हानी त्यांच्या कधी उशीरा लक्षात येते, कधी अशी माणसं आपली झालेली हानी, स्वत:चा मोठेपणा टिकवण्यासाठी, बाहेर दिसू देत नाहीत, एवढंच. जर हानी कुठल्या ना कुठल्या प्रकारे अपरिहार्यच असेल, तिला आपल्याला सामोरं जावं लागत असेल तर तिचा योग्य तो विचार वेळीच करणं हे कुणाही समंजस माणसाला किती गरजेचं आहे, हे लक्षात येईल. याचं आणखीही एक कारण आहे, ते म्हणजे प्रत्येक हानीत माणसाच्या मनाला अस्वस्थ करण्याचं सामर्थ्य आहे. संभाव्य हानीनंही मनुष्य अस्वस्थ होतो तर प्रत्यक्ष हानीनं किती होत असेल याची कल्पनाच केलेली बरी.

एखाद्याचे कुठल्या बँकेत पैसे असले आणि ती बुडाल्याची नुसती अफवा उठली तरी माणसांना साधी काळजीच नव्हे तर हृदयाला धक्का बसण्यापर्यंत गंभीर आजार झाल्याचं आपल्याला आढळतं. अनेकदा अशा बँका बंद पडतात, कायद्यानं व्यवहार थांबतात. मोठ्या पातळीवर काही उपाययोजना सुरू असतात, पण या हानीचा विचार इतका अस्वस्थ करीत असतो की, काही उपाययोजना होईपर्यंतसुद्धा धीर निघत नाही. माणसं

दिवसच्या दिवस, रात्रीच्या रात्री अस्वस्थ होऊन घालवतात. प्रत्यक्ष हानीसुद्धा अनेकदा टळते. त्या बँकांचं पुनरुज्जीवन होतं, विलिनीकरण होतं, यांचे पैसे सुरक्षित असतात - असं सारं झालं तरी, ते घडेपर्यंत स्वत:ला त्रास करून घेणारे, चर्चा करून, इतरांना त्याचा ताण देणारेही काही कमी नसतात. म्हणून हानी तसा सोडून देण्यासारखा विषय नाही, हे खरं.

हानी अनेक प्रकारच्या असतात. काही अपघात झाला, त्यातून हात तुटायची वेळ आली तर मनुष्य जीव वाचला याचा आनंद मानू शकतो. कधी हात वाचला आणि एखादं बोट निकामी झालं तर हाताचं बोटावर निभावलं म्हणतो. तीच गोष्ट एखादा संबंध तुटण्याची असते, एखादं नातं संपण्याची असते, पैसापाकीट जाण्याची असते. यावरून एक लक्षात येईल की, हानी खूप प्रकारच्या असतात. त्यांत कमीअधिक हानीही असतात. कुठलीच हानी माणसाला नको असली तरी, कुठली हानी कमी महत्त्वाची आणि कुठली जास्त महत्त्वाची याबद्दल प्रत्येकाची मतं असतात, कल्पना असतात. त्या त्या प्रमाणं तो त्यामुळं अस्वस्थ होतो, त्या टाळण्याचे प्रयत्न करतो, असंही लक्षात येईल. सर्वसामान्य माणसाच्या दृष्टीनं आजच्या काळात खरी हानी, सर्वांत मोठी हानी त्याला 'पैशा'ची हानी वाटते. काहीही झालं तरी तो ती होऊ नये म्हणून धडपडतो, कुणामुळं घडली तर त्याच्यावर राग धरतो, पैशाची हानी झाली तरी ती मनातून जात नाही. त्यानं तो सर्वांत जास्त अस्वस्थही होतो. कदाचित कुणाचं हेच प्रतिष्ठेच्या, अब्रूच्या, मानाच्या, पदाच्या हानीच्या बाबतीत असू शकेल.

श्री महाराजांचं याबाबतचं म्हणणं लक्षात घेण्यासारखं आहे.'जी हानी मोबदल्यानं भरून येत नाही ती हानी सर्वांत जास्त.'आपण हानीचा जो विचार करतो त्यासाठी हे वचन मार्गदर्शक आहे. समजा एखाद्याची हानी झाली. तिचं व्यावहारिक मोल त्याला इतकं मोठं वाटतं की, दुसरा विचारसुद्धा त्या क्षणी सुचत नाही, अस्वस्थता येते.पण त्या वेळी जर हे लक्षात आलं की,अरे, ही हानी भरून निघू शकते तर, दुसऱ्या कुठल्या तरी मार्गानं फायदा

होऊन किंवा जास्त कष्ट करूनसुद्धा ती भरून काढता येऊ शकते. मुळात कुठली तरी हानी पत्करावी लागतच असेल तर जी भरून काढता येते ती हानी अर्थातच कमी महत्त्वाची असली पाहिजे. जो विचार करून आपण जिवाचं हातावर, हाताचं बोटावर आलं हे जाणून त्यातून मोकळे झालो, पुढं काय करायचं ते करायला लागलो तेच, अशा इतर कुठल्याही हानीच्या बाबतीत करून आपण मोकळे होऊ शकतो. त्यानं आपलाच त्रास, काळजी, अस्वस्थता कमी होते.

या बाबतीत एका साधूची गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. त्याचा एक धनिक शिष्य होता. एके दिवशी साधूपाशी मोठ्या अस्वस्थतेनं, निराशेनं येऊन बसला. त्याच्या कुठल्या व्यवहारात काही गणितं चुकली त्यामुळं आर्थिक नुकसान झालं होतं. त्यानं अस्वस्थ होऊन गुरूजवळ साऱ्या तक्रारी सांगण्यात, अस्वस्थता मोकळी करण्यात गुरूचा दिवस घालवला. आपण काही तरी करू या असं सांगून गुरूंनी त्याला परत पाठवलं.

दुसरे दिवशी सकाळी त्याच्या घरी गुरू हजर झाले. त्यांनी बरोबर एक नोटांचं पुडकं आणलं होतं. त्यांनी ते त्या शिष्याच्या स्वाधीन केलं. हे तुझं नुकसान झालेले पैसे. शिष्य एका बाजूनं फार आनंदित झाला. गुरूंनी एवढा त्रास कसा आणि कशासाठी घेतला असंही त्याला वाटलं, पण आपली हानी भरून निघाल्याचा त्याचा आनंद त्याच्या चेहऱ्यावर लपत नव्हता. त्यानं मोठ्या कृतज्ञतेनं गुरूला प्रणाम करून 'मी आपल्यासाठी काय करू?'म्हणून विचारलं. गुरू शांतपणे म्हणाले,'तुझं नुकसान तर भरून आलं ना, आता माझं छोटंसं नुकसान तू भरून दे म्हणजे झालं.' शिष्य तत्परतेनं म्हणाला,'अवश्य.' गुरू म्हणाले,'कालचे ईश्वरचिंतनाचे माझे चार तास तुझ्या या हानीच्या, अस्वस्थतेच्या चर्चेत वाया गेले. तेवढे मला तुझ्या सवडीनं परत कर म्हणजे झालं.' गुरू निघून गेले. शिष्याला मात्र हानी भरून निघूनसुद्धा आत्मपरीक्षण करायला लागलं.

आजवर आपण ज्या ज्या हानींच्या विचारात, हानी टाळण्याच्या

प्रयत्नांत, हानी झाल्यावर अस्वस्थतेत वेळ घालवला असेल तो सारा या दृष्टीनं विचारात घेतला तर असं लक्षात येतं की, हानी तर होत गेल्याच, पण खरी हानी कोणती ते न कळल्यानं आजवर काळाची जी हानी यात झाली ती कुठल्याच मोबदल्यानं भरून न येण्यासारखी आहे. इतर हानींना काही ना काही पर्याय होते. पण मनुष्यजन्मातल्या गेलेल्या काळाला मात्र कुठलाही मोबदला दिला तरी तो परत मिळण्यासारखा नाही, भरून येण्यासारखा नाही. जर एकदा हा विचार मनात आला तर याच सर्वोत्तम, सर्वाधिक मूल्यवान काळाचा जास्तीत जास्त उत्तम उपयोग करणं हे खरं आपलं आयुष्यातलं महत्त्वाचं काम आहे, हे लक्षात येतं. त्यातही या मूल्यवान काळाचा जास्तीत जास्त उपयोगसुद्धा सर्वांत महत्त्वाच्याच कार्यांत कसा होईल, ते पाहाणं हेही ओघानंच आलं. घरदार, माणसं, संबंध, पैसा, नोकरी, मान, सत्ता अशा कुठल्याही प्रपंचातल्या ध्येयाला कुणीही कितीही महत्त्व देत असले, ते महत्त्व प्रत्येकाच्या दृष्टीनं वेगवेगळं असलं तरी, त्यानं अखंड आनंदाचा प्रश्न सुटत नाही. हा प्रापंचिकांचा लखलखीत, प्रांजळ अनुभव आहे. अशा वेळी या गोष्टी गरजेपुरत्या, कर्तव्य म्हणून पार पाडून वेळ या अत्यंत महत्त्वाच्या गोष्टीचा उपयोग अखंड आनंद देऊ शकणाऱ्या परमार्थसाधनेसाठी करणं, नाम घेण्यासाठी करणं हाच कुठल्याही मोबदल्यानं भरून येऊ न शकणारी काळाची हानी टाळण्याचा, उत्तम मार्ग होईल.

पण त्यासाठी सर्वांत मोठी हानी कुठली, हे श्री महाराजांचं म्हणणं तरी वेळेत समजून घ्यायला हवं ना !

*

२९. नाम : अर्थ आणि कार्य

विश्वकवी रवींद्रनाथ एका कवितेत म्हणतात, 'परमेश्वरा, कवितांच्या शब्दाशब्दांतून त्यांना आवडेल तो अर्थ लोक घेत असतात. पण खरं सांगू का, ते सारे शब्द नेहमी तुला उद्देशून असतात. ते तुझं वर्णन करतात. त्यांचा अखेरचा अर्थ तू आहेस.' तसं श्री महाराजांच्या वाङ्मयात अनेक गोष्टी आहेत, सूचना आहेत, बोध आहेत, चुटके आहेत, मार्मिक प्रसंग आहेत. त्या साऱ्यांतून, वाचणारे आपापल्या दृष्टीनं नि कुवतीनं वेगवेगळा अर्थ-बोध-सूचना घेतच असतात. पण रवींद्रनाथ जसा साऱ्या वाङ्मयाचा गर्भितार्थ-खरा अर्थ 'परमेश्वर' आहे असं सुचवतात, तसा श्री महाराजांच्या साऱ्या उपदेशाचा, शिकणुकीचा खरा अर्थ, गर्भितार्थ, अखेरचा अर्थ 'नाम' हा आहे असं दिसून येतं.

'नामा'च्या संदर्भात पूर्वीच्या संतांनी 'नामापरते तत्त्व नाही रे अन्यथा' किंवा 'तुका म्हणे मज आणिक उपाव, दिसती ते वाव नामेवीण' अशी ग्वाही दिलीच आहे. पण आपल्या साऱ्याच उपदेशात केवळ नामाचाच आग्रह श्री महाराजांनी धरलेला दिसून येईल. नामाची शास्त्रीयता, अर्थाचा उलगडा, नामाची आवश्यकता, औचित्य, इतर साधनांशी त्याची तुलना, नामाची मानसशास्त्रीयता - अशा एक ना दोन अनेक बाजूंनी श्री महाराजांनी वेळोवेळी ऊहापोह केलेला दिसून येईल.

नाम म्हणजे केवळ एखाद्या देवाचं नाव एवढाच त्याचा अर्थ आहे का? हे स्पष्ट करताना एका अत्यंत महत्त्वाच्या वचनात श्री महाराज म्हणाले की, 'मी नाही, तू आहेस' हा नामस्मरणाचा संपूर्ण अर्थ आहे. अर्थातच नाम घेणं म्हणजे आपण स्वत: स्वत:चं कर्तेपण, स्वत:चा अहंकार, जगाचं प्रेम-सारं काही नाहीसं करण्यासारखं आहे.

माणूस त्याच्याकडं असलेल्या साऱ्या वस्तू एक वेळ देईल, शेवटी पैसाही देईल, पण 'मी'पणा त्यापलीकडं असतो. तो द्यायला माणूस सहसा तयार व्हायचा नाही. पण नामाचा खरा अर्थ तो 'मीपणा'सुद्धा देणं, नाहीसा करणं हा आहे. इतकंच नव्हे तर फक्त 'तू आहेस' म्हणजे 'भगवंत आहे' एवढंच भान ठेवणं इथंपर्यंत हा अर्थ विस्तारला आहे.

यातली अहंकाराची, 'मी'पणाची पायरी ओलांडणं फारच कठीण आहे. कारण आपणसुद्धा व्यवहारात पाहातोच की, अहंकार हा परिस्थिती, वय, शिक्षण, व्यवसाय- कशावरच अवलंबून नसतो. तो श्रीमंतालाही असू शकतो नि गरीबालाही. विद्वानाला विद्येचा, श्रीमंताला पैशाचा, सत्ताधाऱ्याला सत्तेचा अहंकार असतो हे आपण समजू शकतो. पण उपासकाला उपासनेचा, साधकाला साधनेचा, भक्ताला भक्तीचासुद्धा अहंकार होऊ शकतो, इतका तो फसवा, सूक्ष्म आणि व्यापक आहे.

नाम हे मात्र त्या अहंकारावरचा घाव आहे. वर उल्लेखलेल्या साऱ्या पार्श्वभूमीवर हे काम अंतरातलं आहे, महत्त्वाचं आहे. पण ते खूप नाजुक नि कठीण आहे. असा अंतरंगाचा परमार्थ हा खरा परमार्थ. त्यावर श्री महाराज एके ठिकाणी म्हणाले, 'परमार्थ ही एक कठीण शिकारच आहे. शिकार अशी मारली पाहिजे की, आपल्या मीपणाला मारून आपण जिवंत राहिलो पाहिजे. आपल्याला नको तेवढंच गळून पडलं पाहिजे.' हा सारा परमार्थ त्या नामात आला. ते नाम माणसाला सतत जाणीव करून देतं की, तू नाहीस भगवंत आहे.

साहजिकच या साधनाचा व्यवहारातल्या चार गोष्टी मिळण्या न मिळण्याशी संबंध कमीच आहे. पण माणसाच्या अंतरंगाशी आणि ते बदलण्याशी मात्र जरूर आहे. माणसाचं समाधान टिकवण्याचं, माणसात खरा बदल घडवण्याचं सामर्थ्य त्यात खचितच आहे. मात्र हे साधन त्याचं महत्त्व ओळखून समजून, त्याचा अर्थ, त्याचं सामर्थ्य जाणून, तसंच सदाचरण आणि पवित्र अंत:करण ही पथ्य पाळून ते घेतलं जायला हवं. आजारी

माणसानं जसं औषध घेतलं पण पथ्य मुळीच पाळलं नाही तर औषध अचूक असूनसुद्धा उपयोग दिसून येत नाही तसं होतं किंवा पाणी जाण्याची तळातली तोटी सुरू ठेवून वरून कितीही पाणी ओतलं तरी हौद भरत नाही तसं होऊ शकतं.

नामसाधनेत साधकाची खरी प्रगती सुरू आहे की नाही हे ओळखण्याच्या श्री महाराजांनी एके ठिकाणी सांगितलेल्या चार खुणासुद्धा वेगळ्या आहेत. एखादं साधन करतो किंवा परमार्थ करतो म्हटल्यावर आपली सामान्यपणे अपेक्षा असते तसा, त्याचा प्रपंच व्यवस्थित होणं किंवा त्याचं कुठं न नडणं अशासारख्या कुठल्याच गोष्टींचा त्यांत उल्लेखही नाही.

ते म्हणत, माणसाची नीतिमत्ता सुधारणं, विकार क्षीण होणं, भगवंताचं अस्तित्व अधिकाधिक भासणं आणि त्याच्या कर्तेपणाची खात्री वाटू लागणं या त्या चार सोप्या खुणा होत. त्यांच्याकडं बारकाईनं पाहिलं तरी या खुणा मानसिक पातळीवरचा बदल दर्शविणाऱ्या आहेत, हे आपल्या लक्षात येईल.

या चारही खुणांचा विचार केला तर, यावर प्रकाश पडेल की, या तशा साध्या वाटणाऱ्या खुणा माणसाला अंतरंगातून बदलून टाकणाऱ्या तर आहेतच. पण त्यात अधिकही काहीतरी आहे. ते असं की, अशा तऱ्हेनं बदललेली माणसं ही शेवटी समाजाचे घटकच असतात. म्हणून ती ज्यावेळेला या अर्थांनी नामानं आतून बदलून जातात, त्यांचा इतरांशी व्यवहार त्याप्रमाणं घडू लागतो, त्यावेळी त्याचा विधायक परिणाम आजूबाजूच्या लोकांवर होत असतो. नामानं त्यांच्या ठिकाणी येणारी अनासक्ती, त्यामुळं येणारी शांती याचा परिणाम इतरांशी त्यांच्या होणाऱ्या व्यवहारावरही होत जातो. स्वाभाविकच आजूबाजूच्या लोकांची जीवनही आपोआपच शांततामय होत जातात आणि परिणामतः समाजातला क्षोभ आणि अशांतीही कमी होते.

आज जगात बदल घडवून आणण्याच्या कित्येक योजना निघून, राबूनसुद्धा माणूस आहे तिथंच आहे. याचं कारण खरा बदल जिथं अंतरंगात

व्हायला हवा तिथं तो या वाटांनी नि योजनांनी होत नाही. फार तर बहिरंगाची रंगरंगोटी घडते.अशा पार्श्वभूमीवर नाम मात्र थेट या अंतरंगातल्या बदलाचं कार्य करतं यापेक्षा त्याचं महत्त्व काय सांगावं ?

मानवी व्यवहार स्मरणाच्या शक्तीवर सुखरूप चालतो. सामान्यपणे हे स्मरण स्वार्थाचं आहे. नामानं तेच परमार्थाचं, भगवंताचं होतं. त्यामुळं वर्तनबदलाची एरवी अवघड वाटणारी मानसशास्त्रीय प्रक्रिया नामासारखं सोपं वाटणारं साधन करतं !

शारीरिक अवस्था, आर्थिक-सामाजिक परिस्थिती, वय, शिक्षण, व्यवसाय कशाचीच आडकाठी या नामाला नाही. ते अत्यंत निरुपाधिक आणि सुलभ आहे. त्याच्या उपरोक्त पद्धतीनं केलेल्या साधनेनं माणसाला अखंड समाधानरूप ईश्वराचा अनुभव आल्याखेरीज राहणार नाही, ही खात्री श्री महाराजांनी पदोपदी दिली आहे. ते साक्षात नामावतार नि नामाचे आचार्य होते. निर्वाणीची खूणसुद्धा त्यांनी 'जेथे नाम तेथे माझे प्राण' अशी सांगून ठेवली आहे.

या त्यांच्या बोधचिंतनातून आपली समाधानाची नि नामाची ओढ वाढो. हे नाम आपल्या स्वभावातल्या विधायक बदलापर्यंत, वृत्त्यंतरापर्यंत पोचून खरा परमार्थ घडो आणि याचि देही आपल्या सर्वांना शाश्वत आनंदाचं जीवन जगायला मिळो, हीच या 'चैतन्यचिंतना'च्या निमित्तानं त्यांच्या चरणी प्रार्थना ! श्रीराम !

*

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)**
चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. साधनप्रेरणा : नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. मेरी यात्रा (हिंदी) : हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. बोधपाठ : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. गुरुतत्त्वतरंगिणी : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) :
डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. शिदोरी : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. विचारविसावा : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. सारविस्तार भाग २ : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. महाराजांची शाळा : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. साधनपदावली भाग २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. आरतीपुष्पमाला : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. विनवणीची वाणी : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. श्रद्धेची पहाट : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. उपासनामाला : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. **पावनपथ :** श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. **अनुभवपुष्पे - भाग १ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. **कृतज्ञतामार्ग :** कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. **ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात :** आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. **श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती)** श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. **संतबोध : भाग ४ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. **श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार :** मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. **उत्तरायण -भाग ३ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. **अनुभवपुष्पे - भाग २ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. **श्रद्धा :** श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. **अनुभवपुष्पे - भाग ३ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. **अर्घ्य :** ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. **जीवनचिंतन :** दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. **स्वास्थ्यसंवाद :** मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. **वचनांजली भाग १ :** श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. **अक्षरायण :** आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. **वचनांजली भाग २ :** श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. **भावगीता :** श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

* चैतन्यचिंतन *

आजच्या असुरक्षिततेच्या, अस्वस्थतेच्या, असंतुलनाच्या काळात सामान्य माणसाला समजून घेऊन, त्याच्या मनाची जडणघडण तपासून त्याला अखंड समाधानाची विद्या सोपी करून देणारे श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांची काही अत्यंत मोलाची सूत्रमय बोधवचनं आहेत. त्यातून घडणारा बोध हा नेहमीच्या आपल्या जीवनाला उपयोगी तर खचितच आहे पण तो नेहमीच्या अध्यात्माच्या अवडंबराला नि कल्पनांना धक्का देणारा आहे.

ज्या वचनांवर श्री महाराजांच्या प्रवचनांच्या रूपानं विवरणं उपलब्ध नाहीत अशीच वचनं इथं प्राधान्यानं निवडली आहेत. त्यातही सामान्य माणसाच्या दृष्टीनं महत्त्वाच्या असलेल्या विषयांबद्दल वेगळी व विधायक दृष्टी देणारे विचार या पुस्तकात विवरणासाठी निवडले आहेत.या पुस्तकातील अत्यंत व्यवहार्य व सोपे विवरण कोणत्याही वाचकाला विधायक व मार्गदर्शक वाटेल.

या लोकप्रिय पुस्तकाची 'संतछाया' मार्फत आता दर्जेदार पण स्वस्त आवृत्ती.